CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शुक्रवार, २० मार्च २०२६ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४२ वे अंक १११ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# जगातील सर्वात मोठ्या वायू प्रकल्पावर हल्ला

### इराणकडून क्षेपणास्त्राचा मारा, कतारचे रास लाफान पुरवठा केंद्र उद्ध्वस्त

### कुवैत, सौदी, युएईच्या तेल शुद्धीकरण प्रकल्पाला आग



**दोहा, १९ मार्च**

अमेरिका-इस्रायली सैन्याने इराणच्या इंधन प्रकल्पांना लक्ष्य केल्याने संतापलेल्या इराणने गुरुवारी पहाटे कतार, कुवेत, युएई आणि सौदी अरबच्या तेल आणि वायू प्रकल्पांवर क्षेपणास्त्रे आणि ड्रोनचा मारा करीत प्रत्युत्तर दिले. यात कतार येथील जगातील सर्वात मोठा लिक्विफाइड नॅचरल गॅस अर्थात् एलएनजी प्रकल्प उद्ध्वस्त झाला. याशिवाय एका तेल शुद्धीकरण प्रकल्पाला आग लागली. दुसरीकडे या हल्ल्यात युएई आणि सौदी अरबच्या तेल शुद्धीकरण प्रकल्पाचे मोठे नुकसान झाले. जगातील सर्वात मोठ्या एलएनजी प्रकल्प असलेल्या रास लाफानवरील हल्ल्यानंतर, तेथील उत्पादन पूर्णपणे थांबवण्यात आले. इराणने कतारच्या सर्वात मोठ्या द्रवीकृत नैसर्गिक वायू (एलएनजी) प्रकल्प रास लाफानवर क्षेपणास्त्र हल्ला केल्याने आंतरराष्ट्रीय तेल आणि वायू बाजारात खळबळ माजली आहे. इराणने कतारवर क्षेपणास्त्रांचा मारा केला. या हल्ल्यामुळे वायू प्रकल्पाला भीषण आग लागली. कतारच्या गृह मंत्रालयाने हल्ल्याची पुष्टी करताना सांगितले की, प्रकल्पातून कर्मचाऱ्यांना आधीच सुरक्षितस्थळी हलवण्यात आल्याने जीवितहानी झालेली नाही, परंतु एलएनजी पुरवठा केंद्र उद्ध्वस्त झाले. या प्रकल्पातून जागतिक मागणीच्या २० टक्के वायूचा पुरवठा केला जातो. या हल्ल्यामुळे नैसर्गिक वायूच्या किमतीत मोठी वाढ होण्याची शक्यता आहे. कुवेतच्या मीना अल अहमदी तेल शुद्धीकरण प्रकल्पाला आग लागली. बचाव पथकाकडून आगीवर नियंत्रण मिळविण्याचे प्रयत्न सुरू आहे. दुसरीकडे युएई आणि सौदी अरबने इराणच्या हल्ल्यात तेल शुद्धीकरण प्रकल्पाचे नुकसान झाल्याचे सांगितले.

### भारतावर काय परिणाम होईल?

एलएनजी-उत्पादक देशांवरील हल्ल्यांचा भारतासारख्या देशांवर गंभीर परिणाम होत आहे, जो आपल्या नैसर्गिक वायूच्या गरजांपैकी सुमारे ५० टक्के आंतरराष्ट्रीय बाजारातून पूर्ण करतो. भारत नैसर्गिक वायूच्या गरजांपैकी सुमारे २० टक्के कतारकडून आयात करतो. वायू प्रकल्पावरील हल्ल्याने भारताला होणारा पुरवठा खंडित होण्याची शक्यता आहे.

### दक्षिण पार्स गॅस क्षेत्रावरील हल्ल्याला प्रत्युत्तर

अमेरिका-इस्रायलने बुधवारी रात्री इराणच्या दक्षिण पार्स गॅस क्षेत्रात जोरदार हल्ले केले. हे जगातील सर्वात मोठे नैसर्गिक वायू क्षेत्र आहे. दक्षिण पार्सधून काढलेला बहुतांश वायू इराणकडून देशांतर्गत वापरासाठी वापरला जातो. या गॅस क्षेत्राचे महत्त्व लक्षात घेता, संयुक्त अरब अमिराती आणि कतारने हल्ल्याचा निषेध केला. यानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितले की, पुन्हा या प्रदेशावर हल्ले केले जाणार नाहीत.

## आमच्या संयमाचा अंत पाहू नये

**रियाध :** आखाती देशांवरील हल्ल्यामुळे आम्ही चिंतेत आहोत. इराणने आमच्या संयमाचा अंत पाहू नये, आमच्या देशांवर हल्ले सुरूच राहिल्यास प्रतिहल्ला केला जाईल, संयमाचा अंत पाहू नये, अशा शब्दात सौदी अरब, युएईने संयुक्त निवेदन जारी करीत इराणला इशारा दिला. सौदी अरबचे परराष्ट्र मंत्री, प्रिन्स फैसल बिन फरहान अल सौद पत्रपरिषदेत म्हणाले, आखाती देशांवर होणारे हल्ले थांबवणे आमचे प्राथमिक ध्येय आहे. इराणचे हल्ले सुरूच राहिल्यास आम्हाला लष्करी कारवाईचा निर्णय घ्यावा लागेल.




### अंबानी यांची सीबीआय चौकशी

**नवी दिल्ली :** रिलायन्स कम्युनिकेशन्स लि. च्या विरोधात कथित २९२९ कोटी रुपयांच्या फसवणुकीबाबत भारतीय स्टेट बँकेने दाखल केलेल्या तक्रारीच्या प्रकरणात केंद्रीय अन्वेषण विभाग अर्थात् सीबीआयने गुरुवारी उद्योजक अनिल अंबानी यांची चौकशी केली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. चौकशीसाठी अनिल अंबानी सकाळी सीबीआयच्या मुख्यालयात दाखल झाले.

# खरात प्रकरणाचा तपास 'एसआयटी'कडे सोपविला

### आयपीएस अधिकारी तेजस्विनी यांची नियुक्ती



**नाशिक, १९ मार्च**

सामाजिक व राजकीय क्षेत्रासह संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडवून देणाऱ्या स्वयंघोषित अंकशास्त्रज्ञ कॅप्टन अशोक खरातच्या कृष्णकृत्यांचा छडा लावण्यासाठी राज्य सरकारने आता कंबर कसली आहे. या प्रकरणाची निष्पक्ष आणि सखोल चौकशी करण्यासाठी विशेष तपास पथकाची (एसआयटी) स्थापना करण्यात आली आहे. या पथकाच्या प्रमुखपदी महिला आयपीएस अधिकारी तेजस्विनी सातपुते यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या निर्णयामुळे आता खरातच्या राजकीय आणि धार्मिक संबंधांसह शोषणाच्या रॅकेटचे धागेदोरे उघड होण्याची शक्यता आहे. राज्य गृह विभागाने घेतलेल्या निर्णयानुसार, अशोक खरात याच्याविरुद्ध नाशिक शहर, नाशिक ग्रामीण आणि अहिल्यानगर (शिर्डी) येथे नोंदवलेल्या तीन स्वतंत्र गुन्ह्यांचा तपास आता एसआयटीमार्फत एकत्रितपणे केला जाईल. महाराष्ट्र पोलिस मुख्यालयाने या प्रकरणातील सर्व केस डायरी, पुरावे आणि जप्त केलेले साहित्य तातडीने या विशेष पथकाकडे सोपवण्याचे आदेश दिले आहेत.

### ५८ व्हिडीओंचे रहस्य उलगडणार?

अशोक खरातच्या कार्यालयातून जप्त करण्यात आलेल्या पेन ड्राइव्हमधील ५८ आक्षेपार्ह व्हिडिओ हे या तपासातील सर्वात महत्त्वाचे दुवे मानले जात आहेत. तेजस्विनी सातपुते यांच्या नेतृत्वाखालील पथक आता या व्हिडिओंधील महिलांची ओळख, यामागे असलेले मोठे रॅकेट, राजकीय- धार्मिक संबंध आणि खरातच्या मालकीच्या श्री ईशान्येश्वर मंदिर ट्रस्टमधील आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी करणार आहे.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### आसार मैदान येथे उद्या रमजान ईदची नमाज

**सोलापूर, दि. १९ मार्च -**

सालाबाद प्रमाणे या वर्षीही आसार मैदान ईदगाह किल्ला रोड येथे रमजान ईदची सामूहिक नमाज अदा केली जाते. त्यामुळे येथे हजारो मुस्लिम बांधव नमाजासाठी उपस्थित असतात. शनिवार, दि. २१ मार्च रोजी रमजान ईद असल्याने सकाळी १०.३० वाजता आसार मैदान ईदगाह येथे नमाज अदा होणार आहे, तरी सर्व मुस्लिम बांधवानी वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन आसार शरीफचे चिफ ट्रस्टी, काझी व खतीब शकील शब्बीर मौलवी यांनी केले आहे.

### उस्मान शेख याचा पहिला रोजा

**सोलापूर, दि. १९ मार्च -**



सोलापूर - सोशल प्रायमरी इंग्रजी शाळेत युकेजीमध्ये शिकत असलेल्या मो.उस्मान (हसनैन) उबेद शेख या बालकाने वयाच्या साडेपाचव्या वर्षात रमजान महिन्यातील आपला पहिला रोजा रविवार रोजी पूर्ण केला. नातेवाईकांच्या वतीने मो.उस्मान याची गुलपोशी करून सायंकाळी रोजा इफ्तार करण्यात आला. एवढ्या लहान वयात तेही भर उन्हाळ्यात रोजा पूर्ण केल्याने मो.उस्मान याचे आई-वडील, आजी-आजोबा, नातेवाईकांनी तोंड भरून कौतुक करून आशीर्वाद दिला.

### आज व उद्या मार्केट यार्ड बंद

**सोलापूर, दि. १९ मार्च-**

शुक्रवार २० व शनिवार २१ मार्च रोजी रमजान ईद निमित्त कृषी उत्पन्न बाजार समितीचे मार्केट यार्ड बंद असणार आहेतत. तरी श्री सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीमधील सर्व आडते, व्यापारी, माथाडी कामगार, ट्रान्सपोर्ट व शेतकरी यांनी याची नोंद घ्यावी, असे श्री सिद्धेश्वर टर्मिनल मार्केट यार्ड अडत व्यापारी संघाने कळविले आहे.



### पदवीधर शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख ही पदे पदोन्नतीने भरा

**सोलापूर, दि. १९ मार्च-**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागात अनेक वर्षे रिक्त असलेली पदवीधर शिक्षक, मुख्याध्यापक व केंद्रप्रमुख पदे पदोन्नतीने भरण्यात यावीत अशी मागणी शिक्षक सहकार संघटनेने निवेदनाद्वारे प्राथमिकचे शिक्षणाधिकारी कादर शेख यांच्याकडे केली आहे. सोलापूर जिल्ह्यातील रिक्त पदासंदर्भात माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजित पाटील यांनी विधानसभेत लक्षवेधी मांडली आहे व सोलापूर जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षण विभागातील रिक्त केंद्रप्रमुख, पदवीधर शिक्षक, मुख्याध्यापक पदे तातडीने पदोन्नतीने भरण्याबाबत शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्याकडे मागणी केली आहे. त्याला शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी विधानसभेत उत्तर देताना सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. वरील सर्व बाबी लक्षात घेता गावागावातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण, दर्जेदार शिक्षण मिळण्यासाठी व तालुका स्तरावरील शिक्षण विभागातील प्रशासन सुरळीत चालण्यासाठी विभागातील रिक्त असलेली पदवीधर शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख पदे अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजना पुर्वी पदोन्नतीने तात्काळ भरण्यात यावीत अशी मागणी शिक्षक सहकार संघटनेचे राज्य सरचिटणीस निलेश देशमुख यांनी प्राथमिकचे शिक्षणाधिकारी कादर शेख यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी जुनी पेन्शन हक्क संघटनेचे अनिल कुलकर्णी उपस्थित होते.



### शिवाजी पॉलिटेक्निकमध्ये बक्षिस वितरण

**सांगोला, दि.१९ मार्च -**

सांगोल्यातील शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेज मध्ये महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ मुंबई यांनी घेतलेल्या हिवाळी परीक्षा २०२५ मध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड व उपाध्यक्ष महादेव गायकवाड, सचिव अंकुशराव गायकवाड उपस्थित होते. ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळवलेल्या ७४, गणित विषयात १०० पैकी १०० गुण प्राप्त केलेल्या १२ विद्यार्थ्यांना रोख १ हजार रुपये तसेच पदविका अभियांत्रिकीच्या अंतिम वर्षातील शुभम माने, यशराज देशमुख, ऋषिकेश शेंडगे आणि स्वप्नाली दिवसे द्वितीय वर्षातील मृदुला पाटील, अमृता मिसाळ, नेहा लेंडवे प्रथम वर्षाच्या सबा इनामदार, आरती गंगाधरे, आदित्य खटकाळे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थ्यांना ५ हजार, ३ हजार व २ हजार रुपये रोख बक्षीस व सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी बाबुराव गायकवाड, महादेव गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ.रणजीत देशमुख, सूत्रसंचालन प्रा.संदीप बावचे यांनी केले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## निधन वृत्त...

### रेवणसिद्ध ढोले

**सांगोला, दि.१९ मार्च -**



येथील किराणा मालाचे प्रसिद्ध व्यापारी रेवणसिद्ध रामचंद्र ढोले (वय-८२) यांचे गुरुवारी सकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात विवाहित दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# महापुरुषांकडे जातीतून पाहू नका : राज ठाकरे राज्यासाठी 'महाराष्ट्र नेक्स्ट' वेबसाईट

**इन्स्टाग्राममधून बाहेर पडा, गुढीपाडवा मेळाव्यात आवाहन**

**मुंबई, दि.१९ मार्च-**



मुंबईतील शिवाजी पार्क येथे आज महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा गुढीपाडवा मेळावा पार पडला. यावेळी राज ठाकरे यांनी महाराष्ट्र नेक्स्ट नावाची एक वेबसाईट महाराष्ट्राला अर्पण केली. या वेबसाईटमधून सामान्य जनता आपले विचार मांडू शकतात. तसेच त्यांचे विचार सरकारपर्यंत पोहोचवण्याचे काम केले जाणार असल्याचे ठाकरेंनी स्पष्ट केले.

महाराष्ट्र नेक्स्ट या वेबसाइटवर लोकांनी आपले विचार तिथे मांडायचे आहेत. आम्ही तुमच्या आणि सरकारच्या मधले दुवा म्हणून काम करणार. तुम्ही सांगितलेले योग्य कामे सरकारकडून आम्ही करवून घेण्याचा प्रयत्न करणार, असे राज ठाकरे यांनी यावेळी सांगितले. तसेच तुम्ही सांगेपर्यंत तुमचे नाव आणि नंबर सांगितले जाणार नाही, असेही राज ठाकरे यांनी स्पष्ट केले आहे. राज ठाकरे यांनी मराठी पुरूषांचे नावे सादर केली. पुढे ते म्हणाले, संपूर्ण देशाचे लक्ष महाराष्ट्राकडे असायचे. आज महाराष्ट्र काय देतोय? आज आपल्या क्रिकेट टीममध्ये सुद्धा मुंबईतला कोणी नाही. कुठे कमी पडतोय आम्ही? आम्ही विचारच करत नाही. आम्हाला महाराष्ट्र कसा घडवायचा आहे, याचा विचारच नाही. सरकार आपल्या डोक्यावर येऊन बसले आहे, आपल्याला काही देणे-घेणे नाही. आपल्याला महाराष्ट्र घडवायचा आहे. सरकारवर अवलंबून चालणार नाही. म्हणून एक नवीन योजना मी आणली आहे. २००६ साली मी इथेच म्हटले होते की महाराष्ट्राची ब्ल्यु प्रिंट आणीन. मग नंतर एकाने मला विचारले तुमची ब्ल्यु फिल्म कधी येणार आहे? मी म्हटले ती आणली असती तर ती तरी बघितली असती. मला सगळे लोक विचारायचे काय झाले ब्ल्यु प्रिंटचे? आज जवळपास त्या गोष्टीला १२ वर्ष लोटली आहेत. महाराष्ट्रही बदलला आहे. मला असे वाटले की आता काय करावे? वर्तमानपत्रात अनेक चांगले लेख येत असतात. मग मी विचार केला की या साठी एक प्लॅटफॉर्म उभा करावा लागेल.

**महापुरुषांकडे जातीने पाहू नका**

राज ठाकरे म्हणाले, तुम्ही कोणत्या भूमीत जन्माला आलात? तुम्ही कोणाचे वारस आहात? हा महाराष्ट्र दर वेळेला देशाला दिशा दाखवत आला आहे. या महाराष्ट्राला जवळून बघा एकदा. हजारो माणसे आहेत. मी फक्त नाव वाचतो, संत परंपरा - संत ज्ञानेश्वर, तुकाराम, समर्थ रामदास, जनाबाई, एकनाथ.. इतिहास - जिजाऊ साहेब, पहिली बंडखोर स्त्री. छत्रपती शिवाजी महाराजांना जन्म देणारी स्त्री. दुसऱ्यांची चाकरी कशाला करता? असा सवाल उपस्थित करणाऱ्या स्त्री. छत्रपती संभाजी महाराज, बालाजी विश्वनाथ पेशवे, मी हात जोडून विनंती करतो, कोणाही महापुरुषांकडे जातीने पाहू नका. पहिले बाजीराव पेशवे, अहिल्याबाई होळकर, गायकवाड, तात्या टोपे, झाशीची राणी. मुंबईला आकार देणारे- जगन्नाथ शंकर शेठ, भाऊ लक्ष्मण अजिंक्य, सीताराम खंडेराव वैद्य (ताज हॉटेलचे आर्किटेक्ट), समाजसुधारक- महात्मा फुले, रानडे, आगरकर, गोपाळ कृष्ण गोखले, शाहू महाराज, बाबासाहेब आंबेडकर, विनायक दामोदर सावरकर, भांडारकर, प्रबोधनकार ठाकरे, विनोबा भावे. धर्माच्या नावाने पिळवणूकीच्या विरोधात माझे आजोबा नव्हते. भट भिक्षुकीच्या विरोधात होते ते. आनंदी बाई जोशी, असे असंख्य नावे यावेळी राज ठाकरे यांनी सांगितले.

## दुचाकीच्या धडकेत महिलेच्या तोंडास व डोक्यास लागला मार

**सोलापूर, १९ मार्च-**

भारत माता नगर ते सुभाष नगर जुळे सोलापूरकडे दि. १३ मार्च रोजी संजय बाबुराव हत्तुरे, वय ४२, रा. महालक्ष्मी नगर, जुळे सोलापूर व त्यांची सासू ललिता यांना पाठीमागे बसून मोटर सायकल क्रमांक एम एच १३ बीई ७८८८ वरून घेऊन जात असताना मोटरसायकल क्रमांक एम एच १३ बीके ०७९७ चा चालक त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, हायगईने चालवून धडक दिली.

त्यात संजय हत्तुरे यांच्या सासू रोडवर पडल्या व त्यांच्या तोंडास, डोक्याला मार लागून गंभीर जखमी झाल्या. विजापूर नाका पोलीस ठाण्यात दि. १८ मार्च रोजी आरोपी विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. तपास सांगळे करत आहेत.



## शंभू महादेवाच्या मानाच्या कावड्या सजल्या

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १९ मार्च-**

शंभू महादेवाची यात्रा गुढीपाडव्यापासून सुरु झाली. या यात्रेच्या अनुषंगाने महादेवाच्या कावडी तयार होतात. गावप्रदर्शन केले जाते. अकलूज येथे गंगाधर नामदेव कुंभार यांचे मानाची कावड आज तयार झाली त्यांच्या चार-पाच पिढ्यापासून ही परंपरा त्यांच्याकडे चालत आली आहे.

याबाबत बोलताना राजू कुंभार यांनी सांगितले की, आमच्या आजोबा पणजोबापासून ही परंपरा चालू आहे. गुढीपाडव्याला या कावडी तयार केला जातात व पौर्णिमा हनुमान जयंतीदिवशी भंडारा करून यांचे विसर्जन केले जाते. एकादशीच्या दुसऱ्या दिवशी महादेवास शिखर शिंगणापूर येथे या कावडी पाण्याची धार घालण्यासाठी जातात.

महाराष्ट्रसह आंध्र प्रदेश, तेलंगणा, मराठवाडा आदी ठिकाणाहून मानाच्या कावडी घेऊन भाविक मोठ्या प्रमाणावर शिंगणापूरकडे येतात. शिंगणापूरच्या पायथ्याशी असलेला मुंगी घाट या कावडी घेऊन चढण्याची प्रथा आहे. यावेळी हर हर महादेव महादेव असा जयघोष करत भाविक हा अवघड घाट चढतात, असेही त्यांनी सांगितले.

## अवकाळीच्या दणक्याने अणदूर परिसरात पिकांचे मोठे नुकसान

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. १९ मार्च-**

अणदूर परिसरात जवळपास सर्वत्र विजेच्या कडकडाटासह वादळी वाऱ्यासह पावसाने,तडाखा दिल्याने वरूण राजा हतबल झाला असून,हाता तोंडाला आलेल्या पिकावर संक्रांत आल्याने अगोदरच मेताकुटीला आलेला बळीराजा या आसमानी संकटाने उघडा पडल्याचे विदारक चित्र पहावयास मिळत आहे. तुळजापूर तालुक्यातील अणदूर,नळदुर्ग, जळकोट, ईटकळ, शहापूर , काटगाव जवळपास संपूर्ण तालुक्यात अवकाळीने शेतकऱ्यांचे पुन्हा कंबर्डे मोडल्याने दुहेरी संकटात सापडला आहे.

आज दिनांक १९ मार्च रोजी सायंकाळी ४ .०० वाजल्यापासूनच सायंकाळी सहा वाजेपर्यंत काही ठिकाणी तुरळक तर काही ठिकाणी गारांच्या पावसाने उभ्या पिकावर व राशी करता काढून टाकलेल्या पिकावर पावसाने जबरदस्त दणका दिला आहे. या अवकाळी पावसात ज्वारी, गहू, हरभरा, द्राक्ष, आंबा यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकरी उघडा पडला आहे.गहू ज्वारीच्या राशीचा सिझन



असल्याने रानात कापून ठेवलेले पिक अक्षरशा वाहून गेले आहे, या अवकाळीने शेतकरी पार मोडून पडला असून त्याला शासनाने मदत करावी अशी मागणी होत असून,अगोदरच

विजेचा अवेळी पुरवठा, बहुतेक साखर कारखान्याने उसाचे बिल शेतकऱ्यांना न दिल्याने बळीराजा कर्जबाजारी झाला आहे. त्यात पुन्हा अवकाळीचा सामना शेतकऱ्यांना जीव घेणारा ठरत आहे. या अस्मानी संकटावर मात करण्यासाठी राज्य शासनाने पुढाकार घेऊन शेतकऱ्यांना तातडीची मदत करावी अशी मागणी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अरविंद घोडके यांनी केली आहे.

## 'अंनिस'च्या मधुरा सलवारूताईंचे ८०व्या वर्षातही १०५ वैज्ञानिक प्रयोगांचे किट

**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या सोलापूर शाखेच्या वतीने सत्कार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, १९ मार्च-**



महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या मधुरा सलवारूताईंनी ८० वर्षांच्या वयातही जिद्दीने तयार केलेले १०५ वैज्ञानिक प्रयोगांचे किट हे राज्यभरातील शाखांसाठी ऐतिहासिक उपक्रम ठरले. स्वखर्चाने महिनाभर परिश्रम घेऊन हे किट तयार करून वाटप केल्याबद्दल त्यांचा महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या (अंनिस) सोलापूर शहर शाखेने आपल्या विलक्षण कार्यकर्त्या मधुरा सलवारूताईंचा सत्कार करण्यात आला.

**वैज्ञानिक किटचा प्रवास:** ताईंनी वेगवेगळ्या ठिकाणाहून साहित्य मागवून प्रत्येक किट काळजीपूर्वक तयार केले. उषा शहा, अंजली नानल, निशा भोसले, सुनिता गायकवाड, शिला हावळे यांचे सहकार्य लाभले. भारत विठ्ठलदास, अनिल वेल्हाळ, गणेश चिंचोले, रामभाऊ नलावडे, डॉ. दीपक माने, भगवान रणदिवे, मिलिंद देशमुख यांनी साहित्य कार्यक्रमस्थळी पोहोचवले. राज्यातील अनेक शाखांना ही किट मिळाली आणि सदस्यांनी ताईंचे मनापासून कौतुक केले. डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात झालेल्या सत्कारप्रसंगी शहर शाखेचे कार्याध्यक्ष आर. डी. गायकवाड, सचिव सुजित हावळे, उपाध्यक्ष अण्णा दीक्षित, सदस्य दीपक पांडागळे, डॉ. निलेश गुरव, शिला हावळे, अंजली नानल उपस्थित होते. सूत्रसंचालन सुजित हावळे, आभार शिला हावळे यांनी मांडले. डॉक्टर हमीद व मुक्ता दाभोळकर यांनीही ताईंचे कौतुक केले.

**३० वर्षांची निष्ठा :** गेल्या ३० वर्षांपासून चळवळीत सक्रिय असलेल्या ताईंनी डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्यासोबत कार्य केले. २०२५-२६ मध्ये स्वखर्चाने सर्प विज्ञानाचे १० प्रयोग, फटाके मुक्त दिवाळीचे १० प्रयोग, डॉ. दाभोलकर आदरांजलीचे १० कार्यक्रम आणि १४ फेब्रुवारी २०२६ रोजी 'दिल दोस्ती दुनियादारी' अंतर्गत 'मुलं-मुली वयात येताना' व्याख्यान असे १०० हून कार्यक्रम आयोजित केले.

## लक्ष्मीबाईंच्या अश्रूंमधून उभा राहिला रयतचा वटवृक्ष : प्रा.काटकर

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१९ मार्च -**

स्त्रियांच्या अश्रूंमध्ये परिवर्तनाची प्रचंड ताकद असते; सीतेच्या अश्रूंनी रामायण आणि द्रौपदीच्या अश्रूंनी महाभारत घडले, त्याचप्रमाणे लक्ष्मी वहिनींच्या अश्रूंमधून रयत शिक्षण संस्थेचा विशाल वटवृक्ष उभा राहिला.

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी समाजातील अज्ञान, दारिद्र्य आणि विषमता दूर करण्यासाठी शिक्षणाची चळवळ उभारली; मात्र त्या चळवळीच्या पाठीशी लक्ष्मीबाईंचा निःस्वार्थ त्याग, माया आणि समर्पण यांची भक्कम साथ होती. वसतिगृहातील विद्यार्थ्यांना आईसारखे प्रेम देणे, त्यांची उपासमार होऊ नये म्हणून स्वतःचे सुख त्यागणे, त्यांच्या जीवनात आत्मीयता निर्माण करणे ही कार्ये त्यांनी निष्ठेने पार पाडली. असे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्रा. पोपट काटकर यांनी केले.

येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात समारंभ समिती, सांस्कृतिक विभाग आणि 'कमवा व शिका' योजना समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रयतमाउली सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या ९६ व्या पुण्यतिथीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ बी. टी. जाधव हे होते.

या कार्यक्रमाची सुरुवात रयतमाउली सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून करण्यात आली. कार्यक्रमाचे



प्रास्ताविक तसेच पाहुणे व अध्यक्षांचा परिचय सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ. रमेश शिंदे यांनी करून दिला.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांनी रयत आणि माउली या संकल्पनांतील मूल्यांचा वेध घेत, लक्ष्मीबाईंच्या कार्याचा आदर्श आजच्या पिढीने आत्मसात करावा, असे आवाहन केले. यावेळी कला विभागाचे उपप्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे, वाणिज्य विभागाचे उपप्राचार्य डॉ. सुशील शिंदे, कला विभागाचे अधिष्ठाता डॉ. समाधान माने, पदव्युत्तर विभागाचे अधिष्ठाता डॉ. बाळासाहेब बलवंत, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. अमर कांबळे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य विठ्ठल काटकर, कार्यालयीन प्रमुख चौरंगनाथ वाघमारे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सारिका भांगे यांनी केले, तर समारोप प्रसंगी आभार समारंभ समितीचे चेअरमन डॉ. दत्तात्रय डांगे यांनी मानले.

## डीआयवाय स्टोअरमधील कॅशियरने केली फसवणूक

**सोलापूर, १९ मार्च-**

**सोलापूर** - होटगी रोड येथील डी आय वाय स्टोअर मध्ये दि. ५ ते २७ जानेवारी २०२६ च्या दरम्यान अविनाश श्रीमंत मेंडगुडले रा. सुरेगाव, सोलापूर हा कॅशियर म्हणून काम करत असताना स्टोअरचे आयडी अविमेनचा वापर करून व्यवहाराची एकूण ७१,९८० रुपयांचा अपहार करून कंपनीची फसवणूक केली आहे. याबाबतची तक्रार लक्ष्मीकांत बसन्ना म्हेत्रे, वय ३७, रा. मु.पो. कुमठे, ता. उत्तर सोलापूर यांनी दिली असून विजापूर नाका पोलीस ठाण्यात दि. १८ मार्च रोजी आरोपी विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास गायकवाड करत आहेत.

## पैलवानाकडून पिस्टल व एक जिवंत राऊंड जप्त

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ मार्च-**

मौजे बेंबळे (ता. माढा) येथील अवैध अग्निशस्त्र बाळगणाऱ्या पैलवानास ताब्यात घेवून एक देशी बनावटीचे पिस्टल व एक जिवंत राऊन्ड असा एकूण ५० हजार २००/- रु. किंमतीचा मुद्देमाल ग्रामीण पोलिसांनी जप्त केला.

पैलवान अभिषेक उर्फ भैय्या गायकवाड हा टेंभूर्णी शहरातील हॉटेल सागर, परमिट रुम येथे अवैध अग्निशस्त्रासह बसला असून त्याचे अंगावर क्रिम रंगाचा फुलशर्ट व निळ्या रंगाची जिन्स घातलेली असल्याबाबत माहिती मिळाली. त्यानुसार लागलीच पोलीस उपनिरीक्षक म.इसाक अबास मुजावर यांनी दोन पंचासह हॉटेल सागर परमिट रुम येथे जावून त्याला ताब्यात घेवून अंगझडती घेतली असता, कंबरेच्या उजव्याबाजूस मॅगझीनसह एक गावठी पिस्टल व मॅगझीनमध्ये एक जिवंत राउन्ड मिळून आले. त्याप्रमाणे



टेंभूर्णी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयाचा तपास उपनिरीक्षक मदने हे करीत आहे. आरोपीस अटक करुन न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने आरोपीस दि. २ दिवसाची पोलीस कस्टडी रिमांड मंजूर केली आहे. सदरची कामगिरी पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर यांचे मार्गदर्शनाखाली टेंभूर्णी पोलीस ठाणेचे प्रभारी सहा. पोलीस अधिक्षक आत्राम, स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय जगताप यांचे नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे श्रेणी पोलीस उपनिरीक्षक म.इसाक अबास मुजावर, सफौ नारायण गोलेकर, धनाजी गाडे, मोहन मनसावाले, अक्षय डोंगरे, संदीप हुलगे, चालक सतिष बुरुकुल यांचे पथकाने कामगिरी बजावली आहे.

**महात्मा फुले द्विशताब्दी जयंतीनिमित्त**

## १०० रूपयांचे विशेष नाणे छापण्याची मागणी

**सोलापूर :** क्रांतीसुर्य महात्मा फुले यांच्या जन्म दिनास ११ एप्रिल रोजी दोनशे वर्षे पूर्ण होत आहेत. यांची जयंती हा स्मृती दिन नसून त्यांच्या समतेच्या विचाराचे मशाल पुढे नेण्याचा दिवस आहे. त्यांचे युवा पीढीला होत रहावे ही जाणीव म्हणून तमाम बहुजन समाजातील जनतेकडून मागणी केली जात आहे त्यांच्या द्विशताब्दी जयंती निमित्त १०० रुपयाचे विशेष नाणे काढून त्यावर महात्मा फुले यांची प्रतिमा छापण्यात यावी, असे निवेदन राष्ट्रवादी कॉंग्रेस अजितदादा गट व महात्मा फुले समता परिषद सोलापूर महानगर यांच्या वतीने पंतप्रधान मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा तसेच महाराष्ट्र राज्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब, उपमुख्यमंत्री सुनित्रा ताईसाहेब, पुरवठा मंत्री छगनर भुजबळ यांना एका पत्राद्वारे देण्यात आले. राष्ट्रवादी कॉंग्रेस अजितदादा पवार गटाचे प्रदेश चिटणीस तथा अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद सोलापूर महानगर अध्यक्ष शशिकांतबापू कांबळे यांनी हे निवेदन दिले आहे.

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शुक्रवार, २० मार्च २०२६
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



नि व्यक्तिगत स्वातंत्र्य व संघटनेत त्यावर येणाऱ्या मर्यादा, यासंबंधी व्यक्तीचा दृष्टिकोन काय असावा, याचाही आपण विचार केला पाहिजे. सर्वसामान्य मनुष्याची आणि ध्येयसमर्पित मनुष्याची व्यक्तिगत स्वातंत्र्यासंबंधीची कल्पना यात जमीन-अस्मानचे अंतर आहे. ध्येय साध्य करण्यासाठी आपल्यावर सोपविलेले कार्य उत्कृष्टपणे करणे हेच ध्येयनिष्ठ स्वयंसेवकाकरिता सर्वांत महत्त्वाचे काम असते.

**- एकनाथ रानडे**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह, संस्थापक विवेकानंद शिला स्मारक व विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी

# माध्यमांच्या अभिव्यक्तीत विवेक, शैली, वैचारिक बांधिलकी हवी

## सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे मत

**नागपूर, १९ मार्च**
माध्यमांच्या क्षेत्रात नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे आवश्यक असले, तरी त्याचा समाजाच्या कल्याणासाठी उपयोग झाला पाहिजे. त्यामुळेच नव्या तंत्राचा अंगीकार करताना देखील माध्यमांच्या अभिव्यक्तीत विवेक, शैली आणि वैचारिक बांधिलकी असली पाहिजे, असे मत रा. स्व. संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी आज येथे व्यक्त केले.

दै. तरुण भारतचा शताब्दीपूर्ती सोहळा गुरुवारी गुढीपाडव्याला अत्यंत थाटात, उत्साहात आणि भरगच्च उपस्थितीत कविवर्य सुरेश भट सभागृहात झाला.



सरसंघचालकांची प्रकट मुलाखत घेताना शैलेश पांडे व रवींद्र देशपांडे

### पुणे आवृत्ती सुरू झाल्याचा आनंद

**पुणे आवृत्तीबाबतच्या प्रश्नाबाबत सरसंघचालक म्हणाले की, अनेक प्रकारच्या अडचणी येऊनही संघ वाढला; तेच तरुण भारतबद्दल म्हणता येईल. माझ्या बालपणी तरुण भारत वाचला का, अशी विचारणा होत असे. माझा आणि तरुण भारतचा संबंध इतका घनिष्ठ आहे. आता पुण्यात तरुण भारतची आवृत्ती सुरू होत आहे, याचा आनंद वाटतो. तेथील स्वयंसेवकांना तरुण भारतबद्दल आपुलकी आहेच. ते सहकार्य करतीलच. वैचारिक प्रतिबद्धता आणि व्यावसायिक दृष्टिकोन अंगीकारून पुढे जाता येते, हे नागपूरच्या तरुण भारतने गेल्या काही वर्षांत सिद्ध केलेच आहे. वर्तमानपत्र कसे चालवायचे हे तरुण भारत परिवाराला कळते. त्याच पद्धतीने पुण्यातही वृत्तपत्राचे संचालन केल्यास ते यशस्वी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.**

(प. पू. सरसंघचालकांची सविस्तर मुलाखत वाचा २२ तारखेच्या 'आसमंत' पुरवणीत)

# तरुण भारत सदैव विश्वासार्ह, वाचकप्रिय

## शताब्दीपूर्ती सोहळा थाटात



'समर्पण'चे प्रकाशन करताना डावीकडून शैलेश पांडे, धनंजय बापट, देवेंद्र फडणवीस, डॉ. मोहनजी भागवत, नितीन गडकरी, पद्मश्री डॉ. विलास डांगरे, अनिल दांडेकर, सोनाली ठेंगडी

## देवेंद्र फडणवीस यांचे गौरवोद्गार

### 'तभा'ने समाजापर्यंत पोहोचविला राष्ट्रवादाचा विचार : नितीन गडकरी

**नागपूर, १९ मार्च**
राष्ट्रीय विचारांच्या अधिष्ठानासह निरंतर वाटचाल करीत सदैव विश्वासार्ह, वाचकप्रिय राहिलेल्या दै. 'तरुण भारत'चा शताब्दीपूर्ती सोहळा गुरुवारी गुढीपाडव्याला अत्यंत थाटात, उत्साहात आणि भरगच्च उपस्थितीत पार पडला. विचारांचे संवर्धन व प्रसाराचे कार्य 'तरुण भारत'ने अविरत सुरू ठेवत, राष्ट्रवादाचा विचार समाजापर्यंत पोहोचविण्याचे काम केले, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याप्रसंगी काढले.

'मी वाचलेले पहिले वृत्तपत्र' असा उल्लेख त्यांनी प्रारंभीच केला. गुढीपाडवा म्हणजेच मराठी नूतन नववर्षाच्या शुभ दिनी आयोजित या सोहळ्याला कविवर्य सुरेश भट सभागृहात भरगच्च उपस्थिती होती. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी, श्री नरकेसरी प्रकाशन लि.चे अध्यक्ष पद्श्री डॉ. विलास डांगरे, कार्याध्यक्ष अनिल दांडेकर, प्रबंध संचालक धनंजय बापट, संचालक उदयभास्कर नायर, सम ीर गौतम, आशीष बडगे, प्रदीप काळेले, संदीप पोशट्टीवार, श्रीकर सोण, अशोक मानकर, मीरा कडबे, दै. तरुण भारतचे मुख्य संपादक शैलेश पांडे व्यासपीठावर उपस्थित होते.

## महत्त्वाचे

### एचडीएफसी बँकेच्या अध्यक्षांचा राजीनामा

**नवी दिल्ली :** खासगी क्षेत्रातील सर्वात मोठी बँक एचडीएफसीचे अध्यक्ष आणि स्वतंत्र संचालक अतनू चक्रवर्ती यांनी गुरुवारी पदाचा राजीनामा दिला. नैतिक कारणामुळे राजीनाम्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी पत्रात म्हटले आहे. केकी मिस्त्री यांची अंतरिम अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यास आरबीआयने मंजुरी दिली आहे. चक्रवर्ती यांच्या राजीनाम्याचे वृत समोर आल्यानंतर एचडीएफसी बँकेचे शेअर्स नऊ टक्क्यांनी घसरले, ज्यामुळे बँकेचे एकूण बाजार मूल्य ६५,१७६ कोटींनी घसरले. राजीनामा पत्रात चक्रवर्ती यांनी म्हटले की, गेल्या दोन वर्षांत, मी बँकेमध्ये अशा काही घटना आणि कार्यपद्धती पाहिल्या आहेत, ज्या माझ्या वैयक्तिक मूल्यांशी आणि नैतिकतेशी विसंगत होत्या. हाच माझ्या निर्णयाचा आधार आहे. बँकेतील कार्यपद्धती आक्षेपार्ह असून, मी अशा वातावरणात काम करू शकत नाही.

### नायजेरियात आत्मघाती हल्ला; ४८ नागरिक ठार

**अबुजा :** नायजेरियातील मैदुगुरी येथे झालेल्या आत्मघाती हल्ल्यात ४८ नागरिकांचा मृत्यू झाला, तर १०० पेक्षा जास्त जखमी झाले आहेत. संघर्षग्रस्त शहरातील अलिकडच्या काळातील हा सर्वांत प्राणघातक हल्ल्यांपैकी एक आहे. पोलिस विभागाचे प्रवक्ते नाहूम केनेथ डासो यांनी सांगितले की, मैदुगुरी येथील बाजारपेठेत बुधवारी अचानक स्फोट झाला. बचाव पथकाने जखमींना रुग्णालयात हलविले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी आतापर्यंत ४८ नागरिकांच्या मृत्यूला दुजोरा दिला. १०० पेक्षा अधिक जणांवर उपचार सुरू आहेत. प्राथमिक तपासात बोको हरामने आत्मघाती स्फोट घडविल्याची माहिती समोर आली. मात्र, अद्याप कोणत्याही गटाने हल्लाची जबाबदारी स्वीकारलेली नाही.

### टाटा समूहाचे अध्यक्ष चंद्रशेखरन् यांना नाईटहूड सन्मान

**नवी दिल्ली :** भारत-ब्रिटन व्यावसायिक संबंध दृढ करण्यात दिलेल्या उत्कृष्ट योगदानाची दखल घेत ब्रिटिश सरकारने टाटा समूहाचे अध्यक्ष नटराजन् चंद्रशेखरन् यांना मानद 'नाईटहूड' सन्म ान प्रदान केला. बुधवारी रात्री येथे ब्रिटिश उच्चायुक्तांच्या निवासस्थानी आयोजित एका कार्यक्रमात, त्यांना 'नाईट कमांडर ऑफ द मोस्ट एक्सलंट ऑर्ड ऑफ द ब्रिटिश एम्पायर' (केबीई) हा सन्मान प्रदान करण्यात आला. टाटा समूह हा युनायटेड किंगडममधील एक दीर्घकालीन गुंतवणूकदार असून त्याचे कामकाज वाहन, पोलाद, तंत्रज्ञान आणि ग्राहक अशा विविध क्षेत्रां ध्ये विस्तारलेले आहे. यूकेमधील रोजगार, प्रगत उत्पादन आणि स्वच्छ तंत्रज्ञानाकडे होणारा संक्रमणकाळाला पाठिंबा देण्यात हा समूह महत्त्वाची भूमिका बजावतो, असे उच्चायुक्तालयाने एका निवेदनात म्हटले आहे. टाटा समूहाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी अनेक वर्षांपासून यूके-भारत व्यावसायिक संबंधांध्ये आणि यूकेमधील गुंतवणुकीत असाधारण योगदान दिले आहे, असे निवेदनात म्हटले आहे.

## धर्मांतराविरोधातील विधेयक छत्तीसगडमध्ये झाले पारित

**रायपूरू, १९ मार्च**
छत्तीसगड विधानसभेने बळजबरी, प्रलोभन, फसवणूक किंवा चुकीची माहिती देऊन होणारे धर्मांतर रोखण्याच्या उद्देशाने एक विधेयक पारित केले. यात सामूहिक धर्मांतराच्या प्रकरणांमध्ये जन्मठेपेच्या शिक्षेसह कठोर तरतुदी आहेत.

उपमुख्यमंत्री विजय शर्मा यांनी सभागृहात सादर केलेले 'छत्तीसगड धर्म स्वातंत्र्य विधेयक २०२६ मांडण्यापूर्वी ते विचारविनिमयासाठी निवडक समितीकडे सोपवावे ही काँग्रेस आमदारांची मागणी पीठासीन अधिकाऱ्यांनी फेटाळल्यानंतर काँग्रेस आमदारांनी केलेल्या बहिष्काराच्या पृष्ठभूमीवर आणि पाच तासांच्या चर्चेनंतर मंजूर करण्यात आले.

विधेयकावरील चर्चेदरम्यान गृहखात्याचीही जबाबदारी सांभाळणाऱ्या शर्मा यांनी काँग्रेसवर 'व्होट बँके'चे राजकारण करीत असल्याचा आरोप केला. शर्मा म्हणाले की, सध्याची परिस्थिती लक्षात घेऊन हे विधेयक सादर करण्यात आले. *(वृत्तसंस्था)*

## भविष्यातील युद्धांत ड्रोन निर्णायक : संरक्षणमंत्री

### भारताला स्वावलंबनाशिवाय पर्याय नाही

**नवी दिल्ली, १९ मार्च**
भविष्यातील युद्धांमध्ये ड्रोन आणि ड्रोनविरोधी तंत्रज्ञान निर्णायक ठरणार आहे. भारताला ड्रोन निर्मिती क्षेत्रात स्वावलंबी होण्याशिवाय पर्याय नाही. स्वावलंबन केवळ उत्पादन स्तरावरच नव्हे, तर घटक स्तरावरही आवश्यक आहे. ड्रोनच्या साच्यापासून ते सॉफ्टवेअर, इंजिन आणि बॅटरीपर्यंत सर्व काही भारतातच तयार होणे काळाची गरज असल्याचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह म्हणाले.



राजधानी दिल्लीत गुरुवारी राष्ट्रीय संरक्षण उद्योग परिषदेचे उद्घाटन राजनाथ सिंह यांच्या हस्ते पार पडले, तसेच त्यांनी 'डिफेन्स इंडिया स्टार्टअप चॅलेंज' च्या १४ व्या आवृत्तीचा शुभारंभ केला. यावेळी संबोधित करताना संरक्षण मंत्री म्हणाले, जागतिक आव्हाने सातत्याने वाढत आहेत. आधी रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्ध आणि आता इराण व इस्रायल यांच्यात सुरू असलेल्या युद्धामुळे ड्रोनचे महत्त्व लक्षणीयरीत्या वाढले आहे. भारताने एक मजबूत ड्रोन उत्पादन परिसंस्था विकसित करणे गरजेचे आहे. येत्या काही वर्षांत आपल्याला ड्रोन उत्पादनाचे जागतिक केंद्र बनावे लागेल. मध्यपूर्वेत सुरू असलेल्या संघर्षांनी ड्रोन आणि ड्रोनविरोधी तंत्रज्ञानाचे महत्त्व सिद्ध केले आहे. संपूर्ण जग रशिया आणि युक्रेन, तसेच इराण आणि इस्रायल यांच्यातील भीषण संघर्ष पाहत असताना, भविष्यातील युद्धांमध्ये ड्रोन आणि ड्रोनविरोधी तंत्रज्ञानाची महत्त्वपूर्ण भूमिका महत्त्वाची असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. *(वृत्तसंस्था)*

### इतरांवर अवलंबून राहणे धोक्याचे

**ड्रोन निर्मितीच्या महत्त्वासंदर्भात बोलताना त्यांनी सांगितले की, आजच्या काळात रणनीतिक स्वायत्तता, संरक्षण सज्जता आणि आत्मनिर्भरतेसाठी स्वदेशी ड्रोन उत्पादनाची परिसंस्था आवश्यक आहे. भारताच्या संरक्षण सज्जतेसाठी आणि सामरिक स्वायत्ततेसाठी, ड्रोन निर्मितीमध्ये पूर्णपणे आत्मनिर्भर होणे अत्यावश्यक आहे, इतरांवर अवलंबून राहणे धोक्याचे ठरेल.**

## इराणच्या तेलावरील निर्बंध हटवणार : बेसेंट

**वॉशिंग्टन, १९ मार्च**
जागतिक पुरवठा वाढवण्यासाठी आणि किमती नियंत्रित ठेवण्यासाठी लवकरच इराणवरील तेलाचे निर्बंध शिथिल केले जातील, अशी माहिती अमेरिकेचे महसूल सचिव स्कॉट बेसंट यांनी गुरुवारी दिली.

आखाती देशातील संघर्ष आणि होर्मुझ जलमार्गातील जहाजांची वाहतूक विस्कळीत झाल्याने जागतिक बाजारात कच्च्या तेलाचे दर उच्चांक गाठत आहे, अशातच किंमती नियंत्रणात ठेवण्यासाठी इराणच्या तेल विक्रीवर लादलेले निर्बंध काही काळासाठी हटवले जाऊ शकते, असे बेसेंट यांनी स्पष्ट केले. *(वृत्तसंस्था)*

# शेअर बाजार धडाडधम्

## जून २०२४ नंतरची सर्वात मोठी पडझड



**मुंबई, १९ मार्च**
जागतिक बाजारातील नकारात्मक संकेत आणि कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली मोठी वाढ यामुळे गुरुवारी भारतीय शेअर बाजारात मोठी पडझड झाली. गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या तेजीला पूर्णविराम देत सेन्सेक्स आणि निफ्टी या दोन्ही निर्देशांकांमध्ये ३ टक्क्यांहून अधिक घसरण नोंदविण्यात आली. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक 'सेन्सेक्स' २,४९६.८९ अंकांनी, म्हणजेच ३.२६ टक्क्यांनी घसरून ७४,२०७.२४ वर बंद झाला. जून २०२४ नंतरची ही एका दिवसातील सर्वात मोठी घसरण ठरली.

दिवसभरातील व्यवहारादरम्यान सेन्सेक्स २,७५३.१८ अंकांच्या घसरणीसह ७३,९५०.९५ या नीचांकी पातळीवर पोहोचला होता. दुसरीकडे राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक 'निफ्टी' ७७५.६५ अंकांनी कोसळून २३,००२.१५ वर स्थिरावला. एचडीएफसी बँकेतील मोठ्या विक्रीमुळे बँकिंग आणि वित्तीय क्षेत्रातील समभागांमध्ये ३ टक्क्यांपर्यंत घसरण दिसून आली. मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांकांतही प्रत्येकी २ टक्क्यांची घट झाली. *(वृत्तसंस्था)*

## चांदी-सोन्याचे दर गडगडले

**नवी दिल्ली, १९ मार्च**
मध्यपूर्वेत सुरू असलेल्या युद्धाचा फटका सोने-चांदीच्या दरालाही बसला आहे. गुरूवारी सोने तब्बल १२ हजार तर चांदीचे दर ३४ हजार रुपयांनी घसरले आहेत.

अमेरिकेच्या 'फेडरल रिझर्व्ह'ने व्याजदर स्थिर ठेवण्याच्या निर्णयामुळे सोने आणि चांदीचे दर गडगडले, असे सांगण्यात येत आहे. एमसीएक्सवर सोन्याच्या दरात जवळपास १२,००० रुपयांची चांदीच्या दरात जवळपास ३४,००० ची घसरण झाली आहे. मागील सत्रात ५ मे डिलिव्हरीची चांदी २,४८,१९४ प्रति किलोवर बंद झाली होती. परंतु आज ती २,४५,००० वर उघडली. *(वृत्तसंस्था)*




### सोन्याचीही चमक फिकी

**मागील सत्रात २ एप्रिलच्या डिलिव्हरीचे सोने १,५३,०२५ प्रति १० ग्रॅमवर बंद झाले होते. आज, ते १,५१,९४१ वर उघडले. व्यवहारादरम्यान, त्यात ११,९०४ ची घसरण होऊन ते १,४१,१२१ वर आले. सायंकाळी ७:१५ वाजता सोन्याचा भाव १०,००५ रुपये म्हणजेच सुमारे ७ टक्क्यांनी घसरून १४३,२५९ वर पोहोचला होता. ५ जूनच्या डिलिव्हरीच्या सोन्याच्या दरातही १०,००० रुपयांपेक्षा जास्त घसरण झाली.**

# प्रभू श्रीरामासमोर नतमस्तक होणे भारतमातेला वंदन करण्यासारखे

## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे प्रतिपादन




अयोध्या येथील राममंदिरात गुरुवारी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते श्रीराम यंत्राची स्थापना करण्यात आली. या कार्यक्रमाला उपस्थित उत्तर प्रदेशच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि रा. स्व. संघाचे अ. भा. निमंत्रित सदस्य भय्याजी जोशी

**अयोध्या, १९ मार्च**
राम जन्मभूमीवरील भूमिपूजन, येथील प्राणप्रतिष्ठा, भाविकांसाठी रामदरबाराचे उद्घाटन आणि मंदिराच्या शिखरावर धर्मध्वजाचे आरोहण हे सर्व आपल्या इतिहासातील सुवर्णक्षण आहेत. प्रभू श्रीराम यांच्यासमोर नतमस्तक होणे हे भारतमातेला वंदन करण्यासारखे आहे, असे उद्गार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काढले आहे. मुर्मू यांनी गुरुवारी अयोध्येला भेट देऊन रामललाचे दर्शन घेतले. याप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी रा. स्व. संघाचे अ. भा. निमंत्रित सदस्य भय्याजी जोशी उपस्थित होते.

'जय श्रीराम' या जयघोषाने आपल्या भाषणाची सुरुवात करताना त्या म्हणाल्या, ''भगवान श्रीरामाच्या आशीर्वादाने भारत २०२७ पर्यंत किंवा त्याआधी विकसित राष्ट्र बनू शकेल. निष्ठावान भक्त आणि भक्ती या दोघांचाही मार्ग एकच आहे. प्रभू श्रीरामचरणी नतमस्तक होणे आणि भारतमातेला वंदन करणे हे दोन्ही एकच आहे.''

या भेटीत त्यांनी विशेष धार्मिक विधींमध्ये सहभाग घेतला आणि 'श्रीराम यंत्र' म्हणून ओळखली जाणारी १५० किलो वजनाची सोन्याचा मुलामा असलेली धातूची पट्टी स्थापित केली. राष्ट्रपती म्हणाल्या की, जी भावना प्रभू रामाप्रती भक्तीची प्रेरणा देते, तीच भावना देशभक्तीचीही प्रेरणा देते. ज्या हृदयांमध्ये 'नमामि रामं रघुवंश नाथम्'चे सूर उमटतात, त्याच हृदयातून आपले राष्ट्रगीत 'वंदे मातरम्' गायले जाते. भारत एका विकसित आणि समताधिष्ठित समाजाच्या उभारणीच्या दिशेने सातत्यपूर्ण प्रगती करीत आहे. अशा समाजाची संकल्पना गोस्वामी तुलसीदासांनी वर्णन केलेल्या रामराज्याच्या कल्पनेत प्रतिबिंबित झालेली दिसते.

रावणाचा वध केल्यानंतर माता सीता आणि लक्ष्मण यांच्यासह भगवान श्रीरामांचे अयोध्येत झालेल्या आगमनाचे अत्यंत कलात्मक असे रेखाचित्र आपल्या संविधानाच्या मूळ प्रतीमध्ये सुशोभित करण्यात आले आहे. ही रेषाकृती मूलभूत हक्कांच्या अत्यंत महत्त्वाच्या अशा तिसऱ्या भागाच्या सुरुवातीला आढळते, असे मुर्मू म्हणाल्या. *(वृत्तसंस्था)*

### अयोध्या स्वर्गाहून श्रेष्ठ

**प्रभू श्रीरामाला अयोध्या स्वर्गाहून प्रिय आहे आणि या पवित्र भूमीला भेट देण्याची संधी मिळाल्याबद्दल मुर्मू यांनी कृतज्ञता व्यक्त केली. धर्मग्रंथांमधील संदर्भांची आठवण करून देत त्या म्हणाल्या, प्रभू श्रीरामचंद्रांनी स्वतः आपल्या जन्मस्थानाचे वर्णन स्वर्गाहूनही श्रेष्ठ असे केले आहे. 'रामचरितमानस'मध्ये प्रभू श्रीराम सीताजींना सांगतात की, जरी सर्वांनी वैकुंठाचे माहात्म्य वर्णिले असले, तरी मला अवधपुरीच अधिक प्रिय वाटते.**

## अग्रलेख...

# बहुरूपी, बुभुक्षित भोंदू!

कोणत्याही एखाद्या उत्पादनास किंवा सेवेस मोठी मागणी असल्याचे सिद्ध होऊ लागते तेव्हा मागणीनुसार पुरवठा करणाऱ्यांची गर्दीही वाढू लागते, आणि मागणी वाढू लागली की त्या उत्पादन किंवा सेवेची किंमतही वाढत जाते, हा अर्थशास्त्राचा सामान्य नियम अध्यात्माच्या बाजाराला तंतोतंत लागू ठरताना दिसत आहे. असे झाले की वस्तू वा सेवांचा दर्जा खालावतो, भेसळीसारखे प्रकार वाढतात आणि काळाबाजारासही ऊत येतो. अलिकडे असंख्य संकटे आणि समस्यांचा सार्वत्रिक सुळसुळाट झालेला असताना व त्यापासून संरक्षण करण्याची हमी देणाऱ्यांचे हात मात्र तोकडे ठरत असताना, समाज किंवा व्यक्ती संरक्षणाच्या अपेक्षेने कोठे तरी नजरा खिळवून बसलेली असते. ज्यांचे हात वरपर्यंत वगैरे पोहोचलेले असतात, खिसे कायम खुळखुळत असतात, अशांना असे संरक्षण मिळविणे फारसे अवघड होत नाही. पण असा वर्ग फारच थोडा असून ज्यांची तशी क्षमता नाही, त्यांना मात्र समस्यामुक्ती आणि संकटांपासून संरक्षणासाठी देवावर किंवा नियतीवर अवलंबून राहणे भाग पडते. कोणत्याही समस्येमुळे ईश्वराने किंवा दैवाने मार्ग काढून द्यावा अशी हतबल भावना जेव्हा सामूहिकरीत्या वाढीस लागते, तेव्हा अशा हतबलांची गर्दी श्रद्धेच्या बाजारात सुरक्षिततेचा शोध घेऊ लागते आणि या बाजारातील सेवा किंवा उत्पादकांची मागणी वाढू लागली की पुरवठादारांची चंगळ सुरू होते. बाजाराचा हा नियम श्रद्धेच्या बाजारातही लागू ठरू लागला, तेव्हापासून अनेकांनी या बाजारात आपली आपली दुकाने थाटली. गेल्या काही दशकांपासून या बाजारात कायम तेजीच दिसत असून येथील दुकानदारांची भरभराट होत असल्याचे दिसते. कारण, या बाजारात मानसिक गरजांची पूर्तता होते अशी भावना असलेल्या ग्राहकांकडून दुकानदारांच्या दारी रीघ लागलेलीच असते. त्यामुळे दिवसागणिक कोठल्या ना कोठल्या गावात, शहरात किंवा देशाच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात एखादा बाजारू दुकानदार आपले दुकान सुरू करतो, आपल्या पद्धतशीर यंत्रणेद्वारे लाखो रुपये खर्च करून जोरदार जाहिरातबाजी करतो आणि असे नवे दुकान सुरू झाल्याचे कळताच, तिकडे गरजू ग्राहकांची रीघ लागते. या व्यवसायाची साखळी मोठी गूढ असते. तो धंदा बघता बघता फोफावतो आणि मानसिक सुखाच्या भ्रामक कल्पनांत गुरफटलेला ग्राहकही त्या दुकानाची जाहिरात करू लागतो. अशा रीतीने अध्यात्म, ज्योतिष, भविष्यज्ञान, संकटमुक्ती, प्रेमविवाह, प्रतिष्ठा, राजकीय यश, संपत्तीच्या समस्या, कौटुंबिक कलह, अपत्यप्राप्ती अशा असंख्य समस्यांनी ग्रासलेले ग्राहक या दुकानदारांकडे रांगा लावतात. या बाजारातील प्रत्येक दुकानदाराने आपल्या धंद्याला साजेसा अवतार धारण केलेला असतो. यासाठी फार मोठी भांडवली गुंतवणूकही केलेली असते. प्रथमदर्शनी संकटमोचक भासावा असा एक मुखवटा त्यांना धारण करावा लागतो. त्यांच्या चेहऱ्यावर एक निरागस हास्य विलसत असते. अंगी ईश्वरी किंवा अतिमानवी शक्ती असल्याची जाणीव करून देणारा बाह्यांगी साधेपणा त्यांना धारण करावा लागतो आणि वैराग्याची किंवा विरक्तीची चिन्हे असलेली वेषभूषा परिधान करून आध्यात्मिक तेजाची झळाळी असलेल्या मुखवट्याआड मूळचा चेहरा बेमालूम झाकून ठेवावा लागतो. दैवी शक्तीचा वास असल्याचा भास व्हावा यासाठी मठ किंवा आश्रम नावाच्या या दुकानात धूप, अगरबत्त्या, चंदनादी पूजावस्तूंची गर्दी ठेवावी लागते आणि भक्तगण जमा होऊ लागले की दिशाभूल करण्यासाठी एखाद्या चमत्काराची जादूही त्यांनी आत्मसात करून ठेवावी लागते.

असेच एक दुकान महाराष्ट्राच्या अहिल्यानगर आणि नाशिक परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून जोमाने धंदा करत होते. त्याच्या नादी लागलेल्या ग्राहकांमध्ये सर्वच प्रकारचे भक्त असल्याने, त्याच्या धंद्याला संरक्षणाचे कवचही लाभल्याची चर्चा होती. राजकीय नेते, मंत्री, प्रतिष्ठित उद्योजक, सामान्य समस्याग्रस्त अशा सर्वांना या भक्ताने समस्यामुक्तीचा भविष्यवेधी मार्ग दाखविणारे दुकान सुरू केले आणि फसवणुकीच्या एका प्रकरणात त्याचा मुखवटा टराटरा फाटला. भविष्यवेध घेऊन समस्यामुक्तीचा मार्ग दाखविण्याचा दावा करणारा कॅप्टन खरात नावाचा हा भोंदू म्हणजे केवळ एका व्यक्तीच्या विकृत गुन्हेगारी प्रवृत्तीचे उदाहरण नाही; तर ते आपल्या समाजाच्या मानसिकतेतील खोलवर दडलेल्या अंधश्रद्धा, भीती आणि आंधळ्या श्रद्धेच्या जाळ्याचे भयावह चित्र उलगडणारे आणखी एक उदाहरण आहे. स्वतःला आध्यात्मिक मार्गदर्शक, ज्योतिषी आणि 'दैवी शक्तीचा धनी' म्हणविणाऱ्या या भोंदू दुकानदाराने असाच, आध्यात्मिक मुखवटा चढविला आणि कोणत्या ना कोणत्या समस्यांच्या भयाने पछाडलेल्या महिलांना मुक्तीचा विश्वास देत त्यांच्या शारीरिक आणि मानसिक शोषणाची आपली विकृती जोपासत राहिला. कॅप्टन खरात प्रकरण ही बाब जितकी धक्कादायक आहे, तितकीच सामाजिक मानसिकतेच्या बदलांचा अंतर्मुखपणे विचार करावयास भाग पाडणारी आहे. उपाय, विधी, कुंडली दोष किंवा दैवी संकट यांसारख्या संकल्पनांच्या आडून लोकांना भयभीत करणे आणि त्यातून स्वतःसाठी सत्ता व नियंत्रण निर्माण करणे ही या भोंदूची या बाजारातील युक्ती नवीन नाही. मात्र, या प्रकरणात ती अत्यंत योजनाबद्ध आणि क्रूर स्वरूपात वापरली गेल्याचे दिसते. गुंगीची औषधे देऊन अत्याचार करणे आणि त्याचे चित्रीकरण करून त्यांची पिळवणूक वा शोषण करणे ही केवळ वैयक्तिक गुन्हेगारी नाही; तर ती संघटित शोषण व्यवस्थेची लक्षणे आहेत. यामागील सामाजिक पृष्ठभूमीही दुर्लक्षित करता येणार नाही. आधुनिक शिक्षण, विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीनंतरही समाजातील मोठा वर्ग अजूनही अंधश्रद्धेच्या पाशात अडकलेला आहे. संकटाच्या क्षणी तर्कबुद्धीपेक्षा 'आशीर्वाद देऊन संरक्षणाची हमी देणारा कोणीतरी वरचा हात' शोधण्याची मानसिकता अजूनही प्रबळ आहे. अशा वेळी 'कॅप्टन खरात'सारखे भोंदू स्वतःला देवदूत किंवा मार्गदर्शक म्हणून उभे करतात आणि लोकांच्या भीतीचा फायदा घेतात. या प्रकरणात राजकीय आणि प्रभावशाली व्यक्तींशी असलेले संभाव्य संबंध ही बाब अधिक गंभीर म्हणावी लागेल. अशा विकृत प्रवृत्तींना किंवा व्यक्तींना सामाजिक किंवा राजकीय संरक्षण मिळत असेल, तर न्यायव्यवस्थेवरचा विश्वास डळमळीत होणे अपरिहार्य आहे. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी केवळ गुन्हेगाराला शिक्षा देण्यापुरती मर्यादित राहू नये; तर त्या मागील साखळी, संबंध आणि संभाव्य संगनमत उघड करणेही तितकेच आवश्यक आहे. महिला सुरक्षेच्या दृष्टीनेही हे प्रकरण म्हणजे धोक्याचा एक गंभीर इशारा आहे. घर, कार्यालय किंवा सार्वजनिक ठिकाणांबरोबरच 'आध्यात्मिक' किंवा 'धार्मिक' जागाही सुरक्षित आहेत, असा समज या घटनेने खोटा ठरवला आहे. महिलांच्या विश्वासाचा गैरवापर करून केलेले शोषण हे समाजाच्या नैतिक अध:पतनाचे द्योतक आहे. त्यामुळे महिलांनी अशा तथाकथित गुरू, बाबांबाबत अधिक सजग राहणे आणि कोणत्याही संशयास्पद वर्तनाची त्वरित तक्रार करणे आवश्यक आहे. गेल्या अनेक दशकांत वारंवार उघडकीस येत असलेल्या अशा घटनांतून समाज जागृतीचे आणि श्रद्धा व अंधश्रद्धा यांतील धूसर सीमरेषा दाखवून देण्याचे महत्त्वही पुन्हा अधोरेखित होते. महाराष्ट्राने यापूर्वीही कायदे किंवा मोहिमांतून समाजजागृती केली आहे; परंतु अजूनही ती अपुरी आहे. शिक्षण व्यवस्थेत वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवणे, माध्यमांनी जबाबदारीने अशा प्रकरणांचा पाठपुरावा करणे आणि प्रशासनाने कठोर कारवाई करणे, या तिन्ही गोष्टी एकत्रितपणे घडल्याशिवाय बदल संभवत नाही. कॅप्टन खरात प्रकरणातून पुन्हा तोच जुना मूलभूत प्रश्न पुढे आला आहे. आपण खरोखरच पुरोगामी, प्रगतिशील, आधुनिक, विवेकनिष्ठ समाज आहोत, की संकटाच्या वेळी अजूनही आपण अंधश्रद्धेच्या आहारी जाऊन अंधश्रद्धांच्या बाजारपेठांतील भोंदू बहुरुप्यांची भरभराट करतो, या प्रश्नाचे उत्तर शोधणे ही केवळ सरकार किंवा न्यायव्यवस्थेची जबाबदारी नाही. विवेक, विज्ञाननिष्ठा आणि सामाजिक जबाबदारी या मूल्यांचा स्वीकार केल्याशिवाय अशा घटनांची पुनरावृत्ती थांबणार नाही हे स्पष्ट असल्याने, ही समाजाची जबाबदारी ठरते. अन्यथा 'कॅप्टन खरात' ही केवळ एक व्यक्ती न राहता एक प्रवृत्ती बनत जाईल आणि तीच सर्वांत मोठी धोक्याची घंटा ठरेल.

---

## अर्थविशेष

हितेश पारसे

# दोन मालमत्ता विकून एक घर घेतल्यास भांडवली नफा कर कसा वाचवता येतो?

आजच्या काळात अनेक व्यक्तींकडे एकापेक्षा जास्त स्थावर मालमत्ता असणे, ही सामान्य बाब झाली आहे. नोकरी, व्यवसाय किंवा गुंतवणुकीच्या उद्देशाने लोक वेगवेगळ्या काळात फ्लॅट, घर किंवा प्लॉट खरेदी करतात. काही वर्षांनंतर परिस्थिती बदलते आणि अनेक जण दोन लहान मालमत्ता विकून एक मोठे किंवा चांगल्या ठिकाणचे घर खरेदी करण्याचा निर्णय घेतात. अशा व्यवहारांमध्ये सर्वांत महत्त्वाचा प्रश्न म्हणजे भांडवली नफा कर. योग्य नियोजन केले नाही, तर लाखो रुपयांचा कर भरावा लागू शकतो. मात्र, आयकर कायद्यातील काही तरतुदींचा योग्य वापर केल्यास हा कर पूर्णपणे किंवा मोठ्या प्रमाणात वाचवता येतो. हा लेख अशाच व्यावहारिक परिस्थितींचे सविस्तर स्पष्टीकरण देतो.

**भांडवली नफा कर कसा लागू होतो?** : जेव्हा एखादी व्यक्ती स्थावर मालमत्ता (फ्लॅट, घर, प्लॉट किंवा जमीन) विकते आणि त्या विक्रीतून नफा मिळतो, तेव्हा त्या नफ्यावर आयकर कायद्यानुसार कर आकारला जातो. जर मालमत्ता २४ महिन्यांपेक्षा जास्त काळ धरून ठेवली असेल, तर त्या नफ्यावर दीर्घकालीन भांडवली नफा (एलटीसीजी) लागू होतो.

२० टक्के की १२.५ टक्के - योग्य पर्याय कोणता? हे निवडण्याचा पर्याय फक्त ज्यांनी संपत्ती २३/०७/२०२४ च्या आधी संपादित केली आहे, त्यांच्यासाठीच उपलब्ध आहे. सध्या एलटीसीजीसाठी दोन पर्याय उपलब्ध आहेत

**१.२० टक्के कर (अनुक्रमणिका सह)**

• खरेदी किंमत इंडेक्सेशनने वाढवली जाते, • महागाईचा फायदा मिळतो, • दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी फायदेशीर

**२. १२.५ टक्के कर (अनुक्रमणिका शिवाय)** • नवीन पर्याय

• सोपी गणना, • काही प्रकरणांमध्ये कमी कर लागू होऊ शकतो

करदात्याने व्यवहारानुसार योग्य पर्याय निवडणे आवश्यक आहे.

**कलम ५४ - निवासी घर विकल्यास सवलत** : जर एखाद्या व्यक्तीने निवासी घर विकून दुसरे निवासी घर खरेदी केले, तर कलम ५४ अंतर्गत सवलत मिळते. **अटी** : • विकलेली मालमत्ता निवासी घर असावी, • नवीन मालमत्ता निवासी घर असावी

**खरेदी/बांधकाम कालावधी** : • विक्रीपूर्वी १ वर्ष, • विक्रीनंतर २ वर्षे • ३ वर्षांत बांधकाम

**कलम ५४एफ - प्लॉट किंवा जमीन विकल्यास सवलत** : जर प्लॉट किंवा जमीन विकून नवीन घर घेतले, तर कलम ५४ लागू होतो.

**अटी** : • विक्रीच्या दिवशी एकापेक्षा जास्त निवासी घर नसावे, • संपूर्ण विक्री किंमत गुंतवणे आवश्यक, • अंशतः गुंतवणूक केल्यास आनुपातिक सवलत

व्यावहारिक कर नियोजन - महत्त्वाच्या परिस्थिती

**परिस्थिती १** : दोन फ्लॅट विकून एक नवीन फ्लॅट

समजा : • फ्लॅट १ नफा : ३० लाख रुपये, • फ्लॅट २ नफा : २५ लाख रुपये. एकूण भांडवली नफा : ५५ लाख

जर ७० लाख किमतीचा नवीन फ्लॅट खरेदी केला, तर कलम ५४ अंतर्गत संपूर्ण ५५ लाख सवलत मिळू शकते.

**परिस्थिती २** : एक फ्लॅट आणि एक प्लॉट विकून एक घर खरेदी करणे

समजा : • फ्लॅट नफा : ३५ लाख - कलम ५४, • प्लॉट नफा : २५ लाख - कलम ५४. एकूण नफा : ६० लाख

**येथे सर्वांत महत्त्वाचा मुद्दा** : कलम ५४एफ साठी अट आहे की, विक्रीच्या दिवशी करदात्याकडे एकापेक्षा जास्त निवासी घर नसावे. म्हणून व्यवहाराचा क्रम अत्यंत महत्त्वाचा ठरतो. **योग्य पद्धत** : • प्रथम फ्लॅट विकणे, • त्यानंतर प्लॉट विकणे, • आणि मग नवीन घर खरेदी करणे

**योग्य नियोजन केल्यास** : • ३५ लाख (कलम ५४), • २५ लाख (कलम ५४ एफ) एकूण ६० लाख पूर्णतः करमुक्त होऊ शकतो.

चुकीचा क्रम ठेवल्यास कलम ५४ एफ सवलत नाकारली जाऊ शकते.

**परिस्थिती ३** : दोन मालमत्ता विकून नवीन घर बांधणे

**समजा** : • एकूण विक्री रक्कम : १.५० कोटी रुपये, • भांडवली नफा : ७० लाख रुपये

**जर** : प्लॉट खरेदी केला आणि ३ वर्षांच्या आत घर बांधले- कलम ५४/५४एफ अंतर्गत सवलत मिळू शकते

**भांडवली नफा खाते योजना (सीजीएएस) चे महत्त्व** : अनेक वेळा मालमत्ता विकली जाते, पण लगेच नवीन गुंतवणूक करता येत नाही.

**अशा वेळी** : • आयटीआर भरण्याच्या अंतिम तारखेपूर्वी सीजीएएस खात्यात रक्कम जमा करणे आवश्यक. अन्यथा कर सवलत मिळणार नाही.

**व्यवहार करताना होणाऱ्या सामान्य चुका**

• कलम ५४ आणि ५४ एफ मधील फरक न समजणे, • ५४ एफ पात्रता (एकापेक्षा जास्त घरांचा नियम), • दुर्लक्षित करणे, • व्यवहाराचा चुकीचा क्रम ठेवणे, • सीजीएएसमध्ये रक्कम जमा न करणे, • पूर्ण रक्कम गुंतवणूक न करणे. **निष्कर्ष** : दोन मालमत्ता विकून एक नवीन घर खरेदी करणे ही केवळ गुंतवणूक नसून, एक कर नियोजनाची संधी आहे.

**योग्य नियोजन केल्यास** : • कलम ५४, • कलम ५४एफ, • आणि २० टक्के विरुद्ध १२.५ टक्के कर पर्याय

सामान्य वाचकांसाठी एक गोष्ट लक्षात ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे की, मालमत्ता खरेदी-विक्री ही केवळ गुंतवणूक किंवा गरज पूर्ण करण्याची प्रक्रिया नसून, ती एक महत्त्वाची कर नियोजनाची संधी देखील असते. अनेक वेळा योग्य माहितीच्या अभावामुळे किंवा घाईघाईत घेतलेल्या निर्णयांमुळे अनावश्यक भांडवली नफा कर भरावा लागतो. प्रत्यक्षात, आयकर कायद्यातील उपलब्ध तरतुदींचा योग्य आणि वेळेवर वापर केल्यास मोठ्या प्रमाणात कर बचत करता येते. त्यामुळे कोणतीही मालमत्ता विकण्यापूर्वी व्यवहाराचा क्रम, गुंतवणुकीचा कालावधी आणि संबंधित सवलतींची अटी समजून घेणे आवश्यक आहे. योग्य सल्ला आणि नियोजन केल्यास आपण केवळ चांगली मालमत्ता मिळवू शकत नाही, तर आपल्या आर्थिक फायद्याचाही जास्तीत जास्त लाभ घेऊ शकतो.

(९०९६३३२३५३, कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार)

---

## वेध

रेवती जोशी-अंधारे

# मानवजात अधिक रानटी होतेय का?

सध्याचे जग एका विचित्र वळणावर उभे आहे. विज्ञान-तंत्रज्ञानाने अभूतपूर्व प्रगती साधली, मानवाने चंद्र-मंगळ गाठला, कृत्रिम बुद्धिमत्ता दैनंदिन आयुष्याचा भाग झाली; पण अशा नव्या आकांक्षांच्या, स्वप्नांच्या काळात पृथ्वीवर संघर्षांचे, युद्धांचे सावट अधिक गडद होताना दिसते. एका बाजूला विकासाची चकाकी, तर दुसऱ्या बाजूला विनाशाची छाया अशा संघर्षात मानवजात अडकलेली आहे. सध्या जगात अनेक ठिकाणी संघर्ष पेटलेले आहेत. इराण-इस्रायल-अमेरिका हा संघर्ष ताजा आहे. त्याने सारे जग वेठीस धरले आहे. युक्रेन आणि रशिया यांच्यातील युद्धाने दोन वर्षांहून अधिक काळ जगात अस्थिरता निर्माण केली आहे. हे सारे संघर्ष भूभागांसाठी तर आहेतच, शिवाय सामरिक वर्चस्व, राजकीय वर्चस्व आणि जागतिक सत्ता-संतुलनाचा प्रश्न याच्याशी संबंधित आहे. गाझा पट्टी आणि इस्रायल यांच्यातील संघर्षाने मानवी संकटाची परिसीमा गाठली आहे. हजारो निरपराध नागरिकांचे जीव जात आहेत आणि युद्धाचे नियमही पायदळी तुडवले जात आहेत. सुदानमध्ये अंतर्गत सत्तासंघर्षामुळे गृहयुद्ध सुरू आहे. म्यानमारमध्ये सैन्य आणि लोकशाही समर्थक यांच्यातील संघर्ष अजूनही शांत झालेला नाही. येमेनमध्ये अनेक वर्षांपासून सुरू असलेले युद्ध हे मानवांसाठी आपत्तीचे मोठे केंद्र बनले आहे. सीरियात दशकभर चाललेल्या युद्धाने संपूर्ण पिढी उद्ध्वस्त केली आहे. हे सगळे पाहता, संघर्षांची संख्या मोजणेही अवघड झाले आहे. संघर्षांचे स्वरूपही बदलले आहे.

पूर्वीची युद्धे राष्ट्रांमध्ये थेट होत असत; आज युद्धे बहुआयामी झाली आहेत. आर्थिक निर्बंध, माहिती युद्ध (इन्फर्मेशन वॉरफेअर), सायबर हल्ले आणि दहशतवादी कारवाया ही सगळी आधुनिक युद्धाची रूपे आहेत. शत्रू सीमारेषेच्या पल्याड आहे तसा तो इंटरनेटच्या जाळ्यातही आहे. त्यामुळे युद्ध अधिक गुंतागुंतीचे, अधिक व्यापक झाले आहे. या पृष्ठभूमीवर सर्वांत मोठा प्रश्न उभा राहतो तो असा की, प्रगती-प्रगती म्हणत असताना मानवजातीने नेमके काय साध्य केले? आजही जगात कोट्यवधी लोक भुकेने त्रस्त आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या अहवालांनुसार, अन्नाची कमतरता आणि कुपोषण ही गंभीर जागतिक समस्या आहे. शिक्षणाच्या क्षेत्रातही मोठी तफावत आहे. अनेक देशांमध्ये मुलांना प्राथमिक शिक्षणही मिळत नाही. म्हणजेच, एकीकडे शस्त्रास्त्रांवर अब्जावधी डॉलर्स खर्च होत आहेत, तर दुसरीकडे मूलभूत गरजांसाठी निधी अपुरा पडतो. युद्धांमुळे निर्माण झालेल्या शस्त्रास्त्रांच्या नव्या स्पर्धेने या संकटात भर घातली आहे. इराणकडून या युद्धात जी शस्त्रास्त्रे दाखविली जात आहेत, त्यावरून त्या देशाने किती खर्च केला असेल, याची कल्पना येते. अण्वस्त्रांची संख्या, अत्याधुनिक क्षेपणास्त्रे, ड्रोन तंत्रज्ञान या सर्व गोष्टींवर प्रचंड खर्च केला जातो. हा पैसा जर शिक्षण, आरोग्य आणि गरिबी निर्मूलनासाठी वापरला गेला असता, तर जगाचे चित्र वेगळे असते. पण वास्तव वेगळे आहे. भीती आणि अविश्वास यांच्या आधारेच जगाचे राजकारण चालते. यामुळेच एक मूलभूत प्रश्न निर्माण होतो आणि तो असा की- जग अधिक रानटी होत आहे का? की हीच प्रगतीची किंमत आहे? वस्तुस्थिती अशी आहे की मानवाचे बाह्य जीवन अधिक आधुनिक झाले असले, तरी अंतर्मनातील संघर्ष संपलेले नाहीत. लोभ, सत्तेची लालसा, वर्चस्वाची इच्छा या मानवी प्रवृत्ती अजूनही तशाच आहेत. त्यामुळे तंत्रज्ञान बदलले, पण मनुष्याचा मूलभूत स्वभाव फारसा बदललेला नाही. ही स्थिती बदलायची असेल तर जागतिक पातळीवर संवाद आणि कूटनीती (डिप्लोमसी) यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. देशांनी आपले मतभेद चर्चेने सोडवण्याची तयारी ठेवली पाहिजे. दुसरे म्हणजे, आंतरराष्ट्रीय संस्थांची भूमिका अधिक प्रभावी होणे गरजेचे आहे. संयुक्त राष्ट्रांसारख्या संस्थांनी केवळ निवेदने देण्यापेक्षा ठोस कारवाई करण्याची गरज आहे. मानवाचेच निर्णय मानवाचे भविष्य ठरवतील. आपण विनाशाचा मार्ग निवडला, तर सभ्यतेचा व प्रगतीचा मुखवटा टिकणार नाही, हे सर्वांनी लक्षात ठेवले पाहिजे.



९८५०३३९२४०

---

## प्रासंगिक

प्रमोद डोरले

# भारतीय संस्कृतीचा शाश्वत आधारस्तंभ

रामायण आणि महाभारत ही महाकाव्ये भारतीय संस्कृतीचे दोन शाश्वत आधारस्तंभ आहेत. सांस्कृतिक जीवनाच्या वाटचालीत पडझडीत, विविध आक्रमण कालातील अंधारलेल्या युगात, सत्याचा, धर्माचा, जीवन मर्यादांचा दिव्य प्रकाश दाखविणारे दीपस्तंभ म्हणून ही दोन महाकाव्ये आधुनिक काळातही वैचारिक, तात्त्विक ज्ञानात्मक मार्गदर्शन करण्याची क्षमता ठेवू शकतात. या दृष्टीने ही दोन महाकाव्ये अक्षर वाङ्मय या कसोटीला पूर्ण न्याय देणारी अशीच आहे. व्यासोच्छिष्ट जगत सर्वम् ही उक्ती आजही सार्थ ठरते आहे. रामायण आणि महाभारत या ग्रंथातील तत्त्वज्ञानाने भारतीय संस्कृतीला नीतिमूल्यांचे, जीवनाच्या शाश्वत, चिरंतन मूल्यांचे अधिष्ठान मिळाले आहे. त्यांतील महन्मंगल आणि उदात्त चारित्र्याच्या गुण संस्कारांमुळे येथील समाजमनाचे पोषण झाले. विकसन झाले. आसेतुहिमाचल पसरलेल्या या देशात सांस्कृतिक एकता निर्माण होऊ शकली. त्याच एकात्मतेच्या जोरावर अनेक भीषण आक्रमणाचे आघात ही संस्कृती पचवू शकली हे जगाने अनुभवलेले सत्य आहे

सूर्यवंशी इक्ष्वाकू कुळात जन्मलेले प्रभू श्रीरामचंद्र हे मर्यादा पुरुषोत्तम आहेत. महर्षी श्री वाल्मीकिंच्या दिव्य प्रतिभेतून साकार झालेले हे महन्मंगल चरित्र! व्यक्तिमत्त्व! मानवी जीवनाशी संबंधित असलेल्या सर्व भूमिकांचा परमोच्च उत्तुंग आदर्श म्हणजे प्रभु श्रीरामचंद्र! रामराज्याची निर्मिती करणारा आदर्श राजा, वडिलांनी दिलेल्या वचनपूर्तीसाठी सिंहासनावर पडणारे पाऊल दुसऱ्याच क्षणाला वनातील कंट-काकीर्ण मार्गावर टाकून रघुकुल रीत सदा चली आयी -- प्राण जाय पर वचन न जायी- हा रघुवंशाचा वारसा जोपासणारा आदर्श पुत्र, रावणाने सीतामाईला पळवून नेल्यानंतर व्याकुळतेने, हे सीते! हे सीते म्हणून आक्रोश करणारा, विरहाग्नीत पोळणारा आदर्श पती, सुग्रीवावरील अन्याय दूर करून त्याला योग्य तो न्याय मिळवून देणारा परम मित्र, युद्धात लक्ष्मणाला शक्तीचा आघातामुळे आलेल्या मूर्च्छावस्थेत भावुक होऊन विलाप करणारा ज्येष्ठ बंधू, कैकेयीने अन्याय केलेला असतानाही कौसल्येपेक्षाही तिला अधिक मान देणारा पुत्र, सामान्य वनवासी जीवन जगणाऱ्या गुहाला सन्मानाने मित्र म्हणून स्वीकार करणारा हितैषी, सर्वप्रकारच्या सामर्थ्याने सुसज्ज असलेल्या दानवी, मायावी सामर्थ्याने युक्त आणि प्रत्यक्ष देवांनाही पराजित करणाऱ्या असुर शक्तीचा सहजपणे पराभव करणारा वीराग्रणी नेता, रावणाचा वध झाल्यानंतर मरणान्तानि न वैराणि न मे कृतानिच- चा शत्रुभावना विरहिततेचा मानवधर्माचा मापदंड प्रस्थापित करणारा महामानव आणि अयोध्येला परत आल्याबरोबर आपली मातृभूमी म्हणून तिला वंदन करून 'जननी जन्मभूमिश्च स्वर्गात अपि गरियसी' या श्रेष्ठतम राष्ट्रभक्तीचा आदर्श प्रस्थापित करणारा, पुण्यभूमी धर्मभूमी, देवभूमी भारतमातेचा सुपुत्र अशा अनेक विलोभनीय जीवनादर्शानी विनटलेले असे हे मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्री रामचंद्रांचे चरित्र!



महर्षी श्री वाल्मीकिंच्या दिव्य प्रतिभेतून प्रकट झालेल्या या रामायण महाकाव्याचा, त्यांतील विविध व्यक्तिजीवनाचा प्रभाव विश्वव्यापी आहे. विश्वसंचार करणाऱ्या आपल्या पूर्वजांनी ही रामकथा आपल्या सोबत जगाच्या विविध देशांमध्ये नेली. ते परत आलेत पण जीवनजगण्याचे तत्त्वज्ञान शिकविणारी रामकथा तेथे रुजली - विकसित झाली. त्यांच्याही जीवनाचे एक अविभाज्य अंग झाली. त्यांच्या साहित्यात, आचरणात, समाजजीवनात, राष्ट्रजीवनात, परंपरागत मूल्यांमध्ये विसावली, प्रतिबिंबित झाली. रामकथेच्या प्रभावाने प्रभावित झालेले देश म्हणून आज आपण चीन, तिबेट, सायबेरिया, कांबोडिया (कम्बुज) इंडोनेशिया, इत्यादी अनेक देशांची नावे घेऊ शकतो. रामन् रवागान् म्हणजे रामकथा, रामायण हे त्यांच्या जीवनाचे मार्गदर्शन करणारे पाथेय आहे. उदाहरण म्हणून आपण काही उल्लेख पाहू.

सायवेरियातील रामकथेत रिच्छेन पाल्साङ्गे या लेखकाने लोकांना उपदेश करताना असे म्हटले आहे की, ओलान-दुर आरव, बोलुग्रासन येरवे रवुमन् देमि, आलिया नागादुम्बा। ओख्यु आमुर सांगुरक्कुवा इंद्रेन, ओम्बागान दूर नेङ्ग उलु शिनुग्युयाई। ओल्ज गुसेल दुर नेङ्ग येसे शिनुस्सेन उ गेम इयरे। ओरिदुमान्गोस उन निगेन रवागान लंगा-दुर आलाग्दासान्'' म्हणजे -- जनतेच्या नेत्यांनी, महापुरुषांनी क्षुल्लक अशा आनंदात मग्न होऊ नये. विषयलंपट होऊ नये. लोभात पडल्याने व कामवश झाल्याने प्राचीन काळी राक्षसराज रावण लंकेत मारला गेला. इंडोनेशियातील रामायणाला काकाविन रामायण असे म्हणतात. त्यात श्रीराम भरताला उपदेश करताना म्हणतात- हे भरता! चारित्र्याचे रक्षण कर. राग द्वेष सोडून दे. ईर्ष्या आदि दोषांपासून मन आणि शरीर शून्य कर. अत्याधिक अहंकारापासून स्वतःला वाचव. निंदा करू नकोस. कुलीन घराण्याचा गर्व बाळगू नकोस. हे भरता हाच खरा धर्म आहे व हेच खरे सत्य आहे. श्रीरामाचा उपदेश ऐकून भरत अयोध्येला परत गेला आणि भक्तिपूर्वक राज्य रक्षणात व्यग्र राहिला 'भरत सिर तमोल-भक्ति मंराक्ष राज्य'. - अशी ही ब्रह्मांडाला व्यापून असणारी रामकथा संपूर्ण मानव समाजाच्या मनावर अधिराज्य गाजवणारी! मानवी जीवनाचा उद्देश काय? त्याला अर्थ केव्हा आणि कसा प्राप्त होतो. मानवी जीवनात पार पाडाव्या लागणाऱ्या या विविध भूमिकांमध्ये। कर्तव्यनिष्ठेच्या अंतिम मर्यादा कशा व कोणत्या? वरील सर्व मूलभूत प्रश्नांची, हिंदू धर्म, परंपरा, संस्कृती यांना साक्षी ठेवून महर्षी वाल्मीकिंनी हा ग्रंथ लिहिला आहे. विविध व्यक्तिरेखांच्या माध्यमातून त्याचा मर्मग्राही आलेख स्पष्ट केला आहे. रामायणातील व्यक्तिरेखा दशरथ, कौसल्या, कैकेयी, सुमित्रा, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न, सीता, हनुमान, वाली, सुग्रीव, विभीषण, रावण, कुंभकर्ण, या व्यक्तिरेखा आणि भक्तिमार्ग प्रदीप असलेली शबरी, मानवी जीवनातील एकेका भावाचे उत्तुंग शिखर आहे. त्यांचे भाव प्रकटनातून वाल्मीकिंनी संपूर्ण मानवी जीवनाचा उत्क्रांतीपटच रेखाटला आहे. या सर्वांच्या भावविश्वाचे मध्य केंद्रक (न्यूक्लियस) मात्र राम आहे. रथचक्राच्या आऱ्याप्रमाणे सर्व जीवनरेखा या केंद्राशी निगडित आहेत. त्यामुळे सूर्यचिन्हांकित ध्वज पताकेसह इक्ष्वाकू कुळाचा हा जीवनरथ अक्षुण्णपणे, अखंडपणे धावतो आहे. युगानुयुगे तो धावतच राहणारा आहे. कथा, प्रवचन, कीर्तन, नामस्मरण, नवविधा भक्ती, रामायणातीलल व्यक्तिदर्शन, अध्यात्म, तत्त्वज्ञान या विविध आयामातून रामकथेचा हा गजर होतच राहणार आहे. त्यांत आतापर्यंत अनेकांनी सहभाग दिला आहे. स्वतःचा खारीचा वाटा उचलला आहे. रामकथेचा सेतु बांधण्यास मदत केली आहे. संवाद, कथा, कीर्तन, प्रवचनाद्वारा रामायणकथा घराघरापर्यंत, घरातील व्यक्ती व्यक्तींपर्यंत पोहोचविण्याचा अथक व प्रमाणिक प्रयत्न केला आहे. अयोध्येतील नूतन भव्य राम मंदिरात किती कोटी लोकांनी दर्शन घेतले, किती कोटी रुपयांचा व्यवहार झाला. 'टुरिझम' कसे विकसित झाले यापेक्षा हिंदू समाजातील घराघरातील सीतारूपी मातृशक्ती स्त्रीभक्षी आणि 'जिहादी' असुरी शक्तींपासून कशी सुरक्षित ठेवता येईल आणि त्यासाठी रावणाचे दहा मस्तके 'तोडण्याचा' अतुल पराक्रमाची प्रेरणा कशी मिळेल याचे चिंतन करण्याची आवश्यकता आहे. .... 'देवदास पावती फत्ते यद्यर्थी संशय नाही' हा 'देवा -- सूर' संग्रमात सिद्ध झालेला, प्रचीतीस आलेला 'शाश्वत सिद्धांत आहे'.

९८६०२९६१३१

---

### 'उंच राहो गुढी तरुण भारताची'

लहानपणापासून घरी 'तरुण भारत' येत होता. रविवारच्या पुरवणीत बालविभाग होता. तो नेहमी वाचायचो. बालवय संपल्यावर सिनेमाचे आकर्षण असायचे. तेव्हा सिनेमा प्रदर्शित व्हायच्या आत त्याची स्टोरी पेपरला यायची. शशिकुमार भगत लिहायचे. ते सुद्धा नित्य वाचत असायचो. 'बंडी उलार झाली' हे सदर माझ्या अत्यंत आवडीचे होते. वहाडी भाषेतील लिखाण मला प्रचंड आवडायचं. जेव्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शरद पवार होते तेव्हा त्यांनी बेरोजगारांसाठी भत्ता सुरू केला होता. तेव्हा त्यांनाच उद्देशून मी पहिलं वहिलं पत्र तरुण भारतात वाचकांचे मनोगत सदरात पाठवले होते त्याचे शीर्षक होते ''काय शरदराव चेष्टा करता.'' ते प्रकाशित झालं आणि आजूबाजूच्यांनी सांगितलं. तेव्हापासून विविध घटनांवर लिहिणे सुरू झाले व समाजातील इतरही लोक विविध विषय देते झाले. आजही ते अव्याहतपणे सुरूच आहे. कोण्या वाचकाचा फोन आला व कौतुकाचे दोन शब्द आले की मन सुखावून जाते. एक लेखक म्हणून तरुण भारतनेच मला घडविले आहे. मला कवी म्हणूनही ओळख तरुण भारताचीच आहे. आज या वृत्तपत्राला शंभर वर्ष झाले म्हणून मी सांगतो की ''माझ्या वृत्तपत्राला शंभर वर्ष झाले'' सोशल मीडियाच्या विविध साधनांमधून एक वृत्तपत्र नुसते टिकावे नाही तर नवनवीन संकल्पना राबवीत वाढतच जावे. आता तर पुण्यातही भरारी घेण्यास सज्ज यासारखे दुसरे कौतुक नाही. एक उत्तम व्यवस्थापन, जाणता संपादक आणि खांद्याला खांदा लावून तरुण भारताची गुढी उंच करणारे पत्रकार, कर्मचारी वृंद यांचे खरे तर अभिनंदन.

**मनोज वैद्य**/९८२२९४९२६०

### संसदेतील चर्चेतून काँग्रेसचे वाभाडे आणि भाजपला इतिहासाची संधी

भारतीय लोकशाहीत संसदेला चर्चा आणि संवादाचे मंदिर मानले जाते. मात्र, गेल्या काही वर्षांतील लोकसभेचे कामकाज पाहिले, तर काँग्रेस पक्षाकडून उपस्थित केले जाणारे मुद्दे आणि त्यानंतर होणारी चर्चा ही काँग्रेससाठी फायद्याऐवजी तोट्याचीच ठरत असल्याचे चित्र दिसते. विशेषतः राहुल गांधी यांनी मांडलेले अविश्वास ठराव किंवा त्यांनी घडवून आणलेली आक्रमक चर्चा ही भाजपला इतिहासाचे उत्खनन करण्याची आयती संधी उपलब्ध करून देत आहे.

राहुल गांधी अनेकदा संसदेत असे प्रश्न उपस्थित करतात, ज्याचे मूळ काँग्रेसच्याच जुन्या धोरणांमध्ये असते. जेव्हा विरोधी पक्षनेते म्हणून ते सरकारला घेरण्याचा प्रयत्न करतात, तेव्हा भाजपचे अभ्यासू नेतृत्व प्रत्युत्तर देताना वर्तमानापेक्षा काँग्रेसच्या भूतकाळावर अधिक प्रहार करते. आजच्या मतदारांमधील मोठा हिस्सा हा नवमतदार किंवा तरुण पिढीचा आहे. या पिढीने नेहरू, इंदिरा गांधी किंवा राजीव गांधी यांचा कार्यकाळ प्रत्यक्ष पाहिलेला नाही. संसदेतील या चर्चेच्या निमित्ताने जेव्हा भाजपचे नेते कलम ३७० च्या अंमलबजावणीतील ऐतिहासिक चुका, १९६२ च्या युद्धातील भूभाग किंवा बोफोर्स आणि २-जी स्पेक्ट्रमसारखे भ्रष्टाचाराचे जुने विषय पुराव्यासह मांडतात, तेव्हा ही नवीन पिढी काँग्रेसच्या इतिहासाकडे नकारात्मक दृष्टीने पाहू लागते. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे भाजपचे संसद सदस्य आणि प्रवक्ते हे संसदीय आयुधांचा, नियमावलीचा आणि आकडेवारीचा सखोल अभ्यास करून सभागृहात येतात. याउलट, राहुल गांधी यांच्याकडून राफेल विमान खरेदी असो की आर्थिक धोरणांवर त्यांच्याकडून होणाऱ्या विसंगत विधाने संसदेच्या पटलावर टिकत नाहीत. जेव्हा विरोधी नेता सभागृहात विसंगत आकडेवारी मांडतो, तेव्हा भाजपचे नेते त्या संधीचा फायदा घेऊन राहुल गांधींच्या अभ्यासावर प्रश्नचिन्ह निर्माण करतात.

थोडक्यात सांगायचे तर, जोपर्यंत काँग्रेस पक्ष संसदेत अभ्यासपूर्ण मांडणी करत नाही आणि आपल्या इतिहासातील चुकांचे समर्थन करण्याऐवजी भविष्याचा ठोस अजेंडा मांडत नाही, तोपर्यंत संसदेतील प्रत्येक चर्चा त्यांच्यासाठी सेल्फ-गोल ठरत राहील. राहुल गांधींनी संसदेला आपल्याच पक्षाचे वाभाडे काढण्याचे व्यासपीठ बनवले आहे की काय, असा प्रश्न आज सर्वसामान्यांना पडतो आहे.

**अविनाश देशपांडे**/९४२२९५०७५०

## वाचक पत्रे

### आचारसंहितेची पायमल्ली

सुसंस्कारित, सुशिक्षित आणि समंजस कसे म्हणावे हा एक प्रश्नच पडतो. कारण स्त्री-पुरुष हे कोणताही समारंभ, सामुदायिक कार्यक्रम, विवाह सोहळा किंवा अन्य निमित्ताने अशा सार्वजनिक ठिकाणी एकत्र जमतात. खूप कालांतराने एकमेकांना भेटतात आणि घोळका करून गप्पा मारत जाण्या-येण्याच्या वाटेमध्ये उभे राहतात. त्यामुळे जाणाऱ्या येणाऱ्यांची मोठी पंचायत होते. गप्पागोष्टीत एवढे रंगून जातात की त्यांना म्हणावे लागते, रस्ता द्या आम्हाला, जाऊ द्या म्हटले तरी त्यांना भान नसते. थोडेसुद्धा बाजूला होत नाहीत आणि बोललं तर राग येतो म्हणून काय म्हणावे अशा लोकांना प्रश्न पडतो.

**देविदास पाठक**/पुणे

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच कुठलाही लेख पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

महत्वाचे...



## जनकल्याण सोसायटीत महिला दिन उत्साहात

**सोलापूर, दि. १९ मार्च-**

जनकल्याण मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी जुळे सोलापूर शाखेत महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हजारे मॅडम यांच्या हस्ते आज महिला दिनानिमित्त हरिपाठ व मनाचे श्लोक हे पुस्तक भेट म्हणून देण्यात आले. सूत्रसंचालन भरले मॅडम यांनी केले. यावेळी उपस्थित सर्व महिला ठेवीदार यांनी आपल्या आपल्या आयुष्यात आलेले प्रत्येक अनुभव व यशाचे शिखरे गाठतानाचे विचार व्यक्त केले, सलगरे मॅडम यांनी कविता वाचल्या. या कार्यक्रमास अगदी रंग भरून देणारे घोडके मॅडम यांनी स्वतःच्या जीवनाची संघर्ष कथा सांगितली. शाखेचे सल्लागार रेडेकर मॅडम यांनी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हजारे मॅडम यांच्यावर कविता मांडली. हजारे मॅडम यांनी सर्व महिलांना महिला दिनाच्या शुभेच्छा तसेच प्रत्येक महिलांनी आर्थिक दृष्ट्या सक्षम व आयुष्याचे प्रत्येक क्षण हे हसतमुखाने सामोरे जाणे व आपला मार्गदर्शन सर्वांना केले.



## नई जिंदगी भागात अमिना बजारचे उद्घाटन

**सोलापूर, दि १९ मार्च-**

नई जिंदगी व परिसरातील लोकांना रमजान ईदची खरेदी करण्यासाठी सोईचे व्हावे या उद्देशाने गेल्या अनेक वर्षांपासून नई जिंदगी चौक येथे अमिना बजार भरवला जातो. यावर्षी अमिना बजार भरवले असून बुधवार दी. १८ मार्च रोजी पोलिस उपनिरीक्षक मोहम्मद करणाचे यांच्या हस्ते व माजी नगरसेवक तौफिक शेख यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन करण्यात आले. यावेळी सर्व उपस्थित मान्यवरांचा सत्कार अमिना बजार कमिटीच्या वतीने करण्यात आला. यावेळी खलील हिरोली, इलियास डंके, इंलियास कंपली, सद्दाम सय्यद साथी, अमिना बजार कमिटी अध्यक्ष हिदायत पठाण, कार्याध्यक्ष शाहिद फुफ्फा, उपाध्यक्ष नवाज मुल्ला, वसीम अन्सारी व कमिटीचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

## महिला आर्थिक विकास महामंडळाकडून २३ ते २५ मार्च पर्यंत नवतेजस्विनी महोत्सव

**सोलापूर, दि. १९ मार्च-**

महिला आर्थिक विकास महामंडळ जिल्हा कार्यालय सोलापूर यांच्या वतीने मावीमच्या १०व्या वर्धापन दिनानिमित्त तसेच जागतिक महिला दिनानिमित्त २३ ते २५ मार्च या कालावधीत यशराज लॉन्स, जुनी मिल कंपाऊंड, मुरारजी पेठ येथे नवतेजस्विनी महोत्सव या नावाने महिला बचत गटांच्या उत्पादनांचे जिल्हास्तरीय भव्य प्रदर्शन व विक्री मेळावा आयोजित केला आहे. या महोत्सवामध्ये महिला बचत गटांचा सन्मान समारंभ, शासनाच्या विविध योजनांची माहिती, विविध विषयांवरील चर्चासत्रे व मार्गदर्शन तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. सुमारे ६० ते ७० महिला बचत गटांचे स्टॉल येथे उभारण्यात येणार आहेत. या प्रदर्शनात महिलांनी तयार केलेली विविध दर्जेदार व घरगुती उत्पादने विक्रीसाठी उपलब्ध असतील. तसेच माविम अंतर्गत स्थापित महिला शेतकरी उत्पादक कंपनीमार्फत सेंद्रिय भाजीपाला, फळे, कडधान्ये, ज्वारी, बाजरी, मका, सेंद्रिय गूळ, मध, मोरिंगा पावडर आदी उत्पादनेही विक्रीसाठी उपलब्ध असणार आहेत. विविध खाद्यपदार्थांचे स्टॉलही या ठिकाणी उभारण्यात येणार आहेत. जिल्ह्यातील नागरिकांनी याचा लाभा घ्यावा, असे आवाहन मावीमचे जिल्हा समन्वय अधिकारी एम. एस. पटेल यांनी केले आहे.



## परिस्थितीचा बाऊ न करता प्रयत्न केल्यास यश मिळते

**दयानंद शिक्षण संस्थेत खा. प्रा. डॉ. ज्योती वाघमारे यांचे प्रतिपादन**

**सोलापूर, दि. १९ मार्च -**

माझ्या जीवनात दयानंद शिक्षण संस्थेचे महत्व अनन्यसाधारण असे आहे. परिस्थितीचा बाऊ न करता प्रयत्न केल्यास यश नक्की मिळते. सोलापूरची लेक आणि दयानंद महाविद्यालयाची विद्यार्थिनी म्हणून मिळणारी ओळख अभिमानाची आहे. जीवनात ज्ञानाशिवाय पर्याय नाही. हे प्रत्येकाने जाणून आपले कार्य चालू ठेवणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन नूतन खा. प्रा . डॉ. ज्योती वाघमारे यांनी केले. येथील डी. ए. व्ही. कॉलेज ट्रस्ट अँण्ड मॅनेजमेंट सोसायटी नवी दिल्ली संचलित, दयानंद शिक्षण संस्थेच्या वतीने राज्यसभेच्या नूतन खासदार ज्योती वाघमारे यांचा सत्कार करण्यात आला. खा. प्रा . डॉ. वाघमारे पुढे म्हणाल्या, छत्रपती शिवाजी महाराज व फुले, शाहू आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा जपत पुढील सहा वर्षात सामान्यांच्या प्रश्नांची सोडवणूक केली जाईल, असा विश्वास त्यांनी दिला. यावेळी प्रशासक प्राचार्य डॉ. व्ही. पी. उबाळे, त्यांचे पीएच. डी. चे मार्गदर्शक प्रा. डॉ. टी.एन. कोळेकर यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रा.आनंद मसलखांब व प्रा. गणेश सातालोलू यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी प्राचार्य डॉ. एस. बी. क्षीरसागर, प्राचार्य डॉ. बी. एच. दामजी, प्राचार्य डॉ. एस. व्ही. शिंदे, प्राचार्य डॉ. एस. जे. गायकवाड, लेखापाल विश्वनाथ बिराजदार हे उपस्थित होते. मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. डी. आर. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले.

# विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्या अन्नछत्रात वर्धापन दिनानिमित्त विशेष भोजन प्रसाद

**मंदिर परिसरात भाविकांची गर्दी, नाम गजराने मंदिर परिसर भक्तीमय वातावरणाने दुमदुमला**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१९ मार्च-**

हिंदू धर्मात अन्नदानाचे महत्व अनन्य साधारण आहे. विशेषतः तीर्थक्षेत्री अन्नदान केल्याने महत्पुण्य लाभते अशी भावना आहे.मंदिर समितीचे श्री संत तुकाराम भवन येथे विनामूल्य अन्नछत्र सुरू असून, या अन्नछत्राचा सन १९९६ पासून गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर प्रारंभ करण्यात आला आहे. दरम्यान अन्नछत्राचा आज वर्धापन दिन असल्याने विशेष भोजन व्यवस्था करण्यात आली होती. या अन्नछत्रामध्ये दु.१२ ते २ व रा. ७ ते ९ या वेळेत मोफत पोटभर भोजनप्रसाद भाविकांना उपलब्ध करून देतो, त्याचा दैनंदिन २५०० ते ३००० भाविक प्रसादाचा लाभ घेतात.

गुढीपाडवा तसेच आज वर्धापन दिनांनिमित्त भाविकांना बटाटा भाजी, भात-वरण, श्रीखंड पुरी, भजी, पापड इत्यादी भोजन प्रसाद वाटप करण्यात आला. या अन्नछत्राची



जबाबदारी विभाग प्रमुख विनोद पाटील यांना देण्यात आली असून, यां अन्नछत्रामध्ये अन्नदान करण्यासाठी विविध योजना असून इच्छुक भाविकांना कार्यालयात संपर्क करून अधिक माहिती जाणून घेता येईल.

**भाविकांची दर्शन रांगेत गर्दी**

हिंदू नववर्षाच्या निमित्ताने मंदिर परिसरात व दर्शन रांगेत भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी झाली आहे.

मंदिर समितीमार्फत भाविकांसाठी आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असून, गर्दी लक्षात घेता भाविकांचे जलद व सुलभ दर्शन व्हावे यासाठी व्हीआयपी दर्शनावर निर्बंध, पूजेची संख्या कमी करणे, कामांडोज नियुक्ती आदी उपाययोजना करण्यात आल्या होत्या. याशिवाय, दर्शन रांगेत तात्पुरत्या स्वरूपात बॅरिकेटिंग, मॅट, पिण्याचे पाण्याची व्यवस्था व इतर अनुषंगिक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

हिंदू नववर्षाच्या स्वागतासाठी सजलेल्या मंदिरामुळे विठुरायाचे सावळे रूप अधिकच खुलून दिसत असून, श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनाने नववर्षाची सुरुवात करण्यासाठी हजारो भाविक श्रीक्षेत्र पंढरपुरात दाखल झाले होते. पहाटेपासूनच नाम गजराने मंदिर परिसर भक्तीमय वातावरणात दुमदुमून गेला होता.



## समावेशित शिक्षणांतर्गत विशेष गरजाधिष्ठित विद्यार्थ्यांना साहित्य-साधनांचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १९ मार्च-**

महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ अंतर्गत समग्र शिक्षा अभियानाच्या समावेशित शिक्षण उपक्रमांतर्गत ० ते १८ वर्षे वयोगटातील विशेष गरजाधारक विद्यार्थ्यांना आवश्यक साहित्य-साधने व उपकरणांचे वितरण सोलापूर महानगरपालिकेचे मुख्य लेखाधिकारी रत्नराज जवळगेकर यांच्या हस्ते संपन्न झाले.

विशेष गरजाधारक विद्यार्थ्यांसाठी अलीमको, मुंबई आणि राईज बायोनिक्स, बेंगळुरू या संस्थांच्या माध्यमातून अस्थिव्यंग, मेंदूचा पक्षघात, अंधत्व, कर्णबधिरता तसेच बौद्धिक अक्षमत्व असलेल्या विद्यार्थ्यांसाठी यापूर्वी मोजमाप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांसाठी विविध साहित्य-साधने उपलब्ध करून देण्यात आली. या कार्यक्रमात २५८ विशेष गरजाधारक विद्यार्थ्यांना ट्रायसायकल, व्हीलचेअर, रोलेटर, श्रवणयंत्र, टी.एल.एम. किट, सुगम्य केन, ब्रेल किट, कुबड्या, स्मार्ट फोन, कॅलिपर, सी.पी. चेअर आदी साहित्य मोफत वितरित करण्यात आले.

याशिवाय एच. व्ही. देसाई हॉस्पिटल, पुणे संचलित शंकरशेठ साबळे नेत्र रुग्णालय, बाळे (सोलापूर) यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे दृष्टी मूल्यमापन करण्यात आले. त्यानुसार १९२ विद्यार्थ्यांना मोफत चष्म्यांचे वितरण करण्यात आले.

# ऊसतोड महिला कामगारांच्या आरोग्य अन् सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे

**राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मार्च-**

ऊसतोड महिला कामगारांसाठी आरोग्य सुविधा, मुलांना शैक्षणिक सुविधा, कायदेविषयक सहाय्य पुरविण्यासह त्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे, असे निर्देश महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित विभागातील ऊसतोड कामगार महिलांचे प्रश्न व स्त्रीभ्रूण हत्या प्रतिबंधक कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, समाजकल्याण आयुक्त दीपा मुधोळ-मुंडे, आयोगाच्या सचिव नंदिनी आवाडे, उपसचिव डॉ. पद्मश्री बैनाडे उपस्थित होत्या.

यावेळी चाकणकर म्हणाल्या, पश्चिम महाराष्ट्रामध्ये मराठवाड्यातून येणाऱ्या महिला ऊसतोड कामगारांची संख्या अधिक आहे. त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी निवासी शाळांची सुविधा उपलब्ध असावी. ऊसतोड महिलांमध्ये आरोग्याविषयी जनजागृती होणे आवश्यक आहे. मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत असल्याने बालविवाहांचे जास्त प्रमाण आढळून येते. त्यामुळे बालविवाह प्रतिबंधक कायद्याची प्रभावी अंमलबजावणीही आवश्यक आहे. गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार महामंडळाच्यावतीने ऊसतोड कामगारांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ त्यांना दिला जावा. महिलांविषयक कायदे राबवितांना सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे. यासाठी महिला आयोग सदैव पाठीशी राहील.



**जिल्हास्तरीय समित्यांच्या नियमित बैठका घ्याव्यात**

यावेळी विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार म्हणाले, महिलांच्या समस्या संवेदनशीलपणे हाताळाव्यात. महिलांच्या सुरक्षिततेसाठी गठीत करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय समित्यांच्या नियमित बैठका घेण्यात याव्यात. साखर कारखान्यांवर त्यांची तात्पुरती निवासस्थाने उभारताना महिलांना सर्व सुविधा देण्यात याव्यात. लसीकरण, आरोग्य सुविधा, पिण्याचे पाणी, स्नानगृह, स्वच्छतागृह, आरोग्य तपासणी याबाबींवर लक्ष ठेवावे. सुविधांची पाहणी करण्यासाठी जिल्हास्तरीय समित्यांमधील अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी, असेही ते म्हणाले.



सोलापूर : जिल्हाधिकारी कार्यालय बहुउद्देशीय सभागृह जागतिक ग्राहक दिनानिमित्त लावण्यात आलेल्या स्टॉल्सची पाहणी करताना शरदचंद्र प्रशालेचे विद्यार्थी

## डी आर एम ऑफिस येथून दुचाकी गेली चोरीला

**सोलापूर** - काळ्या रंगाची टाकीवर पट्टा असलेली हिरो होंडा कंपनीची ३५००० रुपयांची मोटरसायकल क्रमांक एमएच ७७५२ ही दि. ६ सप्टेंबर रोजी बापू अब्दुल करीम आत्तार वय ५७, रा. घर नंबर ४५ तळेगाव, फॉरेस्ट, सोलापूर यांचा मुलगा मोहम्मद यासीन यांच्या ताब्यातील डीआरएम ऑफिस कंपाऊंड सोलापूर येथून चोरीला गेली आहे. याबाबत सदर बाझार पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरोधात दि. १८ मार्च रोजी गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पापडे करत आहेत.

## गॅस दरवाढीविरोधात काँग्रेसचा नाल्यातून गॅस प्रयोगाद्वारे निषेध

**सोलापूर, दि. १९ मार्च-**

खासदार प्रणिती शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने केंद्र सरकारच्या गॅस सिलेंडर दरवाढीविरोधात मंगळवारी नाल्यातून गॅस' प्रयोगाद्वारे निषेध व्यक्त करण्यात आला.

कुंभार वेस नाल्याजवळ शहर काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष चेतन नरोटे यांच्या नेतृत्वाखाली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडलेल्या 'नाल्यातून गॅस काढण्याच्या' संकल्पनेचा संदर्भ घेत, काँग्रेस कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष नाल्यातून गॅस तयार करण्याचा अभिनव प्रयोग करून सरकारच्या धोरणांचा निषेध नोंदविला. या प्रयोगाद्वारे सत्ताधाऱ्यांच्या दाव्यांची खिल्ली उडवत जनतेच्या समस्यांकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करीत गॅस पुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली.

या आंदोलनात सोलापूर शहर काँग्रेस ई-ब्लॉकचे अध्यक्ष उदयशंकर चाकोते, चेतन नरोटे यांनी आंदोलनाद्वारे काँग्रेस पक्षाने केंद्र सरकारच्या फसव्या आश्वासनांविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करत गॅस दरवाढ तात्काळ मागे घ्यावी व तुटवडा दूर करावा, अशी जोरदार मागणी केली.

याआंदोलनात माजी महापौर संजय हेमगड्डी, प्रदेश सचिव राहुल वर्धा, ब्लॉक अध्यक्ष उदयशंकर चाकोते, महिला अध्यक्षा प्रमिलाताई तूपलवंडे, युवक अध्यक्ष गणेश डोंगरे, मीडिया सेल अध्यक्ष तिरुपती परकीपंडला, सेवादल यंग ब्रिगेड अध्यक्ष विवेक कन्ना, उद्योग व वाणिज्य सेल अध्यक्ष पशुपती माशाळ, असंघटित कामगार सेल अध्यक्ष सुभाष वाघमारे, माजी नगरसेवक दत्तू अण्णा बंदपट्टे, सिद्धराम चाकोते, भारती इप्पलपल्ली, महिला अध्यक्षा हेमाताई चिंचोळकर, सुमनताई जाधव, उपाध्यक्ष अंबादास गुत्तीकोंडा, बसवराज म्हेत्रे, अनिल मस्के, अशोक कलशेट्टी, संजय गायकवाड, भीमराव शिंदे, माजी नगरसेविका शोभा बोबे, संध्या काळे, संघमित्रा चौधरी, ज्योती गायकवाड, नूर अहमद नालवार, सुनील सारंगी, धीरज खंडारे, सचिन पवार, अभिषेक गायकवाड, श्रीनिवास परकीपंडला, आप्पाजी गायकवाड, शिवाजी साळुंखे, चंद्रकांत टिक्के, हणमंतु रुपनर, मोहसीन फुलारी, जब्बार शेख, अभिलाष अच्युगटला, श्रीनिवास कोटा आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# शहरात उभारली गॅस सिलेंडरची अनोखी गुढी

**वॉव महिला संघटनेचा निषेध**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ मार्च-**

शहरात सध्या जाणवत असलेल्या गॅस टंचाईच्या पार्श्वभूमीवर गुढीपाडव्याच्या निमित्ताने एक अनोखा आणि लक्षवेधी उपक्रम राबवण्यात आला. व्हॉव (WOW) महिला संघटनेच्या वतीने पार्क चौक येथे गॅस सिलेंडरची गुढी उभारून सरकारच्या निष्क्रियतेविरोधात प्रतीकात्मक निषेध नोंदवण्यात आला.

सध्या आंतरराष्ट्रीय पातळीवर सुरू असलेल्या इराणइस्त्राईल-अमेरिका तणावाचे पडसाद भारतासह विविध देशांमध्ये उमटताना दिसत आहेत. त्याचा परिणाम इंधन व गॅस पुरवठ्यावर होत असून सोलापूर शहरातही घरगुती गॅस सिलेंडरचा तुटवडा प्रकर्षाने जाणवत आहे. ऐन सणासुदीच्या काळात नागरिकांना गॅस सिलेंडरसाठी भटकंती करावी लागत असून, महिलांना विशेषतः मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर महिला संघटनेने पार्क चौकात गॅस सिलेंडरची गुढी उभारून



प्रशासनाचे लक्ष वेधले. या गुढीची पारंपरिक पद्धतीने पूजा व आरती करण्यात आली. तसेच, गॅस अभावी स्वयंपाकासाठी पर्याय म्हणून कोळशाचे प्रतीकात्मक वाटप करून परिस्थितीची तीव्रता दाखविली.

विद्या लोलगे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम पार पडला. ''गुढीपाडवा हा आनंदाचा सण असला तरी गॅस टंचाईमुळे अनेक कुटुंबांचा उत्साह मावळला आहे. सरकारने तात्काळ उपाययोजना करून गॅस पुरवठा सुरळीत करावा, अन्यथा अशा प्रकारचे आंदोलन अधिक तीव्र केले जाईल.'' असा ईशारा त्यांनी दिला आहे. या अनोख्या 'सिलेंडर गुढी' उपक्रमामुळे नागरिकांचे लक्ष वेधले गेले असून, शहरात गॅस टंचाईचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

यावेळी कांचन चौगुले, सायरा शेख, शबाना शेख, मारता असादे, मदिना पटेल, शोभा गायकवाड, स्वाती गायकवाड, गीता मुळे, यशोदा सोनावणे, स्वाती मुकणार, मनीषा नलावडे, मोनिका सरकार, सारिका लामकाने आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# अकलूज परिसरात गारांसह अवकाळी पाऊस

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १९ मार्च-**

अकलूज व परिसरात आज सायंकाळी सहाचे सुमारास मेघगर्जनेसह अवकाळी पावसाने हजेरी लावली काही अधिक प्रमाणात गाराही पडल्या या पावसाने काढणीस आलेल्या रब्बी गहू, हरभरा, मका पिकांचे नुकसान होणार असून द्राक्षे, आंबा, केळी, डाळिंब आधी फळबागांचे नुकसान होणार आहे आंबा पिकाचे कैऱ्या गळून पडण्याचे प्रमाण वाढेल तर द्राक्षांच्या घरामध्ये पाणी शिरल्याने मनुके तयार करण्यास अडचण येणार आहे डाळिंब पिकाचे आता उन्हाळी बहार धरले असून फुलगळ होणार असल्याची भीती शेतकरी वर्गातून व्यक्त केली



जाते तर शेवगा पिकाचे फुलगळ मोठ्या प्रमाणावर झाल्याने शेंगा फळधारणा होणार नाही कलिंगड आणि खरबूज भाजीपाला पिकांचे मोठे नुकसान होईलसध्या आंबट चिंच काढण्याचे मोठ्या प्रमाणावर काम सुरू असून पावसाने भिजलेले चिंच फळ खराब होते चिंचोके वेगळे करण्यास या हवामानाने मोठा त्रास होतो असे व्यापारी माने यांनी सांगितले मात्र जनावरांच्या चाऱ्याची पिकेकडवळ उन्हाळी भुईमूग ऊस या पिकांची अंघोळ झाल्याने पिकांना तेजगी येईल असे शेतकरी वर्गातून बोलले जाते.

हा पाऊस माळीनगर,यशवंत नगर अकलूज ,आनंदनगर, बागेची वाडी आधी परिसरात झाला आहे दोन-तीन दिवसापासून मोठ्या प्रमाणावर तापमान वाढले होते.

Classifieds

**विकणे आहे**

2325 स्क्वे. फुट, गंगा नगर येथे, NA, क्लिअर टायटल, खुला प्लॉट विकणे आहे. जुना देगाव नाका, मंगळवेढा रोडटच, CNS हॉस्पिटलजवळ, सोलापूर-1, मो. 8975744539

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः सोलापूर शहर व आजूबाजूच्या परिसरातील लोकांना आमचे अशिलांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डिस्ट्रीक्ट व सब डिस्ट्रीक्ट सोलापूर पैकी महानगरपालिका ग.व.सु हद्दीतील पेठ शास्त्री नगर अ झोपडपट्टी सोलापूर या नावाने ओळखल्या जाणाऱ्या नगरातील झोपडपट्टी घर नं. ६६६/४५०/२/अ यांसी म.न.पा मिळकत क्र. १७९६२१ ही मिळकत घरजागा आहे. सदर ठिकाणी १५४२५ = ३७५ फुट जागेत एक खोली आहे. सदरची खोली विट-मातीने बांधून वरती पन्हाळे पत्रे वासे घातलेले आहेत, यात लाईट कनेक्शनची सुविधा आहे. सदरहू घरजागा आमचे अशिल श्री व्यंकटेश रमेश पोतु यांचे मयत आजोबा कै. रामलू उर्फ रामचंद्र लच्छमय्या पोतू यांचे नावावर असून त्यांचे दिनाक १५/०१/२००४ रोजी सोलापूर येथे मृत्यू झालेला आहे. तसेच त्यांची आजी म्हणजे मयताची पत्नी कै. पेंटम्मा रामलु उर्फ रामचंद्र पोतु यांचेही दिनांक ०६/०३/२००६ रोजी मृत्यू झालेला आहे. तसेच आमचे अशिलांचे वडिल व मयताचा मुलगा कै. रमेश रामचंद्र पोतु यांचेही दिनाक २१/०१/२००१ रोजी मृत्यू झालेला आहे. तसेच आमचे अशिलांची आई व मयताची सुन कै. पुष्पा रमेश पोतु यांचेही दिनांक १२/०९/२०१९ रोजी मृत्यू झालेला आहे. या सर्वांचे मृत्यू पश्चात आमचे अशिल श्री व्यंकटेश रमेश पोतु मयताचा एकमेव नातू या नात्याने मुख्य वारस असून, त्यांचे शिवाय अन्य कोणीही नाही. सदरहू मिळकतीवरील मयत कै. रामलु उर्फ रामचंद्र पोतु यांचे नावाची म.न.पा तील नोंद कमी होऊन त्यांचा नातू श्री व्यंकटेश रमेश पोतु याचे एकट्याच नावाची नोंद सो.म.पा.चे कर आकारणी विभागास वारस नोंद होऊन त्याचे एकट्याचेच नावे कर पावती मिळावी. याकरिता वारस नोंद होणेकामी आमचे अशिल श्री व्यंकटेश रमेश पोतु सो.म.पा. ग.व.सु कर आकारणी विभागाकडे वारस नोंद होऊन मिळणेकरिता अर्ज दाखल करणार आहेत.

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणाचीही, कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबध, दावा, लीज, टाच, बोजा, साठेखत, कोर्ट केसेस, गहाण, दान, बक्षीस, वहिवाटी हक्क, वारसदार वाटणी हक्क, खरेदी-विक्री वगैरे अन्य स्वरुपाचा हक्क व हितसंबध, तसेच वारसदारांच्या बाबत कोणाताही वाद असल्यास त्यांनी खालील नमुद पत्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खाली नमुद पत्यावर लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचीही कसलीही हकरत वा तक्रार न आल्यास ही झोपडी घरजागा निर्वेध निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल त्यांचे नावाची वारस नोंद सो.म.पाचे कर आकारणी व कर संकलन ग.व.सु. विभागाचे दप्तरी त्यांच्या नावाची वारस नोंद करुन घेतील. त्यानंतर कोणाच्याही व कसल्याही प्रकारचे तक्रार व हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली तारीख २०/०३/२०२६.

सही/-
**ॲड. एस.एम. ढाकणे**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**


सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### ग्वाटेमाला मैत्रीपूर्ण सामन्यात मेस्सीकडे अर्जेंटिनाचे नेतृत्व

**ब्यूनस आयर्स** : फिफा फुटबॉल विश्वचषकात आपल्या विजेतेपदाचे रक्षण करण्याच्या तयारीत असलेल्या अर्जेंटिनाने



३१ मार्च रोजी ग्वाटेमालाविरुद्ध होणाऱ्या मैत्रीपूर्ण सामन्यासाठी लियोनेल मेस्सीला संघात बोलाविले आहे. मध्यपूर्वेतील संघर्षामुळे कतारमध्ये २७ मार्च रोजी होणारा अर्जेंटिना व स्पेन यांच्यातील सामना रद्द करण्यात आल्यानंतर, ब्यूनस आयर्समधील ला बोम्बोनेरा येथे हा सामना आयोजित करण्यात आला आहे. प्रशिक्षक लिओनेल स्कालोनी यांनी शारीरिक समस्यांमुळे स्ट्रायकर लॉटारो मार्टिनेझ, डिफेंडर लिसांद्रो मार्टिनेझ आणि मिडफिल्डर जिओवानी लो सेल्सो यांना संघातून वगळले आहे. मार्टिनेझ खेळण्यासाठी पात्र ठरला आहे, परंतु तो अद्याप इंटर मिलानसाठी परतलेला नाही. त्याच्या जागी ब्राझीलच्या पाल्मेरास संघाच्या जोस मॅन्युएल लोपेझला बोलाविण्यात आले आहे. मॅन्चेस्टर युनायटेडचा लिसांद्रो मार्टिनेझ शारीरिक त्रासामुळे अनुपलब्ध आहे. रियल बेटिसचा लो सेल्सो स्नायू फाटण्याच्या दुखापतीतून सावरत आहे. तोमास पॅलासिओस व गॅब्रिएल रोजासला पहिल्यांदाच वरिष्ठ राष्ट्रीय संघात बोलावण्यात आले आहे. जियानलुका प्रेस्टियान्नी याला संघात बोलावण्यात आले आहे. ■

### वैभव सूर्यवंशीला केवळ क्रिकेटचा आनंद घेऊ द्या

**जयपूर** : भारताचा उदयोन्मुख फलंदाज वैभव सूर्यवंशीला मैदानाच्या आत आणि बाहेर कोणत्याही अतिरिक्त दबावाशिवाय त्याच्या खेळाचा आनंद घेण्याची मुभा दिली पाहिजे, असे मत राजस्थान रॉयल्सचा कर्णधार रियान परागने व्यक्त केले. आयपीएलमध्ये सूर्यवंशी भारताचा सलामीवीर यशस्वी जयस्वालसोबत डावाची सुरुवात करेल. १४ वर्षीय वैभवला कोणत्याही बाह्य दबावाशिवाय त्याच्या खेळात प्रगती करत राहण्यासाठी त्याला त्याची स्वतःची जागा आणि पुरेसा वेळ दिला गेला पाहिजे. तो सध्या अत्यंत उत्कृष्ट खेळ करत आहे व तो नक्कीच देशाची मान उंचावेल, असेही तो म्हणाला. सूर्यवंशीला सामन्याच्या सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ करण्याची पूर्ण मुभा दिली जाईल आणि त्याचा वरिष्ठ सहकारी जयस्वाल हा दबावाचा सामना करण्यास पूर्णपणे सक्षम आहे, असेही तो म्हणाला.

### चेन्नई सुपर किंग्समध्ये संजू सॅमसनचे स्वागत

**चेन्नई** : भारताच्या विश्वचषक विजेत्या संघाचा स्टार खेळाडू संजू सॅमसन, पाच वेळा



विजेतेपद पटकावणाऱ्या चेन्नई सुपर किंग्स (सीएसके) संघासोबतच्या इंडियन प्रीमियर लीग मोहिमेत सहभागी होण्यासाठी गुरुवारी चेन्नईत दाखल झाला. आयपीएल २०२६ स्पर्धेची सुरुवात २८ मार्च रोजी होणार आहे. सीएसकेने समाजमाध्यमावरून सॅमसनच्या आगमनाचा एक फोटो शेअर करण्यात आला, त्यावर 'चेन्नईमध्ये चैतन्य' असे लिहिले होते. आणखी एका पोस्टमध्ये त्यांनी म्हटले, 'ज्या क्षणाची आम्ही आतुरतेने वाट पाहत होतो, तो क्षण आला! विश्वविजेता संजू सॅमसन इथे दाखल झाला आहे. आपल्या मोहिमेची सुरुवात (पहिला सामना) सॅमसनची जुनी फ्रॅन्चायझी असलेल्या राजस्थान रॉयल्सविरुद्ध करेल. रवींद्र जडेजा आणि सॅम करन यांच्या बदल्यात, राजस्थान रॉयल्सकडूनच या यष्टिरक्षक-फलंदाजाला आपल्या संघात समाविष्ट करून घेतले आहे. सॅमसन सध्या जबरदस्त फॉर्ममध्ये आहे. हंगामादरम्यान संघाला आक्रमक सुरुवात करून देण्यासाठी, भारताच्या १९ वर्षांखालील विश्वचषक विजेत्या संघाचा कर्णधार आयुष म्हात्रे याच्यासोबत तो डावाची सुरुवात (ओपनिंग) करण्याची दाट शक्यता आहे.

### पॉल स्टर्लिंगचा आर्यण्लड टी-२० कर्णधारपदाचा राजीनामा

**डब्लिन** : अनुभवी फलंदाज पॉल स्टर्लिंगने आर्यण्लडच्या टी-२० संघाच्या कर्णधारपदाचा राजीनामा दिला आहे. संघाने २०२८ मध्ये होणाऱ्या आगामी पुरुष २० विश्वचषकासाठी नियोजन करण्यास सुरुवात केली असतानाच हा निर्णय घेण्यात आला आहे. तथापि, ३५ वर्षीय स्टर्लिंग एकदिवसीय सामन्यांमध्ये संघाचे नेतृत्व करणे मात्र सुरूच ठेवणार आहे. स्टर्लिंगची ऑक्टोबर २०२३ मध्ये एकदिवसीय आणि टी-२० या दोन्ही प्रकारांसाठी कर्णधार म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. नुकत्याच पार पडलेल्या आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक २०२६ मध्ये त्याने आयर्लण्डचे नेतृत्व केले होते. भारत आणि श्रीलंकेत आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत ब गटात स्थान मिळालेल्या आयर्लण्ड संघाला पाचपैकी केवळ तीन गुण मिळवता आले आणि त्यांना गटात चौथ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. या युरोपियन संघाने गट फेरीत केवळ एका सामन्यात विजय मिळवला, दोन सामन्यांत त्यांना पराभवाचा सामना करावा लागला, तर एक सामना पावसामुळे रद्द झाला. ■

# महेंद्र गायकवाड, बोडकेची विजयी सलामी

## महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा, वाघोली ● कोल्हापूरच्या मृणालला सुवर्ण, पुण्याच्या ओंकारला रौप्य

◆ **वाघोली, पुणे, १९ मार्च**

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या मान्यतेने व रामकृष्ण अण्णा सातव पाटील कर्तव्य फाऊंडेशन आयोजित ६८ वी महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद व महाराष्ट्र केसरी किताब कुस्ती स्पर्धा वाघोली, पुणे येथील स्व. अजितदादा पवार क्रीडानगरीत सुरू आहे. केसरी किताबासाठी माती विभागात सोलापूरच्या महेंद्र गायकवाड व नाशिकच्या बाळू बोडकेने विजयी सलामी नोंदविली.

उत्कंठावर्धक लढतीत अनुभवी महेंद्र गायकवाडने विशाल बनकरला ६-१ गुणांनी नमविले, तर बाळू बोडकेने कोल्हापूरच्या बलाढ्य माऊली जमदाडेवर १० - ५ गुणांनी सनसनाटी विजय नोंदविला.



केसरी माती विभाग पहिल्या फेरीच्या लढतीत झुंजताना महेंद्र गायकवाड व विशाल बनकर

५७ किलो वजन गटाच्या माती विभागात अंतिम सामन्यात कोल्हापूरच्या मृणाल पाटीलने पुणे शहराच्या ओंकार निगडेवर ४-२ अशा गुणफरकाने मात करून सुवर्णपदक पटकावले. ओंकारला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. कोल्हापूरच्या सुदर्शन पाटीलने अजय निंबाळकरवर ७-४ अशी मात करून कांस्यपदक मिळविले.

गुरुवारी सकाळच्या सत्रात ५७ व ८६ किलो वजनी गटाच्या अत्यंत चुरशीच्या लढती हजारो कुस्ती शौकीनांच्या उपस्थितीत चित्तथरारक लढती झाल्या. यामध्ये पदकांचे दावेदार म्हणून ज्यांच्याकडे पाहिले जात होते. अशा काहींचे आव्हान संपुष्टात आल्याने त्यांचे पदकाचे स्वप्न भंगले. माती विभागातील ८६ किलो वजनी गटाच्या उपांत्य फेरीत सोलापूर शहरच्या मशीद शेखने सोलापूर जिल्ह्याच्या जय जाधवचा १०-० असा दणदणीत पराभव केला. तर पुणे शहरच्या चंद्रहार नरळे याने साताऱ्याच्या विशाल कोकरे यांचा चुरशीच्या लढतीत अनपेक्षितरीत्या ४-२ अशा पराभव अंतिम फेरीत प्रवेश केला.

गादी विभागातील ५७ किलो वजनी गटाच्या उपांत्य फेरीत कोल्हापूर शहराचा राष्ट्रीय मल्ल अक्षय ढेरे याने आपल्या लौकिकाला साजेसा खेळ करत कल्याणच्या विनायक भोईरचा १३-२ असा मोठ्या गुण फरकाने पराभव केला, तर दुसऱ्या लढतीत नाशिक जिल्ह्याच्या शुभम आचपाळे याने साताऱ्याच्या साहिल गोफणेला १०-२ अशी मात देत अंतिम फेरी गाठली. ◀(वृत्तसंस्था)

### प्रामाणिकपणे खेळ करा : सुनेत्रा पवार



'स्व. अजितदादा पवार क्रीडानगरी' येथे आयोजित महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचे उद्घाटन मातृशक्तीच्या हस्ते करण्यात आले असून उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा रंगला. यावेळी नगरविकास व परिवहन राज्यमंत्री माधुरी मिसाळ, पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, रामदास तडस व आयोजक रामकृष्ण सातव पाटील उपस्थित होते. सुनेत्रा पवार यांनी महाराष्ट्रातील कुस्ती परंपरेचा गौरव करत खेळाडूंना प्रामाणिकपणे खेळ सादर करण्याचे आवाहन केले. ■

# पुरुष हॉकी संघ अनुरूप योजनेसह सज्ज असेल

## प्रशिक्षक क्रेग फुल्टन यांचा विश्वास



हॉकीपटूंना मार्गदर्शन करताना प्रशिक्षक क्रेग फुल्टन

◆ **नवी दिल्ली, १९ मार्च**

या वर्षाच्या अखेरीस होणाऱ्या विश्वचषकात प्रत्येक अवघड प्रतिस्पर्ध्यासाठी ' अनुरूप आणि तपशीलवार' योजनेचे भारतीय पुरुष हॉकी संघ सज्ज असेल असा विश्वास संघाचे प्रशिक्षक क्रेग फुल्टन यांनी व्यक्त केला. सध्या डगमगत असलेला संघ योग्य वेळी सर्वोत्तम कामगिरी करेल, असेही ते म्हणाले.

या हंगामात भारताला केवळ एकच विजय मिळविता आला आहे. होबार्ट येथे झालेल्या एफआयएच प्रो-लीग सामन्यात ऑस्ट्रेलियाविरुद्ध पेनॉल्टी शूटआऊटमध्ये भारताने विजय मिळविला होता. १५ ऑगस्टपासून नेदरलॅण्ड व बेल्जियममध्ये सुरू होणाऱ्या विश्वचषकाच्या ड गटात भारताला अव्वल मानांकित इंग्लंड, पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तान आणि जिद्दी वेल्स संघाविरुद्ध खेळावे लागणार आहे.

गट फेरीतील सर्व सामने नेदरलॅण्डमधील ॲमस्टेलवीन येथील वॅगेनर हॉकी स्टेडियमवर खेळवले जातील.

आम्ही आमच्या रचनेवर, आमच्या दबावावर व फिनिशिंगवर कठोर परिश्रम घेणार आहोत. या स्तरावरील सामन्यांचा निकाल ठरवणारे सूक्ष्म फरक. या गटातील प्रत्येक प्रतिस्पर्ध्याची ताकद वेगळी आहे, त्यामुळे आमची तयारी गरजेनुसार आणि तपशीलवार असेल. पुढील काही महिने अगदी योग्य क्षणी सर्वोत्तम कामगिरी करण्यावर केंद्रित आहेत, असे फुल्टन यांनी म्हटले आहे.

हा एक मजबूत गट आहे, पण विश्वचषकात सर्वोत्तम संघांविरुद्ध कसोटीला लागण्यासाठी नेमके हेच हवे असते. शिबिरामधील वातावरण खूप सकारात्मक आहे. खेळाडू प्रेरित व जिद्दी आहेत, आणि आता आमचे प्रतिस्पर्धी माहित असल्याने तयारीसाठी खरी स्पष्टता व लक्ष केंद्रित करण्यास मदत झाली आहे, असेही ते म्हणाले.

इंग्लंड हा एक सुसंघटित व शारीरिकदृष्ट्या मजबूत संघ असून तो आमच्या गटातील अव्वल मानांकित संघ आहे. पाकिस्तानचा संघ आकर्षक शैली, अनपेक्षितपणा आणि हॉकीची समृद्ध परंपरा घेऊन येतो. या संघाला कधीही कमी लेखू नये.

या ड गटातील प्रत्येक प्रतिस्पर्ध्याचा आम्ही आदर करतो, परंतु त्या सर्वांविरुद्ध आम्ही आमच्या स्वतःच्या क्षमतेवर ठाम आहोत, असे फुल्टन यांनी ठामपणे सांगितले. १५ ऑगस्ट रोजी वेल्सविरुद्धच्या सामन्याने हा संघ आपल्या मोहिमेची सुरुवात करेल. १७ ऑगस्ट रोजी भारत विरुद्ध इंग्लंड व १९ ऑगस्ट रोजी भारत विरुद्ध पाकिस्तान सामने खेळले जातील. ◀(वृत्तसंस्था)

# सॅमसनची उणीव भरून काढणे अशक्य : पराग

**जयपूर, १९ मार्च -**

आपल्या संघात संजू सॅमसनची उणीव भरून काढणे अशक्य आहे. रोहित, विराटप्रमाणेच, संजूची जागा कोणीही घेऊ शकत नाही, असे राजस्थान रॉयल्सचा कर्णधार रियान पराग याने गुरुवारी सांगितले. इंडियन प्रीमियर लीगच्या आधी जयपूर येथे गुरुवारी आयोजित पत्रकार परिषदेदरम्यान तो बोलत होता. यावेळी संघाचे मुख्य प्रशिक्षक कुमार संगकारा उपस्थित होते.

२०२१ ते २०२५ या काळात रॉयल्सचे नेतृत्व करणाऱ्या संजू सॅमसनला, हंगामापूर्वीच्या एका महत्त्वपूर्ण घडामोडीत चेन्नई सुपर किंग्सकडे (सीएसके) हस्तांतरित करण्यात आले. या व्यवहाराचाच एक भाग म्हणून रवींद्र जडेजा राजस्थान रॉयल्स संघात दाखल झाला आहे. जर तुम्ही संजू सॅमसनबद्दल बोलायचे झाले, तर तो ज्या दर्जाचा खेळाडू आहे, त्याची जागा घेण्याचा विचारही आम्ही कधी करत नाही, असे पराग म्हणाला. कदाचित आपण त्याच्यासारखेच कौशल्य असलेल्या एखाद्या खेळाडूचा शोध घेऊ शकतो किंवा त्याच्या फलंदाजीच्या क्रमांकावर दुसऱ्या कोणाला तरी फलंदाजीला पाठवू शकतो. हे अगदी विराट कोहली किंवा रोहित शर्माला पर्याय नसण्यासारखेच आहे. त्याच प्रमाणे, सॅमसनलाही कोणताही पर्याय नाही, कारण तो इतका उत्कृष्ट खेळाडू आहे, असे पराग म्हणाला.




दोन वेगवेगळ्या टप्प्यांत मिळून सलग ११ वर्षे या फ्रॅन्चायझीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संजूने, राजस्थान रॉयल्सचा (आरआर) सर्वात यशस्वी कर्णधार व सर्वाधिक धावा करणारा खेळाडू म्हणून आपली छाप पाडली होती. त्याने संघाला आयपीएल २०२२ च्या अंतिम फेरीत व २०२४ च्या प्ले- ऑफ्समध्ये पोहोचवण्यात मोलाची भूमिका बजावली होती. टी-२० विश्वचषकातील सॅ सनच्या नेत्रदीपक काम गिरीनंतर त्याची प्रतिष्ठा व महत्त्व अनेक पटींनी वाढले आहे. या स्पर्धेत त्याने सलग तीन साम न्यांत निर्णायक अर्धशतके झळकावत भारताला ऐतिहासिक तिहेरी मुकुट मिळवून दिला, तसेच विजेतेपद राखण्यातही सिंहाचा वाटा उचलला.

अंतिम सामन्यात भारताने न्यूझीलंडचा ९६ धावांनी पराभव केला आणि या सामन्यात संजूला सामनावीर म्हणून गौरवण्यात आले. राजस्थान रॉयल्ससाठी गत हंगामातील कामगिरी अत्यंत निराशाजनक ठरली, त्यांना १० सामन्यांत पराभवाचा सामना करावा लागला.

### आघाडीच्या संघांविरुद्ध खेळण्यास सज्ज : शुभांगी

**नवी दिल्ली** : थायलंडमध्ये होणाऱ्या एएफसी २० महिला आशियाई चषकासाठी सज्ज होत असताना, भारतीय २० महिला संघाची कर्णधार शुभांगी सिंग हिने आपल्या संघाच्या तयारीबद्दल पूर्ण आत्मविश्वास व्यक्त केला आहे. या खंडीय स्पर्धेत आघाडीच्या प्रतिस्पर्ध्यांचा सामना करण्यास आपला संघ सज्ज असल्याचे तिने म्हटले आहे. दोन दशकांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर भारत या स्पर्धेत पुनरागमन करत आहे. २ एप्रिल रोजी जपानविरुद्धच्या सामन्याने भारतीय संघ आपल्या मोहिमेची सुरुवात करेल. भारताचा समावेश क गटामध्ये करण्यात आला असून, या गटात त्यांच्यासोबत जपान, ऑस्ट्रेलिया आणि चायनीज तैपेई हे संघ आहेत. शुभांगी म्हणाली की, संघाने अत्यंत आत्मविश्वास आणि स्पष्ट ध्येय समोर ठेवून त्या फेरीचा सामना केला होता. पात्रता मिळवायचीच, या ठाम मानसिकतेने आम्ही तिथे गेलो होतो आणि आम्ही ती मिळवलीही,'' ती म्हणाली. जेव्हा तुम्हाला एखादी गोष्ट नक्की घडणार आहे यावर आधीच विश्वास असतो, तेव्हा ती गोष्ट प्रत्यक्षात आल्यावर त्याचे काही नवल वाटत नाही, असे ती म्हणाली. सध्या कोलकाता येथे सराव करत असलेला हा संघ २० मार्च रोजी बँकॉकसाठी रवाना होईल. ■

# राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धा पुढील वर्षी २९ ऑक्टोबरपासून

**नवी दिल्ली, १९ मार्च**

राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धेची आठवी आवृत्ती पुढील वर्षी २९ ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबर या कालावधीत माल्टा आणि गोझो येथे आयोजित केली जाणार आहे. या स्पर्धेचा उद्घाटन समारंभ २९ ऑक्टोबर रोजी पार पडेल. त्यानंतर ३० ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबर या काळात खेळांचा सहा दिवसांचा अत्यंत रोमांचक कार्यक्रम रंगेल. या स्पर्धेत जलतरण आणि पॅरा जलतरण, ॲथ्लेटिक्स आणि पॅरा ॲथ्लेटिक्स, नेटबॉल, नौकानयन, स्क्वॅश, ट्रायथलॉन, वॉटर पोलो आणि भारोत्तोलन अशा आठ खेळांचा समावेश असेल. माल्टा राष्ट्रकुल युवा क्रीडा २०२७ ही स्पर्धा एक अत्यंत उत्साहवर्धक आणि स्पर्धात्मक वातावरण निर्माण करण्याचे आश्वासन देते. याद्वारे माल्टीज खेळांचे माहेरघर जगासमोर सादर केले जाईल. जागतिक दर्जाच्या सुविधा आपल्या तरुण खेळाडूंना खरोखरच एक परिवर्तनकारी अनुभव देतील, ज्यामुळे उद्याचे तारे घडवण्यासाठी आणि त्यांना प्रेरणा देण्यासाठी मदत होईल, असे राष्ट्रकुल क्रीडा महासंघाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी केटी सॅडलियर यांनी गुरुवारी म्हटले आहे. या स्पर्धेच्या इतिहासातील हा सर्वात मोठा पॅरा स्पोर्ट (दिव्यांग खेळांचा) कार्यक्रम ठरेल. २०२३ मध्ये त्रिनिदाद आणि टोबॅगो येथे झालेल्या राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धेत पॅरा ॲथ्लेटिक्सचा जो ऐतिहासिक समावेश करण्यात आला होता, त्याच यशाची ही पुढील पायरी असेल.

# महाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धेत वालचंद महाविद्यालयास उपविजेतेपद

## पाच खेळाडूंची विद्यापीठ संघात निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मार्च-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ अंतर्गत झालेल्या आंतर महाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धेत वालचंद महाविद्यालयाच्या पुरुष संघाने उपविजेतेपद संपादिले. यातून उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर सनी पौळ, म. कैफ, सुशांत डोंबळे, श्रेयस सुरवसे आणि सचिन अचोली यांची अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रिकेट स्पर्धेसाठी सोलापूर विद्यापीठ संघात निवड झाली. संघास क्रीडा शिक्षक राहुल हजारे यांचे मार्गदर्शन लाभले.



त्यांचे व संघाचे प्राचार्य डॉ. संतोष कोटी, प्राकृत विभाग प्रमुख डॉ. महावीर शास्त्री, बायोटेक्नॉलॉजी विभागाचे वरिष्ठ प्राध्यापक डॉ. के. आ. राव, उपप्राचार्य अनुप म्हेत्रे, पर्यवेक्षक डॉ. जीवराज कस्तुरे यांनी अभिनंदन केले.

**उपविजेता संघ** : म. कैफ, सचिन अचोली, श्रेयस सुरवसे, सनी पौळ, सचिन माने, प्रशांत लिंबोळे, राज हैदले, सुमित राठोड, सुशांत डोंबळे, विनायक, सिद्धेश्वर कोंठने, सुयश मासाळ, लक्ष्मण मांजेली, सायबांना पुजारी.



# मुंबईत 'महापौर चषक'ला हिरवा कंदील

▶▶ **महापौर रितू तावडे यांची ऐतिहासिक घोषणा**

**मुंबई, दि. १८ मार्च**

''मुंबई महापौर चषक २०२५-२६'' स्पर्धेला अखेर अधिकृत मंजुरी मिळाली आहे. महापौर रितू तावडे यांनी घेतलेल्या या ऐतिहासिक निर्णयामुळे गेल्या अनेक वर्षांपासून खंडित झालेली क्रीडा परंपरा पुन्हा जोमाने सुरू होणार आहे. स्पर्धा आयोजनास झालेल्या विलंबामुळे स्पर्धा पूर्ण करण्यासाठी ३ महिन्यांऐवजी तब्बल ४ महिन्यांचा कालावधी देण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. याचबरोबर स्पर्धेच्या निधीत ७५ लाखांवरून थेट ५ कोटी रुपयांची भरीव वाढ जाहीर करण्यात आल्याने संपूर्ण क्रीडाक्षेत्रात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मुंबई महानगरपालिका मुख्यालयात महापौर रितू तावडे यांच्या अध्यक्षतेखाली क्रीडा संघटकांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीस उपमहापौर संजय घाडी, महापालिका आयुक्त भूषण गगराणी, विरोधी पक्ष नेत्या किशोरी पेडणेकर, विविध गटनेते, शिक्षण अधिकारी, ज्येष्ठ पर्यवेक्षक (क्रीडा), लेखा विभागाचे अधिकारी तसेच विविध क्रीडा प्रकारांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. क्रीडाविकासाच्या विविध मुद्द्यांवर सखोल आणि सकारात्मक चर्चा करण्यात आली. या बैठकीत मुंबई स्पोर्ट्स तर्फे बाळासाहेब (बाळ) तोरसकर आणि क्षितीज वेदक यांच्यासह क्रीडा कार्यकर्त्यांनी मांडलेल्या ४ प्रमुख मागण्यांपैकी ३ मागण्यांना मंजुरी देण्यात आली.

# महाराष्ट्र केसरी सिकंदर शेखने जिंकली दोन लाखांची कुस्ती

## आचेगावच्या कुस्ती मैदानात हरियानाच्या पैलवानाला केले दोन मिनिटात चीतपट

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.१९ मार्च-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील आचेगाव येथील १९६७ सालचे हिंदकेसरी पैलवान हजरत पटेल यांच्या स्मरणार्थ निकाली कुस्त्यांचे जंगी मैदानात महाराष्ट्र केसरी सिकंदर शेख याने हरियाणाचा पैलवान अजय बनवाला दोन मिनिटातच निकाल डावावरती जिंकत दोन लाखाचे पारितोषिक पटकाविले. दुसऱ्या कुस्तीत नेपाळ येथील पैलवान देवा थापा याने धोबीपछाड या डावावरती पंजाबच्या जसप्रोन सिंग यास हरवित दीड लाख रुपयांचा इनाम मिळविला.

ही कुस्ती उद्योजक प्रमोद मोरे यांच्या हस्ते लावण्यात आली. अन्य कुस्त्यांमध्ये पै. सिकंदर मुजावर, पै.नबीलाल दिवाने पै. सर्जेराव काळे, पै. संतोष मोची, पै. शाहरुख खान, पै. विजय वारा पैलवान जीवन भुजबळ, पै. मशीद शेख यांच्यासह अनेक छोट्या-मोठ्या पैलवानांच्या कुस्त्या लावण्यात आल्या होत्या व त्यांना रोख स्वरूपात बक्षीस



देण्यात आल्याचे संयोजक उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे उपजिल्हाप्रमुख पैलवान प्रताप चव्हाण यांनी सांगितले. या कुस्तीच्या फडामध्ये पैलवान रमेश क्षीरसागर ,बोला पटेल, खुशीने जवळघे ,लारा बळुरे, आंबा काळे, श्रीशैल उपाध्ये, सिकंदर पटेल, कुशोउद्दीन देवफोडे, मल्लू खोबर यासीन बिराजदार विठ्ठल बाळगे आदींनी पंच म्हणून काम पाहिले. या कुस्ती स्पर्धेचे आयोजन पै. हुसेन पटेल, हसन पटेल, सुरेश मोची, मैनोदीन भागानगरे, इलियास बिराजदार यांनी केले होते .या कुस्ती स्पर्धा मध्ये शंभर रुपयांपासून ते वीस हजार रुपयापर्यंत कुस्त्या नेमण्यात आल्या होत्या.या कुस्ती स्पर्धेचा शुभारंभ अक्कलकोटचे नगराध्यक्ष मिलन कल्याण शेट्टी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी महेश धाराशिवकर, चंद्रकांत रेम्बोसु, दत्ता माने, संतोष केंगनाळकर, संतोष बडवे, अप्पू गोटे, नाना कळसकर, जर्गिस मुल्ला, आदी मान्यवर उपस्थित होते. आचेगाव येथील कुस्ती मैदानाकरिता उद्योजक दत्तां अण्णा सुरवसे, मनोरमा परिवाराचे प्रमुख श्रीकांत मोरे, यांनी आर्थिक मदत केली होती.

### उद्योजक मोरे देणार बांधून नवीन आखाडा

आचेगावच्या मैदानामध्ये राज्यातून नाहीतर परराज्यातूनही पैलवान कुस्तीसाठी येतात. त्यामुळे या गावाला कुस्ती स्पर्धा भरवण्याकरिता आखाडा लहान पडत आहे. सदरची गरज ओळखून उद्योजक प्रमोद मोरे यांनी पुढच्या वर्षीच्या कुस्ती स्पर्धेकरिता मोठा आखाडा बांधून देण्याचे अभिवचन दिले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### बुधवारी झालेल्या गारपिटीने सांगोला तालुक्यात फळबागांचे नुकसान

**भरपाई देण्याची आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांची मागणी**

**सांगोला,दि.१९ मार्च -**

सांगोला तालुक्यातील राजुरी, अनकढाळ, पाचेगाव, जुनोनी आणि कोळा परिसरात बुधवार दि.१८ मार्च रोजी संध्याकाळी झालेल्या सोसाट्याच्या वाऱ्यासह भीषण गारपिटीमुळे शेतीचे व प्रामुख्याने फळबागांचे प्रचंड नुकसान झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीची गांभीर्याने दखल घेत आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी गुरुवार दि.१९ मार्च रोजी कृषी अधिकारी दिपाली जाधव आणि तहसीलदार बाळुताई भागवत यांच्यासह राजुरी परिसरातील द्राक्ष व डाळिंब बागांची प्रत्यक्ष पाहणी केली. त्यांनी घटनास्थळावरूनच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे आणि सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून नुकसानीची भीषणता सांगून तात्काळ मदतीची मागणी केली. शासनाकडून तात्काळ पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आले असून, आगामी विधानसभेच्या अधिवेशनात या प्रश्नावर आवाज उठवून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त भरपाई मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी आश्वासित केले. याप्रसंगी बाधित शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> पडलेल्या गारांचा आकार मोठा असल्याने द्राक्ष आणि डाळिंबाच्या बागा अक्षरशः उद्ध्वस्त झाल्या आहेत. या भागात डाळिंब आणि द्राक्ष लागवड मोठ्या प्रमाणात आहे. प्राथमिक अंदाजानुसार या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले असून डाळिंबासोबतच मका पिकालाही मोठा फटका बसला आहे.
>
> **– आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख**



### गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर प्रधानमंत्री घरकुल योजनेअंतर्गत गृहप्रवेश सोहळा

**सांगोला,दि.१९ मार्च -**

सांगोला तालुक्यात गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर प्रधानमंत्री घरकुल योजनेअंतर्गत विविध ग्रामपंचायत मध्ये गृहप्रवेश सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला अशी माहिती पंचायत समितीचे गटविकास अधिकारी उमेशचंद्र कुलकर्णी यांनी दिली. गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर प्रधानमंत्री आवास घरकुल, अहिल्यादेवी घरकुल योजना व मोदी आवास घरकुल योजनेअंतर्गत बांधलेल्या घराचा गृहप्रवेश सोहळा कमलापूर, अनकढाळ, खवासपूर, चिकम हुद, एकतपुर, वाटंबरे, कडलास, किडेबिसरी ग्रामपंचायत येथे मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी ग्रामपंचायत अधिकारी, घरकुल लाभार्थी, ग्रामपंचायतीचे पदाधिकारी उपस्थित होते असे पंचायत विस्तार अधिकारी अमोल तोडकरी, आरोग्य विस्तार अधिकारी मिलिंद सावंत यांनी सांगितले. घरकुल लाभार्थीनी शासनाचे आभार मानत आमचे स्वतःचे पक्के घराचे स्वप्न पूर्ण झाले अशी भावना व्यक्त केली असल्याची माहिती सहा.गटविकास अधिकारी वसंत फुले यांनी दिली. गुढीपाडव्याच्या मंगलमय वातावरणात झालेल्या या गृहप्रवेश सोहळ्यामुळे गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे असे मत अहिल्यादेवी होळकर घरकुल लाभार्थी काशिलिंग तंडे व मोदी आवास घरकुल योजना लाभार्थी हनुमंत आदलिंगे यांनी व्यक्त केले.

### हुंड्यासाठी विवाहितेचा छळ; पतीसह तिघांविरोधात तक्रार दाखल

**बार्शी, दि.१९ मार्च-**

हुंड्यासाठी विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केल्याची गंभीर घटना समोर आली असून, पती, सासू व - दीराविरोधात बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार पायल अविनाश घोटकर (वय २०, रा. सध्या समर्थनगर, बार्शी) यांचा विवाह दि. २३ ऑगस्ट २०२४ रोजी पंढरपूर येथे पारंपरिक पद्धतीने झाला होता. विवाहानंतर सुरुवातीचे काही दिवस संसार सुरळीत चालला. मात्र त्यानंतर सासरच्या मंडळींकडून त्रास सुरु झाल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, सासू कविता घोटकर या वारंवार स्वयंपाक येत नाही, सतत फोनवर बोलतेस अशा कारणांवरुन टोमणे मारत शिवीगाळ करीत असत. तसेच दीर अभिजीत घोटकर हेही अपमानास्पद वागणूक देत असत. पती अविनाश घोटकर यांना याबाबत सांगितल्यास ते उलट मारहाण करुन घराबाहेर काढत असत. दरम्यान, मेडिकलचा गाळा घेण्यासाठी माहेरहून ७ लाख रुपये आण अशी मागणी करत वारंवार छळ करण्यात आला. मागणी पूर्ण न केल्यास नांदवणार नाही, अशी धमकी देण्यात येत होती. या सततच्या त्रासाला कंटाळून नोव्हेंबर २०२५ मध्ये फिर्यादीने विषारी औषध प्राशन केल्याचेही तक्रारीत नमूद आहे. दि. १५ सप्टेंबर २०२४ ते २० नोव्हेंबर २०२५ या कालावधीत पती अविनाश तानाजी घोटकर, सासू कविता तानाजी घोटकर व दीर अभिजीत तानाजी घोटकर (सर्व रा. वांगीकर नगर, पंढरपूर) यांनी संगनमताने वेळोवेळी शिवीगाळ, मारहाण करुन तसेच हुंड्यासाठी दबाव टाकून शारीरिक व मानसिक छळ केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. या प्रकरणी संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करत आहेत.

**श्री.स्वामी समर्थ प्रकट दिन**

# आज वटवृक्ष मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम

## दुपारी १२ वाजता जन्म सोहळा, पाळणा आणि आरती

### श्री स्वामीच्या १४८व्या पुण्यतिथी कार्यक्रम पत्रिकेचे पूजन

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि १९ मार्च-**

अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थांचा प्रकट दिन शुक्रवार २० मार्च रोजी येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान मध्ये विविध पारंपारीक धार्मिक कार्यक्रमांनी संपन्न होणार असल्याची माहिती मंदिर समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी दिली.

प्रारंभी प्रकट दिनाच्या आदल्या दिवशी गुढी पाडव्यानिमीत्त हिंदू संस्कृतीच्या नूतन वर्षाच्या शुभ मुहूर्तावर वटवृक्ष मंदिरातील श्रींच्या पादूकांस पहाटेच्या काकडआरती नंतर अभिषेक करण्यात येईल. सकाळी १०:३० वाजता पाडव्याच्या शुभमुहूर्तावर श्रींच्या चरणी श्री स्वामी समर्थ महाराजांच्या १४८ व्या पुण्यतिथी महोत्सवानिमीत्त आयोजीत करण्यात आलेल्या नित्य अनुष्ठान, धर्मसंकीर्तन व भजनसेवा कार्यक्रम पत्रिकेचे पुजन होईल. सकाळी ११:३० वाजता नैवेद्य आरती प्रसंगी श्रींना गुढी पाडव्याचे गोड महानैवेद्य मंदिर समितीचे पुरोहीत मोहनराव पुजारी, मंदार महाराज पुजारी यांच्या हस्ते अर्पण करण्यात येईल. नैवेद्य आरतीनंतर पाडव्यानिमीत्त दर्शनाकरीता येणाऱ्या सर्व स्वामी भक्तांना देवस्थान विश्वस्त समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली शीरा प्रसाद वाटप करण्यात येईल.

श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान (मुळस्थान) अक्कलकोटच्या वतीने वटवृक्ष मंदिरात श्री स्वामी समर्थ महाराज प्रकट दीन शुक्रवार दिनांक २० मार्च रोजी साजरा होत आहे. यादिवशी पहाटे ४ वाजता श्रींची काकड आरती संपन्न होईल. यानंतर श्री स्वामी प्रकट दीन ते श्री स्वामी पुण्यतिथी अखेर पारंपारीक पद्धतीने पहाटे पारंपारीक नगर प्रदक्षिणेस (प्रभात फेरी) प्रारंभ होईल.

गुढी पाडवा, प्रकटदीन, साप्ताहीक सुट्ट्या इत्यादीमुळं मंदीरात स्वामी भक्तांच्या गर्दीमुळे श्री स्वामी समर्थांचे दर्शन भाविकांना सुलभतेने होणेसाठी



१९ मार्च ते दि.२२ मार्च अखेर स्वामी भक्तांच्यावतीने नित्यनियमाने होणारे अभिषेक होणार नाहीत. जे स्वामीभक्त अभिषेकाची पावती करतील त्यांना प्रसाद मिळेल. श्री.स्वामी प्रकट दीन रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत विश्वस्त उज्वलाताई सरदेशमुख यांच्या अधिपत्याखाली देवस्थानच्या ज्योतिबा मंडपात सत्संग महिला भजनी मंडळ अक्कलकोट यांच्या वतीने भजन होऊन गुलाल पुष्प वाहिले जाईल. त्यानंतर पाळणा, भजनगीत व आरती होईल. दुपारी १२ ते २ या वेळेत देवस्थानच्या मैंदर्गी-गाणगापूर रोडवरील भक्तनिवास भोजन कक्ष येथे सर्व स्वामी भक्तांना स्वामी प्रसाद म्हणून भोजन महाप्रसाद देण्यात येणार आहे. श्री स्वामींच्या या प्रकट दिनानिमीत्त वटवृक्ष मंदिरास आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात येणार आहे.

१९ मार्च ते दि.२२ मार्च अखेर भाविकांची होणारी संभाव्य गर्दी लक्षात घेता मंदीर समितीच्या वतीने मंदीर व परिसरात महिला व पुरुष भाविकांसाठी स्वतंत्र दर्शन रांग, दर्शन रांगेत कापडी मंडप, ठिकठिकाणी पिण्याच्या पाण्याची सोय, सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस बंदोबस्त, अग्नीशमन यंत्रणा, मंदीरात कुलर व फॅनची व्यवस्था, व्हीलचेअरची व्यवस्था, प्रथमोपचार व्यवस्था इत्यादीचे नियोजन करण्यात आले आहे, तरी सर्व स्वामी भक्तांनी श्रींचे दर्शन, पाळणा कार्यक्रम, भोजन महाप्रसाद, भजन इत्यादी कार्यक्रमांचा लाभ घ्यावा असे आवाहन मंदिर विश्वस्त समितीच्या वतीने समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी केले आहे.



## गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर प्रामाणिकतेचा आदर्श

**गायकवाड यांनी सापडलेला ६५ हजारांचा मोबाईल केला परत**

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १९ मार्च-**

गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर अकलूजमध्ये प्रामाणिकतेचे एक प्रेरणादायी उदाहरण समोर आले आहे. अकलूज नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते पाटील यांचे स्वीय सहाय्यक प्रकाश गायकवाड यांनी सापडलेला सुमारे ६५ हजार रुपये किमतीचा मोबाईल प्रामाणिकपणे मालकाला परत करून सामाजिक जबाबदारीची जाणीव दाखवली.

महर्षी चौक, अकलूज येथील जनसंपर्क कार्यालयासमोर गुढीपाडव्याच्या दिवशी दुपारी सुमारे दीड वाजण्याच्या सुमारास प्रकाश गायकवाड आणि पत्रकार सागर खरात कार्यालयाकडे जात असताना रस्त्याच्या कडेला बॉक्स पॅक अवस्थेत एक ओप्पो मोबाईल पडलेला दिसला. त्यावर "त्रिमूर्ती मोबाईल" असे लिहिलेले आढळले. मोबाईलचा मालक शोधण्यासाठी त्यांनी गुगलवर शोध घेऊन सदुभाऊ चौक, अकलूज येथील संबंधित दुकानाशी संपर्क साधला.

दुकानातून मिळालेल्या माहितीनुसार संबंधित वितरकाशी संपर्क साधण्यात आला असता मोबाईल हरवल्याची तक्रार पोलिस ठाण्यात नोंदवली होती. सर्व पडताळणी पूर्ण झाल्यानंतर संबंधित मालकाला मोबाईल परत देण्यात आला. गायकवाड आणि खरात यांच्या प्रामाणिकपणाचे सर्वत्र कौतुक होत आहे. यावेळी सचिन नरसाळे व सागर अडगळे उपस्थित होते.

## श्रीपूरला अधिकृत एस.टी. बस स्थानकासमोरच बसेस थांबणार

**अनेक वर्ष धूळखात असलेले बसस्थानक झाले सुरु**

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. १९ मार्च-**

श्रीपूरमध्ये गुढीपाडण्याचे औचित्य साधत डॉ .आंबेडकर स्मारक समोर पूर्वी तयार करण्यात आलेल्या बस स्थानकासमोरच एस.टी. बस थांबा सुरू करण्यात आला आहे.

पूर्वी बृहन्महाराष्ट्र शुगर कारखान्याचे मालक कै. चंद्रशेखर आगाशे यांनी बस स्थानकासाठी जागा दिली होती. ती त्यांनी आजूबाजूस झालेल्या अतिक्रमणामुळे परत घेतली होती. त्यावेळेपासून श्रीपूरला एस.टी. बसस्थानक नव्हते. बसस्थानक नसल्याने एस.टी. बस छत्रपती चौकात कोठेही थांबत असत. त्यामुळे उन्हातान्हात थांबून प्रवाशांची धावपळही होत असे. खरे तर श्रीपूर हे गांव येथिल कर्मयोगी सुधाकरपंत परिचारकपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखाना व ब्रिमा सागर डिस्टलरी या उद्योगामुळे व मोठी नागरीवसहत म्हणून ओळखले जाते. तसेच बाजारपेठेमुळे अनेक गावांसाठी मध्यवर्ती ठीकाण आहे. असे असताना साधे एस.टी बस स्थानकही नव्हते. याला महत्वाचे कारण म्हणजे जागा नाही हे होते. यावर ग्राहक पंचायतीच्या माध्यमातून प्रदीप मदाल, कै विठ्ठल देशमुख, हेमंत दिक्षित, डॉ. सुनिल फडे, तुकाराम केसकर यांनी त्यावेळचे पदवीधर मतदार संघातून निवडून ओलेले आ. प्रकाश जावडेकर यांना या प्रश्नाची तिव्रता सांगून एस.टी. बस स्थानकाची मागणी केली होती.

यावर आ. प्रकाश जावडेकर यांनी तातडीने निधी मंजूर करून सध्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात बस स्थानक बांधून दिले. मात्र स्थानक झाल्यापासून या ठीकाणी एकदाही एस. टी. बस थांबली नाही. या नंतर महाळुंग-श्रीपूर नगरपंचायतीचे नगरसेवक नानासाहेब मुंडकणे व रतनसिंह यांचे पुढाकाराने माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांनीही छत्रपती शिवाजी महाराज चौकात एस. टी. बसस्थानक बांधून दिले. या ठीकाणीही एस. टी. बस थांबत नाहीत. या पार्श्वभूमीवर महाळुंग-श्रीपूर नगर पंचायतीचे सदस्य प्रा. प्रकाश नवगिरे यांनी ही बाब अकलूजचे स्थावर व्यवस्थापक प्रमोद शिन्दे यांच्या निदर्शनास आणून देत श्रीपूरला दोन बस स्थानके असून त्या ठीकाणीच बसेस थांबविणेत याव्यात या बाबत निवेदन दिले.




प्रत्यक्ष परिस्थिती व प्रवाशांच्या सुरक्षिततेचा विचार करून त्यांनी गुरुवार दि. १९ मार्च गुढीपाडवापासून या अधिकृत बस स्थानकासमोर बस थांबदिणेच्या सुचना चालक व वाहक यांना दिल्याने आज दुपारी ११ वा. अकलूज माळखांबी ही बस बस थांब्यावर थांबविणेत आली. यामुळे छत्रपती चौकामध्ये होणारी वाहतुकीची कोंडी कमी होणार आहे. प्रवाशांची चांगली सोय होत असल्याने त्यांनी समाधान व्यक्त केले आहे . बसस्थानक थांबा येथे आली एसटी चे स्वागत व वाहक बिराजदार मॅडम, चालक आबा गोसावी यांचा सन्मान प्रकाश नवगिरे यांचे हस्ते करण्यात आला. यावेळी डॉ . सुहास बनसोडे माजी वाहन निरीक्षक अनिल दळवी , विष्णु माने , माजी मुख्याध्यापक नागनाथ वाघमारे, एसटीचे माजी कर्मचारी अशोक गाडे, प्रकाश खंडागळे, पांडुरंग चव्हाण, आनंद ताकतोडे, भीमराव भाग्यवंत, सदा पवार, औदुंबर यादव, जयंत भोसले, ज्ञानेश्वर काटे, गुडुलाल शेख आदी उपस्थित होते या मार्गावर असलेल पंढरपूर बोरगाव जांबूड माळखांबी नेवरे या एसटी बसेस येथे थांबणार आहेत. हे बसस्थानक रंगरंगोटी अक्षर पेंटिंग नगरसेवक प्रकाश नवगिरे यांनी स्वखर्चाने केले आहे. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन पत्रकार दत्ता नाईकनवरे यांनी केले . विष्णू माने यांनी आभार मानले .

### कॉलेजमधील कार्यक्रमात हॉकीने मारहाण

**सोलापूर** - कॉलेज मधील सांस्कृतिक कार्यक्रम मध्ये दि. १७ मार्च रोजी सुमित विजय जानगवळी वय २३, रा. २५९ उत्तर कसबा, सोलापूर व त्याचा मित्र फोटो काढत असताना कॉलेजमधील वैभव जांगडे व त्याचे मित्र यांनी मध्ये मध्ये येत असल्यामुळे त्यांना विचारणा केली असता वैभव यानी त्याच्या हातातील हॉकीने सुमितच्या उजव्या दंडावर जोरात मारहाण केली, यात हात फॅक्चर करून दुखापत केली. याबाबत सदर बाझार पोलीस ठाण्यात दि. १८ मार्च रोजी गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास साखरे करत आहेत.

## माढा प्रशालेत दहावी शेवटच्या पेपरला विद्यार्थी भावूक

**मैत्रीच्या आठवणीसाठी गणवेशावर घेतल्या सह्या**

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. १९ मार्च-**

बुधवारी दहावी बोर्ड परीक्षेचा शेवटचा पेपर होता पेपर सुटल्यानंतर माढ्यातील सहकार महर्षी गणपतराव साठे जिल्हा परिषद प्रशालेच्या परिसरात पाचवी ते दहावीपर्यंत एकत्र असलेल्या आपल्या मित्र-मैत्रिणी पुढील शिक्षणासाठी वेगवेगळ्या ठिकाणी शिक्षण घेण्यासाठी जाणार असल्याने एवढ्या वर्षाची मैत्रीत काहीसा खंड पडणार असल्याने आपल्या जिवलग मैत्रीची आठवण जोपासण्यासाठी प्रशालेतील मुलींनी एकमेकींच्या गणवेशावर आपल्या



शिक्षक व जिवलग मैत्रिणीच्या सह्या घेऊन त्यांची आठवण कायमस्वरूपी जवळ ठेवण्यासाठी एक वेगळीच शक्कल लढवली आहे.

इयत्ता दहावी नंतर खर पाहता हा शालेय जीवनातील आपल्या शिक्षक व जिवलग मित्र-मैत्रिणीपासून वेगळे जाण्याचा भावनिक क्षण आहे. कारण दहावीनंतर प्रत्येक विद्यार्थ्यांचे शिक्षणाचे वेगवेगळे मार्ग असतात. त्यामुळे एवढ्या वर्षाची मैत्री काहीशी दुरावते. दहावीच्या लास्ट पेपरचा दिवस हा सर्वांसाठीच भावनिक क्षण असतो. आपल्या प्रशालेत आपण पुन्हा विद्यार्थी म्हणून जाणार नसतो याच दुःख प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनावर असत तेच चित्र शेवटच्या पेपरला माढा प्रशालेत दिसून आल प्रत्येक विद्यार्थ्याच्या चेहऱ्यावर ती भावना होती. जड अंतकरणाने पेपर झाल्यानंतर प्रशालेतून बाहेर पडणे त्यांना खूप वेदनादायी होत. त्या गोष्टीतून सावरत त्यांनी शिक्षक व आपल्या जिवलग मित्रांशी काहीसा संवाद साधला. शालेय जीवनात निर्मळ मैत्रीच नात निर्माण झालेले असते त्यापासून काहीसा दुरावा निर्माण होणारी गोष्ट खूप दुःख देणारी असते परंतु आपल्या जीवनात पुढील शिक्षणाच्या माध्यमातून जीवनात यशस्वी होण्यासाठी ह्या गोष्टी मनात दडवून पुढील जीवन मार्गक्रमण करणे गरजेचे असते. विद्यार्थी व विद्यार्थिनींना प्रशालेचा निरोप घेताना भावना दाटून आल्या होत्या. याप्रसंगी मुख्याध्यापक नागेश खेडकर, शिक्षक किरण भांगे, सुरेखा सदावर्ते, राजेंद्र दराडे, किरण शेलार, अजितसिंह रोंगे, दशरथ वसेकर इत्यादी शिक्षक व नंदिनी म्हेत्रे उपस्थित होते.

**जागतिक चिमणी दिवस विशेष**

## चिमण्यांच्या संवर्धनासाठी झटणारे अवलिया पक्षी मित्र अरविंद कुंभार

**वर्षभरात शेकडो कृत्रिम घरटे बनवून मोफत वाटप**

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १९ मार्च-**

अनादी काळापासून माणसाशी जवळीकता साधून असणाऱ्या मुठी एवढ्या आकाराच्या घरचिमण्या मानवी हस्तक्षेपामुळे सध्या संकटात सापडले आहेत. दिवसेंदिवस त्याची संख्या घटत चालली आहे हे सर्वांच्या निदर्शनास आले आहे. मानवी वसाहतीतील चिमण्यांची चिवचिवाट लुप्त होऊ नये, चिमण्यांची संख्या कमी होऊ नये व त्यांचे संवर्धन व्हावे या उद्देशाने येथील पक्षी अभ्यासक डॉ. अरविंद कुंभार यांनी गेली कित्येक वर्षे कृत्रिम घरटी बनवून गरजू व चिमण्यांवर प्रेम करणाऱ्यांना पुरवण्यात व्यस्त असतात.

२० मार्च हा दिवस जागतिक चिमणी दिवस म्हणून जगभर साजरा केला जातो. या दिवसाचे औचित्य साधून डॉ. कुंभार वर्षभर महिन्यात सुमारे तीनशे ते चारशे कृत्रिम घरटी तयार करतात. तयार केलेल्या घरटी ज्यांना आवश्यकता असेल



त्यांना मोफत देतात. बऱ्याच वेळा अशासकीय संस्था (एनजीओ) व शाळा महाविद्यालयात घरटी बनवायची कार्यशाळा आयोजित करतात.

वाढती वृक्षतोड व सिमेंटच्या वाढत्या जंगलामुळे शहरांसह ग्रामीण भागात सुद्धा चिमण्यांची संख्या मोठ्या प्रमाणात घटू लागली आहे. त्यात भर पडली आहे मोबाईलच्या उंच मनोरे व भ्रमण लहरी. या कारणांमुळे चिमण्या मनुष्य वस्तीला रामराम ठोकून जंगलवासी होण्याला सरसावत आहेत. मोबाईल व वाहनांच्या अतिवापरामुळे त्यांचा चिवचिवाट ऐकू येत नाही. चिमण्यांची घटत चाललेली संख्या लक्षात घेता त्यांना वाचविण्याची गरज आहे म्हणून कृत्रिम घरटी तयार करून त्यांच्या संतानोत्पत्तीसाठी मानवकुल तत्परता दाखवायला पाहिजे असे डॉ. कुंभार म्हणतात. डॉ. कुंभार यांच्या अकलूजमधील त्यांच्या निवासस्थानी भेटी देणाऱ्यांना ते चिमण्यासाठी घरटे भेट देऊन चिमणी संवर्धनाच्या कामाला हातभार लावतात. चिम आपल्यापासून दूर जाऊ नये म्हणून मातीच्या भांड्यात पाणी भरून ठेवावेत, घराच्या अंगणात व गच्चीवर दररोज सकाळी पसाभर धान्य पसरवून टाकवेत, कृत्रिम घरटे आपल्या भिंतीला व पोर्चमध्ये अडकून ठेवावेत व मुलांच्या परीक्षा संपल्या की त्यांना कृत्रिम घरटी तयार करण्यास प्रवृत्त करावे असे आवाहन डॉ. कुंभार आपल्या संवादातून करतात.

> **कृत्रिम घरट्यासाठी वापरण्यात येणारी वस्तू**
>
> घ पडलेल्या कागदी पुट्टे वा कार्डबोर्ड यांना घरट्यांचा आकार देऊन, पोकळ बांबूचे तुकडे, फ्लेक्स बोर्डचे कापड वापरून झाल्यावर राहिलेल्या पुठ्ठ्याच्या गुंडाळी, बॅडमिंटन शटल बॉक्स, खाकी चिकट पट्टी व डिंक तसेच बांबूच्या सहा इंच काड्या हे टाकाऊ साहित्य वापरून डॉ. कुंभार घरटे तयार करतात.

## थोडक्यात...



### बुकमार्क स्पर्धेत पारखे, भिसे तर शुध्द वाचन स्पर्धेत चौरसिया, सुरवसे प्रथम

**सोलापूर, दि १९ मार्च-**

प्रिसिजन फाउंडेशनतर्फे वाचन अभियान अंतर्गत घेण्यात आलेल्या बुकमार्क स्पर्धेत सोहम पारखे व राधिका भिसे आणि शुध्द वाचन स्पर्धेत अनन्या चौरसिया व श्रावणी सुरवसे या विद्यार्थ्यांनी आपापल्या गटातून प्रथम क्रमांक पटकावले. प्रिसिजन फाउंडेशनचे वाचकदूत श्रीधर खेडगीकर, सहाय्यक जनसंपर्क अधिकारी वैशाली बनसोडे यांनी या स्पर्धांचे आयोजन केले होते. मुख्याध्यापिका अनघा जहागिरदार यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. याप्रसंगी बी.एस.कुलकर्णी, ऐश्वर्या कुलकर्णी, कविता थंबद, अभ्यंकर आदी उपस्थित होते.




### एनबीकेबीवायएफच्या चाहत्यांनी उभारले चिल सेंटर

**सोलापूर, दि १९ मार्च-**

एमआयडीसी येथील सुनील नगर येथे एनबीकेबीवायएफच्या चाहत्यांच्या वतीने चिल सेंटर उभारण्यात आले. नगरसेवक सिध्देश्वर कमटम, नगरसेविका खजुरगी यांच्या हस्ते या सेंटरचा शुभारंभ करण्यात आला. एनबीकेबीवायएफचे अध्यक्ष नरसिंह कनकी, सचिव श्रीनिवास कट्टा यांच्या हस्ते पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी गिरीश अन्नलदास, गोपाल कट्टा, गणेश जल्ला, श्रीनिवास बिंगी, गोपाल मिठ्ठा, देविदास मंगलपल्ली, अंबादास चाटला, श्रीनिवास नंदाल, रमेश महिंद्रकर, अंबादास नागुल, नागनाथ बंडा, अंबादास मिठ्ठा, सुरेश वनगा, नरेंद्र गुंडेटी, सत्यनारायण पोला, बालाजी कोडम, प्रभाकर इप्पलपल्ली, नागभूषण वंगारी, दयानंद आधेली आदी उपस्थित होते.




## नीलकंठ बँक ग्राहकांना देत आहे सुलभ हायटेक सुविधा

**उद्योगपती यतीन शहा यांचे गौरवोद्गार**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.१९ मार्च-**

सर्व सुविधा युक्त अत्याधुनिक असे या बँकेचे कार्पोरेट ऑफिस आहे. ग्राहकांना सुलभ हायटेक सुविधा नीलकंठ बँक देत आहे. ही निश्चितच गौरवाची बाब आहे. ग्राहकांना चांगल्या सुलभ सुविधा दिल्यामुळेच या बँकेचा सर्वत्र नावलौकिक आहे, असे गौरवोद्गार प्रिझिजन कॅमशाफ्टचे संस्थापक व व्यवस्थापकीय संचालक यतीन शहा यांनी काढले.

नीलकंठ को-ऑपरेटिव्ह बँकेच्या वतीने नव्याने सुरू करण्यात आलेल्या मोबाईल बँकिंग सेवा, एटीएम, आय.एम.पी.एस, युपीआय सेवा तसेच बँकेच्या मुख्य इमारतीचे नूतनीकरण आणि 'व्हीएलके सेंटर' या आधुनिक मीटिंग हॉलचे उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर गुजराती मित्र मंडळ सभागृहात आयोजित या कार्यक्रम प्रसंगी बँकेचे चेअरमन सीए. धनराज नोगजा, व्हाइस चेअरमन पद्मा भुतडा, बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे चेअरमन कौस्तुभ करवा, चंद्रकांत तापडिया, जमनादास भुतडा, रमेश राठी, प्रदीपकुमार शिंगवी, आनंद झंवर, शरद कालाणी, अभिजीत चिल्लाळ, नंदा भट्टड, किरण शेरखाने, नंदकुमार भोसले, स्वप्नील मर्दा, महेश अग्रवाल, राजगोपाल सोमाणी, अमित मर्दा, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद बलदवा तसेच जनरल मॅनेजर सीए शुभम सोमाणी यांच्यासह संचालक मंडळ, व्यवस्थापन मंडळ पदाधिकारी आदींची उपस्थिती होती. नीलकंठ को-ऑप. बँकेचे संस्थापक कैलासवासी विश्वनाथ करवा यांच्या विचारांचा वारसा १९९७ पासून पुढे चालवत ही बँक खातेदार सभासद आणि अधिकाऱ्यांच्या सहकार्यामुळे सुरू आहे. नव्या सेवांमुळे जलद बँकिंग सुविधा मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त केला. 'व्हीएलके सेंटर'मुळे बँकेच्या प्रशिक्षण व नियोजन प्रक्रियेला चालना मिळणार असल्याचे चेअरमन सीए धनराज नोगजा यांनी सांगितले.सूत्रसंचालन मंजुश्री गाडगीळ तर कौस्तुभ करवा यांनी आभार मानले.

## स्वागत हिंदू नववर्षाचे...





सोलापूर : हिंदू नववर्षानिमित्त गुरुवारी शहरात हिंदू संघटनांकडून शोभा यात्रा काढण्यात आली. शहरात विविध पाच ठिकाणी शोभा यात्रा काढून हिंदू नववर्षाचे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. याप्रसंगी मिठाई वाटून आनंदोस्तव साजरा करण्यात आला. या शोभायात्रेत अबालवृध्दांनी सहभाग नोंदवला होता.

(छायाचित्र : केवल तिवारी)



**सोलापूर : श्री स्वामी समर्थ महाराज प्रकट दिनानिमित्त सुंदरम् नगर येथील श्री स्वामी समर्थ मंदिर येथे श्रीगुरुलिलामृत ग्रंथाचे सामुहिक पारायण करण्यात आले.**




## हिंदु जनजागृती समितीतर्फे जिल्ह्यात १५ ठिकाणी सामूहिक गुढीपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मार्च-**

हिंदू नववर्षाच्या प्रारंभी गुढीपाडवा निमित्त हिंदु जनजागृती समितीच्या वतीने सोलापूर जिल्ह्यातील विविध भागांत एकूण १५ ठिकाणी सामूहिक गुढीपूजन उत्साहात पार पडले. या उपक्रमामध्ये मिळून शेकडो नागरिकांनी सहभाग नोंदवला.

गुढीपूजन झालेले प्रमुख ठिकाणे पुढीलप्रमाणे; मल्लिकार्जुन मंदिर, दमाणी नगर येथील श्री गणेश मंदिर परिसर, श्री गणपती मंदिर (रामदेव नगर, शेळगी), विणकर वसाहत (गांधीनगर), अशोक चौक येथील व्यंकटेश मंदिर, सिद्धगणेश हनुमान मंदिर (७० फूट रोड), निलम नगर येथील भारतीय एकात्मता नवरात्र महोत्सव मंडळ, जुना घरकुल येथील श्री दत्त मंदिर (डी-२ ग्रुप), ब्रम्हनाथ नगर, वैष्णव मारुती मंदिर (जुना घरकुल), रुद्र मारुती मंदिर (एच ग्रुप, जुना घरकुल), नवीन घरकुल एस पॉइंट (ब ग्रुप), नवीन घरकुल (ए ग्रुप), पोषम्मा मंदिर (विनायक नगर), अक्कलकोट येथील रामगल्ली तसेच अन्य स्थानिक भाग. या सर्व ठिकाणी ब्रह्मध्वज पूजन, प्रभू श्रीरामाची आरती, नामजप आणि हिंदु राष्ट्र स्थापनेची प्रतिज्ञा करण्यात आली. अनेक ठिकाणी प्रथमच सामूहिक गुढी उभारण्यात आल्याने नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण होते. जुना घरकुल (डी-२ ग्रुप) येथील श्री दत्त मंदिरात हिंदू जनजागृती समितीच्या वतीने सामूहिक गुढीपूजन करत ब्रह्मध्वज पूजन, श्रीराम आरती व हिंदू राष्ट्र स्थापनेची प्रतिज्ञा करण्यात आली.

यावेळी यश मुगड्याल, शिवलीला गुब्याड, गिरीश गोसकी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण घेतलेल्या युवतींनी पुढाकार घेतला होता. उपस्थितांनी उत्साहात जयघोष करत धर्मरक्षणासाठी कटिबद्ध होण्याचा संकल्प केला. सण-उत्सव शास्त्रशुध्द पद्धतीने साजरे केल्यास समाजात संघभाव, प्रेमभाव आणि एकात्मता वाढते, असा संदेश या उपक्रमांतून देण्यात आला.

## आज 'मोगरा फुलला' सांस्कृतिक कार्यक्रम

**मंत्री आशिष शेलार यांची प्रमुख उपस्थिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ मार्च-**





संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जयंतीनिमित्त राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच वतीने राज्यभरात आध्यात्मिक वा सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणेत आले आहे. या अंतर्गत शुक्रवार, दि.२० मार्च २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता सोलापुरातील दत्त चौक येथील सरस्वती विद्या मंदिर येथे 'मोगरा फुलला' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. प्रसिध्द व्याख्याते गणेश शिंदे व प्रसिध्द गायिका सन्मित्ता शिंदे व त्यांची टीम या कार्यक्रमाचे सादरीकरण करणार आहेत. या कार्यक्रमासाठी प्रवेश विनामूल्य असून सोलापूरकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन संयोजकांकडून करण्यात आले.

## सावकारी कायद्यांतर्गत कारवाई करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ मार्च-**

कर्जरुपाने घेतलेली रक्कम परतफेड करूनही तारण घेतलेली शेतजमीन सावकाराने परस्पर विक्री केली आहे. ही जमीन परत देण्यास टाळाटाळ केली जात असून संबंधित सावकारांकडून शिवीगाळ दमदाटी केली जाते. जीवे मारण्याची धमकी दिली जाते. अन्याय करणाऱ्या संबंधितांवर चौकशी करून सावकारी कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करावा. आम्हाला संरक्षण मिळावे, अशी मागणी तक्रारदार राजश्री निस्ताने यांनी पत्रकार परिषदेत केली आहे.



तक्रारदार यांची पंढरपूर तालुक्यातील मौजे वाखरी येथे शेतजमीन आहे. कर्ज घेण्यासाठी ही जमीन संबंधित सावकारांकडे तारण ठेवली होती. कर्ज परतफेड करून ही शेतजमीन सावकार परत करत नाही. परस्पर या जमिनीची इतरांना विक्री केली आहे. याप्रकरणी संबंधितांविरुद्ध पंढरपूर ग्रामीण पोलीस स्टेशन मध्ये अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच उपनिबंधक कार्यालयातही याप्रकरणी तक्रार दिली आहे मात्र उडवाउडवीची उत्तरे दिली जात आहेत. पुढील कारवाई केली नसल्याचा आरोप राजश्री निस्ताने यांनी केला आहे.



## घरगुती गॅसचा व्यावसायिक वापर; ४१ गॅस टाक्या केल्या जप्त

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.१९ मार्च-**

आखाती युद्धच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व पोलिस आयुक्त एम.राजकुमार, पोलिस उपायुक्त अश्विनी पाटिल यांच्या मार्गदर्शनानुसार अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे यांच्या नेतृत्वाखाली पथकाने विविध ठिकाणी धाडी टाकले असता घरगुती गॅसचा व्यावसायिक वापर होत असल्याचे निदर्शनास आले.

पार्क चौक, जुळे सोलापूर, डी मार्ट, विजापूर रोड, कंबर तलाव आदी भागातील चायनीज गाड्या व पावभाजी सेंटरवर टाकण्यात आलेया या धाडी अंतर्गत ४१ घरगुती गॅस टाकी जप्त करण्यात आल्या. याबाबत विजापूर नाका पोलिस ठाणे, सदर बझार पोलिस ठाणे, जेलरोड पोलिस ठाणे येथे रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु होते.

या पथकात ब विभागाचे परिमंडळ अधिकारी राजेश यमपुरे, अ विभागाचे परिमंडळ अधिकारी नंदकिशोर डोके, ड विभागाचे परिमंडळ अधिकारी प्रफुल नाईक, पुरवठा निरीक्षक ज्ञानेश्वर काशीद, सज्जन भोसले, वैभव मोरे, सचिन लांडे, आनंद मदने, पोलिस अंमलदार जावेद जमादार, आबाजी सावळे, धीरज सातपुते, विठ्ठल यलमार आदींचा समावेश होता.

**पंडित भीमराव कनकधर शिष्य परिवारातर्फे**

## रविवारी गुरु स्मरण संगीत सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ मार्च-**

सुप्रसिध्द तबलावादक पंडित भीमराव कनकधर आणि त्यांचे शिष्य पंडित विठ्ठलदादा क्षीरसागर यांच्या पुण्यतिथीनिमित्त रविवार, दि.२२ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता लोकमान्य टिळक सभागृह ॲम्पी थिएटर येथे गुरु स्मरण संगीत सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती शोभा कनकधर-व्हटकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कनकधर व क्षीरसागर या गुरुशिष्यांनी अनेक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले-घडविले. रविवारी होणाऱ्या कार्यक्रमातंर्गत पहिल्या सत्रात कृष्णा मुसळे यांचे ढोलकी वादन तर दुसऱ्या सत्रात मध्य प्रदेशातील पहिल्या महिला तबलावादिका संगीता अग्निहोत्री यांचे तबलावादन होणार आहे. आदिती गराडे व अनिल लोंढे यांनी अनुक्रमे संवादिनी व तबल्यावर साथसंगत देणार आहेत, असेही त्यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस रवींद्र क्षीरसागर, प्रभाकर वाघचौरे, डॉ.अनिल सर्जे आदी उपस्थित होते.

## अखंड श्रध्देची पायी यात्रा; स्वामीभक्त विमल माने यांची स्वामीभक्ती

**तभा वृत्तसेवा । आरती कुसेकर**
**सोलापूर, दि. १९ मार्च-**




आज श्री स्वामी समर्थ प्रकटदिन. याचे औचित्य साधून जुळे सोलापूर भागात राहणाऱ्या स्वामीभक्त विमल माने यांची स्वामी समर्थांवरील भक्ती आणि अखंड सेवेची पायी यात्रा याविषयी जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता श्रध्दा, कष्ट आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर त्यांनी अनेकांनेक संकटांवर मात केल्याचे स्पष्ट होते.

त्यांची आजवरची वाटचाल अनेकांच्या दृष्टीने दिशादर्शक व प्रेरणादायी आहे, असंचं म्हणावा लागेल. गेल्या दीड वर्षापुर्वी राखी पौर्णिमेच्या शुभदिनी त्यांनी सोलापूर ते श्रीक्षेत्र अक्कलकोट असा पायी यात्रेस प्रारंभ केला. दर पौर्णिमेच्या आदल्या दिवशी सायंकाळी ६ वाजता त्या सोलापूरहून अक्कलकोटच्या दिशेने मार्गस्थ होतात. आणि पौर्णिमेच्या दिवशी पहाटे ५ वाजता श्री स्वामी समर्थांच्या मंदिरात पोहोचतात.

पायी यात्रेच्या सातत्याने मंदिरातील पुजारी त्यांचे चांगलेच परिचित झाले. त्यामुळे त्यांना थेट दर्शनाची सुविधा उपलब्ध करुन दिली जाते. विमल माने यांचा प्रवास हा फक्त पायी चालण्याचा नाही, तर आत्मिक समाधान मिळवण्याचा मार्ग आहे. प्रत्येक पौर्णिमेला त्या नव्या उर्जेने, नव्या श्रध्देने हा प्रवास करतात. त्यांच्या जीवनात अनेक अडचणी आल्या, तरी त्यांनी श्रध्देचा धागा कधीही सोडला नाही. होटगी रोडवरील दैनिक तरुण भारत कार्यालयासमोर त्यांचा उसाच्या रसाचा छोटासा गाडा आहे. साध्या परिस्थितीतून उभ्या राहिलेल्या विमलताई गेल्या १८ वर्षांपासून तीन मुलांसह स्वतंत्रपणे आयुष्य जगत आहेत.



धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर तालुक्यातील सिंदफळ हे त्यांचे मूळ गाव. लग्नानंतर त्या कुमठा येथे राहत होत्या, मात्र सासरी होणाऱ्या जाचाला कंटाळून त्यांनी वेगळा मार्ग निवडला आणि स्वतःच्या कष्टावर संसार उभा करण्याचा निर्धार केला. सुरुवातीचे दिवस अत्यंत कठीण होते. घरातील धुणी-भांडी करून, शेजाऱ्यांची कामे स्वीकारुन त्यांनी उदरनिर्वाह केला. त्यानंतर भाजी विक्रीचा व्यवसाय सुरु केला. आज त्या उन्हाळ्यात उसाच्या रसाचा गाडा चालवतात आणि स्वाभिमानाने जीवन जगत आहेत.ज्यादिवशी त्या अक्कलकोटला जातात, त्यादिवशी आपला उसाचा रसाचा गाडा बंद ठेवतात. त्यांच्या मते, तो दिवस पूर्णपणे स्वामींच्या सेवेसाठी असतो. आज त्यांच्या कुटुंबात एक मुलगी आणि एक मुलगा त्यांच्यासोबत राहतात. सर्व अडचणींवर मात करत त्यांनी आपल्या मुलांना सांभाळले आणि त्यांना योग्य मार्ग दाखवला. स्वामी समर्थांच्या कृपेवर विश्वास ठेवून त्यांनी आयुष्याला नवी दिशा दिली.

### स्वामी शक्तीवर चालणारी अखंड पायी सेवा

जोवर स्वामी शक्ती देतात, तोवर ही यात्रा सुरुच ठेवणार आहे. त्याशिवाय ही यात्रा कधीच थांबविणार नाही. या पायी यात्रेद्वारा केवळ चालणे होत नाहीतर मनःशांती, श्रध्दा आणि आत्मिक समाधान लाभते. प्रत्येक वेळी अक्कलकोट गाठल्यानंतर चैतन्य मिळते. आयुष्यातील संघर्षांमध्ये स्वामींवरील विश्वास बळ देतो. ही केवळ भक्ती नसून जीवन जगण्याची प्रेरणा बनली आहे, असे विमल माने ह्या सांगतात.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/**. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT





# ‘आनंदाची गुढी’ ; ग्राहकांच्या उत्साहाने बाजारपेठा फुलल्या

## सोलापुरात कोट्यवधींची उलाढाल; दुचाकी, चारचाकी, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू विक्री, घरांचे बुकिंगही जोरात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ मार्च-**

हिंदू नववर्षाच्या शुभारंभाचे प्रतीक असलेल्या गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर सोलापूर शहरातील बाजारपेठेत उत्साहाची लाट उसळली. साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानल्या जाणाऱ्या यादिवशी नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर खरेदी करत बाजारपेठेत अक्षरशः ‘आनंदाची गुढी’ उभारली. दिवसभरात वाहन, इलेक्ट्रॉनिक्स, सोने-चांदी तसेच रिअल इस्टेट क्षेत्रात कोट्यवधींची उलाढाल झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

शहरातील प्रमुख बाजारपेठा दिवसभर ग्राहकांनी गजबजून गेल्या होत्या. व्यापाऱ्यांनी आकर्षक ऑफर्स आणि सुलभ ईएमआय योजना जाहीर केल्यामुळे ग्राहकांचा प्रतिसाद आणखी वाढला. विशेष म्हणजे यंदा ई-वाहनांकडे ग्राहकांचा वाढता कलही स्पष्टपणे दिसून आला. वाहन बाजारातही मोठी उसळी पाहायला मिळाली. गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर नवीन वाहन खरेदी करण्याची परंपरा कायम ठेवली. सुमारे ८०० चारचाकी आणि ३ हजार दुचाकींची विक्री झाली. यामध्ये ३०० ई-बाईकचा समावेश आहे. विविध ठिकाणच्या शोरुम्समध्ये नवीन वाहनांची पूजा करताना ग्राहकांचे उत्साही चित्र पाहायला मिळाले. सोने-चांदी बाजारात मात्र भाववाढीचा परिणाम जाणवला. काही दिवसांपूर्वीपेक्षा किंचित घसरण झाली असली



तरी सोन्याचे दर अजूनही उच्चांकावर असल्याने खरेदी मध्यम राहिली. मात्र सायंकाळच्या सत्रात दागिन्यांच्या खरेदीला चांगला प्रतिसाद मिळाला. रिअल इस्टेट क्षेत्रातही गुढीपाडव्याचा मुहूर्त लाभदायक ठरला. शहरात २०० घरांचे आणि २५० प्लॉटचे बुकिंग झाल्याचे समोर आले आहे. २ बीएचके फ्लॅटसाठी मोठी मागणी दिसून आली.

### होम अप्लायन्सेसचीही उभारली ‘गुढी’

गुढीपाडव्याच्या निमित्ताने टीव्ही, फ्रिज, वॉशिंग मशीन, एसी, मोबाईल यांसारख्या इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंनाही मोठी मागणी दिसून आली. सध्या जागतिक परिस्थितीमुळे पुरवठा मर्यादित असला तरी कंपन्यांच्या ऑफर्स आणि कमी ईएमआयमुळे ग्राहकांनी मोठ्या प्रमाणावर खरेदी केली. सुमारे १० कोटींची उलाढाल अपेक्षित आहे, असे दुकानदारांकडून सांगण्यात आले.

### रिअल इस्टेटला मुहूर्ताची साथ

गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर शहरात १५० ते २०० प्लॉट आणि २५० फ्लॅट बुकिंगची नोंद झाली. जुळे सोलापूर, अक्कलकोट रोड, पूर्व भाग, शेळगी या परिसरात मागणी वाढली आहे. ४० ते ४५ लाखांच्या २ बीएचके फ्लॅटला सर्वाधिक पसंती मिळत असल्याची माहिती बांधकाम व्यावसायिकांनी दिली.

### दागिन्यांमध्ये ‘डेली वेअर’ची पसंती

सोन्याचे दर उच्चांकावर असले तरी महिलांनी हलक्या वजनाच्या दैनंदिन वापरातील दागिन्यांना पसंती दिली. नेकलेस, अंगठ्या, गंठण यांसोबत चांदीमध्ये पैंजण आणि जोडव्यांची मोठी मागणी दिसून आली. काही ग्राहकांनी गुंतवणुकीच्या दृष्टीनेही सोने खरेदी केले.

### विकसित होत असलेल्या भागांमध्ये बुकिंगचा वेग

गुढीपाडव्याचा मुहूर्त रिअल इस्टेटसाठी अत्यंत सकारात्मक ठरला. २ बीएचके घरांना ग्राहकांची मोठी पसंती मिळत आहे. शहरातील विकसित होत असलेल्या भागांमध्ये बुकिंगचा वेग वाढला आहे, असे ‘क्रेडाई’चे सोलापूर शाखेचे अध्यक्ष अभिनव साळुंखे यांनी सांगितले.

### ग्राहकांचा ई दुचाकीकडे कल

गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर वाहन खरेदीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विशेषतः ई-दुचाकीकडे ग्राहकांचा कल वाढताना स्पष्ट दिसत आहे. पर्यावरणपूरक आणि किफायतशीर पर्याय म्हणून ई-वाहनांचा ट्रेंड मजबूत होत आहे, असे वाहन वितरक घनश्याम चव्हाण यांनी सांगितले.

### सोन्याची खरेदी थांबलेली नाही

सोन्याचे दर उच्चांकावर असले तरी खरेदी पूर्णपणे थांबलेली नाही. ग्राहकांनी हलक्या वजनाच्या आणि दैनंदिन वापरातील दागिन्यांना प्राधान्य दिले. सायंकाळी दागिन्यांच्या खरेदीत विशेष वाढ झाल्याचे दिसून आले, असे सराफ व्यावसायिक अमित चडचणकर यांनी सांगितले.

### एप्रिलपासून किंमती वाढण्याची शक्यता

गुढीपाडव्याच्या निमित्ताने इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंना मोठी मागणी मिळाली. ऑफर्स आणि सुलभ ईएमआयमुळे ग्राहकांनी खरेदीला प्राधान्य दिले. एप्रिलपासून किमती वाढण्याची शक्यता असल्याने सध्या खरेदीचा ओघ वाढला आहे, असे इलेक्ट्रॉनिक्स वस्तुंचे विक्रेते ईश्वर मालू यांनी सांगितले.

### गुढी पाडव्याचे महत्त्व

**नूतन वर्षाचा प्रारंभ :** हिंदू पंचांगानुसार चैत्र शुद्ध प्रतिपदेला गुढी पाडवा साजरा होतो. हा वर्षाचा पहिला दिवस मानला जातो.

**विजय आणि आनंदाचे प्रतीक :** प्रभू श्रीराम १४ वर्षांचा वनवास संपवून अयोध्येत परतले, तो हाच दिवस. त्यांच्या स्वागतासाठी आणि विजयाप्रीत्यर्थ घरोघरी 'गुढी' उभारली जाते.

**साडेतीन मुहूर्तांपैकी एक :** भारतीय संस्कृतीत अक्षय्य तृतीया, दसरा, गुढी पाडवा हे तीन पूर्ण आणि बलिप्रतिपदा हा अर्धा असे 'साडेतीन मुहूर्त' मानले जातात. या दिवशी केलेले कोणतेही नवीन कार्य यशस्वी होते, अशी श्रद्धा आहे.

### खरेदीचे विशेष महत्त्व

**सोने-चांदीची खरेदी :** गुढी पाडव्याला सोन्याची खरेदी करणे अत्यंत शुभ मानले जाते. यामुळे घरात लक्ष्मीचा वास राहतो आणि समृद्धी येते, अशी भावना आहे.

**नवीन वस्तूंचा शुभारंभ :** नवीन घर (गृहप्रवेश), वाहन, मोबाईल किंवा इलेक्ट्रॉनिक वस्तू खरेदी करण्यासाठी लोक या दिवसाची निवड करतात. अनेक बाजारपेठांमध्ये मोठी उलाढाल होते.

**व्यवसाय आणि गुंतवणूक :** नवीन व्यवसाय सुरू करण्यासाठी किंवा शेअर बाजार, जमीन-जुमला यामध्ये गुंतवणूक करण्यासाठी हा सर्वोत्तम मुहूर्त मानला जातो.

**वस्त्राभरणे :** नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी नवीन कपडे, दागिन्यांची खरेदी केली जाते.



## महापालिकेत उभारण्यात आली ‘गुढी’

### स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते यांच्या संकल्पनेतून आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ मार्च-**

सोलापूर महानगरपालिकेच्या कौन्सिल हॉलसमोर गुढीपाडव्याच्या निमित्ताने पारंपरिक आणि उत्साहपूर्ण वातावरणात गुढी उभारणी कार्यक्रम पार पडला. स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते यांच्या संकल्पनेतून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर आणि स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते यांच्या हस्ते विधिवत गुढी उभारून मराठी नववर्षाचे स्वागत करण्यात आले.

पारंपरिक वेशभूषा, सणाचा उत्साह आणि उपस्थित नगरसेविका आणि महिलांच्या सहभागामुळे परिसरात आनंददायी वातावरण निर्माण झाले होते. याप्रसंगी बोलताना उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर म्हणाल्या की, गुढीपाडवा हा सण नवचैतन्य, नवउमेद आणि सकारात्मकतेचा संदेश देणारा आहे. नववर्षाच्या निमित्ताने सोलापूर शहराच्या विकासासाठी सर्वांनी एकत्र येऊन काम करणे गरजेचे असून, नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी महानगरपालिका कटिबद्ध आहे. स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते यांनी आपल्या मनोगतात गुढीपाडव्याचे सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित करत सांगितले की, हा सण परंपरा, संस्कृती आणि एकात्मतेचे प्रतीक आहे. या सणातून समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. महानगरपालिकेच्या माध्यमातून नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा देण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असून, शहराच्या सर्वांगीण विकासासाठी नागरिकांचे सहकार्य आवश्यक आहे. याप्रसंगी नगरसेविका व महिला उपस्थित होत्या.

## कडुलिंबाचे झाड लावूया, मोफत ऑक्सिजन घेवूया



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मार्च-**

हिंदू संस्कृतीत साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहुर्त मानला गेलेला गुढीपाडवा हा दिवस नववर्षाचा पहिला दिवस म्हणून साजरा केला जातो.

यादिवशी कडुलिंबाची पाने व फुले यांना अनन्यसाधारण महत्व असते. ही बाब लक्षात घेता, प्रत्येकाने किमान एक तरी कडुलिंबाचे झाड लावूया, मोफत ऑक्सिजन घेवूया असे आवाहन एकत्व फाऊंडेशनच्या वतीने करण्यात आले. एकत्व फाउंडेशनच्या वतीने सोलापूर-पुणे महामार्गावरील रस्त्याच्या कडेला कडुलिंबाचे वृक्ष लावण्यात आले होते. फाउंडेशनच्या बाळे येथील सदस्यांच्या वतीने येथील झाडांची पूजा व पर्यावरणविषयक जागृती अभियान राबविण्यात आले.

याप्रसंगी शुभम जाधव, केदार पाटील, राजेश वाघमोडे, ऋषिकेश हरसुरे, चेतन झाडे, दीपक करकी, शहाबाज म कानदार, किरण सरवळे, राजेश केकडे आदी उपस्थित होते.



## पूर्वविभागवासीयांनी केले पंचांग श्रवण अन् पच्चडा प्राशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ मार्च-**

हिंदू संस्कृतीतील गुढीपाडवा हा दिवस तेलुगुभाषिक उगादी पंडुंगा म्हणून साजरी करतात. यादिवशी वालचंद महाविद्यालयसमोरील श्रीभावनाऋषी पटांगण येथील श्री पंचमुखी हनुमान मंदिर येथे पूर्वविभागवासीयांनी सामुहिकरित्या पंचांग श्रवण करुन पच्चडा प्राशन केले.

प्रारंभी नगरसेवक सत्यनारायण गुर्रम यांच्या भगव्या ध्वजाचे पूजन करण्यात आले.पद्मपुरोहितांच्या पवित्र वेदमंत्रोच्चाराने मंदिरसह परिसरात नवचैतन्य पसरले होते. ध्वजस्तंभाभोवती काढलेली आकर्षक रांगोळी, मध्यभागी फुलांनी सजवलेले पंचांग, आंबा-लिंबाच्या पानांची तोरणे आणि साखरेच्या हारांनी सजवलेला पच्चडा हंडा विलोभनीय चित्र पाहण्यालायक होते. पच्चडा प्राशनद्वारे जीवनातील विविध चवींचा स्वीकार करण्याचा हा सुंदर संदेश देणारा सोहळा ठरला. सोलापूरच्या पूर्व भागात तेलुगु बांधवांनी जपलेली परंपरा म्हणजे संस्कृतींचा अद्भुत संगम. चैत्र शुद्ध प्रतिपदेचा हा दिवस म्हणजे मराठी संस्कृतीतील गुढीपाडवा आणि तेलुगु संस्कृतीतील उगादी पंडुगा यांचा सुरेख मिलाप अनुभवण्याचा अनोखा क्षण होता. येथील बहुसंख्य श्रमिक, कष्टकरी तेलुगु बांधवांनी आपल्या परंपरा जपत उद्योग, सहकार, राजकीय, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि अध्यात्मिक क्षेत्रात एकात्मतेची आणि समरसतेची परंपरा रुजवली आहे. हा सोलापूरचा खरा अभिमान आहे, असे यावेळी सांगण्यात आले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# धर्मवीर संभाजी महाराज तलाव सुशोभीकरणात कोट्यवधींचा गैरप्रकार !

## चौकशीअंती संबंधितांवर कारवाईची मागणी; अन्यथा आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मार्च-**

शहरातील धर्मवीर संभाजी महाराज तलाव सुशोभीकरणाच्या कामात मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाली आहे. कोट्यवधी रुपयांचा खर्च दाखवून प्रत्यक्षात काम अपूर्ण व निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचा आरोप करत या प्रकरणी चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी अन्यथा महापालिका प्रवेशद्वारा समोर आंदोलन करण्यात येईल, असा इशारा सामाजिक कार्यकर्ते सागर टूरके यांनी पत्रकार परिषदेत दिला आहे.

जिक कार्यकर्ते सागर टुरके यांनी कागदपत्रांसह माहिती देताना सांगितले की, २०१९ ते २०२२ या कालावधीत तलाव सुशोभीकरणासाठी जवळपास ९ कोटी रुपयांचे टेंडर काढण्यात आले. मात्र प्रत्यक्ष ठिकाणी या निधीच्या ५० टक्के कामही दिसून येत नाही. स्थापत्य कामावर सुमारे ८ कोटींचा खर्च दाखवण्यात आला असला, तरी झाड लागवड, रेलिंग, भिंती दुरुस्ती यांसारखी कामे अपूर्ण किंवा निकृष्ट अवस्थेत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले.

गाळ काढण्यासाठी ७ कोटी रुपये खर्च दाखवण्यात आला असून हे काम तामिळनाडूतील कंपनीला देण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात अपेक्षित प्रमाणात गाळ काढण्यात आलेला नाही, असा आरोप करण्यात आला.

तसेच जलपर्णी निर्मूलनासाठी २ कोटी ४२ लाखांचा खर्च दाखवला असतानाही तलावात आजही मोठ्या प्रमाणावर जलपर्णी दिसून येत असल्याचे टुरके यांनी सांगितले. याशिवाय पाण्याची गुणवत्ता तपासणी, सोलर लाईट बसविणे यांसारखी कामेही कागदावरच असल्याचा आरोप आहे. ही कामे सुरत येथील कंपनीला देण्यात आली होती. १५०० झाडे लावण्यासाठी १३ लाख रुपये खर्च दाखवण्यात आला असला, तरी प्रत्यक्षात झाडे दिसून येत नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

विशेष म्हणजे, तलाव परिसरात बांधण्यात आलेली मुतारी ही माजी महापौर नलिनी चंदेले यांच्या कार्यकाळातील जुनी कामे असून, त्याच कामाचे पुन्हा बिल काढण्यात आल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे.

लिकेतील ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमतातून हा प्रकार घडल्याचा संशय व्यक्त करण्यात आला असून, संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र समितीमार्फत सखोल चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.दरम्यान, उद्या होणाऱ्या महापालिका सभेत नव्याने निवडून आलेले नगरसेवक हा मुद्दा उपस्थित करून संबंधितांवर कारवाईची मागणी करतील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.

या पत्रकार परिषदेला राजू कलमाडी, श्रीकांत गायकवाड आदी उपस्थित होते.

## ज्ञानामृत आनंदलहरी - १३८७

**कीं औषधाचिया कडुवटपणीं । जैसी अमृताची पुरवणी ।**
**ते आहाच न दिसे परी गुणी । प्रकट होय ।।**

श्रीकृष्ण हे अर्जुनासाठी सर्वस्व आहेत. आपल्यावर कांहीही संकट आले, आपण रस्ता भरकटलो तरीही आपणाला संकटातून तारणारा, योग्य मार्गावर आणणारा श्रीकृष्ण परमात्मा आहे, याचा आत्मविश्वास अर्जुनाला आहे. अर्जुनाला जसा श्रीकृष्ण सखा मिळाला तसा सखा ज्याला मिळेल तो खरा भाग्यंत आहे. श्रीकृष्णाची गीता, ज्ञानदेवांची ज्ञानेश्वरी ही सुध्दा श्रीकृष्णरुपी सखाच आहेत हे विसरता कामा नये. अद्याप अडचण, संकट आले नाही किंवा येणार नाही असा एकही व्यक्ती असू शकत नाही. अर्थात, मानवी जीवनात असा एखादा तरी प्रसंग येतोच की जेथे मार्गदर्शकाची गरज पडते. हा मार्गदर्शक नि:स्वार्थी व योग्य मार्गदर्शन करणारा असावा अशी सर्वांची अपेक्षा असते. असा मार्गदर्शक मित्र, आई, वडील, गुरुजन, संत महात्मा किंवा अन्य कोणीही असू शकतो. मोहग्रस्त अर्जुनाला आपण चुकत आहोत हे लक्षात येत आहे. त्याचवेळी त्याला हे ही लक्षात आहे की आपणाला या मोहातून, अडचणीतून बाहेर काढण्यासाठी श्रीकृष्ण सखा आहे.



आपण चुकत असलो तर समोरच्याने फार गोडीने, प्रेमानेच मार्गदर्शन केले पाहिजे असे नाही. वर-वर रागावून पण आतून प्रेमाने मार्गदर्शन करणे सुध्दा वेळप्रसंगी योग्यच असते. पण ब-याच व्यक्तींना असे मार्गदर्शन आवडत नाही. असे न आवडणे म्हणजे स्वत:च्या पायावर कु-हाडी मारुन घेतल्यासारखे आहे. मार्गदर्शक, सखा हा अडचणीत सापडलेल्या मित्राला, व्यक्तिला त्या अडचणीतून बाहेर कसे काढता येईल याचा पूर्ण विचार करीत असतो. एखादया असाध्य रोगातून रोग्याला बरे करण्यासाठी वैदय त्या रोगावरील अमृतासारखे दिव्य औषध शोधतो. त्याप्रमाणे अर्जुनाचा हा मोहरुपी असाध्य रोग बरा करण्यासाठी त्या दोन सैन्याच्या मध्ये उभा राहून तो श्रीकृष्ण परमात्म्यांनी योग्य त्या औषधाचा विचार सुरु केला. त्यांनी योग्य तो उपाय शोधलाही.

या मोहनाशाचा उपाय मनात योजून आणि मग उघडपणे रागाने बोलण्यास श्रीकृष्णांनी प्रारंभ केला. जसे आईच्या रागात मुलाविषयीचा वात्सल्य भाव झाकलेला असतो. त्याप्रमाणे श्रीकृष्णाचा अर्जुनाविषयीचा भाव होता. माऊली म्हणणात की, औषधाच्या कडुपणात अमृताची गुप्त साठवण असते, ती उघडपणे दिसत नाही. परंतु रोग बरा झाल्यावर त्याच्या गुणांचा भाव स्पष्ट होतो. त्याप्रमाणे वरपांगी कठोर भासणारी, परंतु आतमध्ये अत्यंत रसपुर्ण अशी मधुरवचने बोलण्यास श्रीकृष्णांनी प्रारंभ केला आहे. आजकाल ब-याच मुलांना, आई-वडीलांनी, गुरुजनांनी असे आतून मधूर पण बाहेरुन कठोर वाटणारे शब्द बोलले तरी राग येतो, वाईट वाटते. बाहय बाबीकडे पाहाण्याची दृष्टी वाढली जात आहे. अजिबात न दुखवता सर्व सुखावहच पाहिजे अशी वृत्ती चुकीची असते. गुरुजनांवर, आई-वडीलावर विश्वास असणे हा ख-या सुखाचा आधारस्तंभ होय. हा विश्वास निर्माण व्हावा व तो कायमस्वरुपी टिकून राहावा यासाठी अर्जुन-श्रीकृष्णाच्या नात्याचा आदर्श डोळयासमोर ठेवणे योग्य होईल, असे आम्हास वाटते. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**



# जागतिक चिमणी दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मार्च-**

एस. व्ही. सी. एस. हायस्कूल, भवानी पेठ येथे जागतिक चिमणी दिन मोठ्या उत्साहात व विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक तथा कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य राम ढाले होते. तसेच उपमुख्याध्यापक रामेश्वर झाडे, पर्यवेक्षक महादेव वांगीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांच्या सुंदर सूत्रसंचालनाने झाली. सातवी 'अ' मधील चि. नागेश खांडेकर व श्रावणी माकणे यांनी प्रभावी सूत्रसंचालन करत कार्यक्रमाची रंगत वाढवली.

अध्यक्षीय मनोगतामध्ये ढाले यांनी चिमण्यांचे पर्यावरणातील महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, चिमण्या या परिसंस्थेचा अत्यंत महत्त्वाचा भाग असून त्यांच्यामुळे कीटक नियंत्रण, पर्यावरण संतुलन राखले जाते. तसेच आधुनिक जीवनशैलीमुळे चिमण्यांची संख्या कमी होत असल्याची खंत व्यक्त करत विद्यार्थ्यांनी पाणी ठेवणे, धान्य टाकणे, झाडे लावणे व पक्ष्यांप्रती संवेदनशीलता बाळगणे अशा चांगल्या सवयी आत्मसात करण्याचे आवाहन केले. या निमित्ताने विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. चिमणी दिन विशेष नाटक नागेश खांडेकर, श्रावणी माकणे, अथर्व धप्पाधुळे व विजयालक्ष्मी सपाने यांनी सादर केले. तसेच चिमणी दिन आत्मकथन ईश्वरी काळे, भाषण श्रावणी बिराजदार, ओवी ''खोप्या मंदी खोपा'' कार्तिकी दरेकर व ''हरवलेली चिमणी'' ही कविता वैष्णवी बिराजदार यांनी प्रभावीपणे सादर केली.

विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या पर्यावरणपूरक घरट्यांचे प्रदर्शनही आयोजित करण्यात आले होते. या घरट्यांचे निरीक्षण करून प्रमुख पाहुणे, मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले.

# मनपा शाळेत 'गुढीपाडवा पट वाढवा' उपक्रमाची उत्साहात सुरुवात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मार्च-**

मनपा प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर यांच्या वतीने गुढीपाडव्याच्या निमित्ताने पट वाढवा मोहीम उत्साहात राबविण्यात येत आहे. माननीय प्रशासनाधिकारी मल्हारी माने यांच्या मार्गदर्शनाखाली मनपा प्राथमिक शिक्षण विभागामार्फत हा नाविन्यपूर्ण उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत नवीन विद्यार्थ्यांची नावनोंदणी, पालक सर्वेक्षण, शाळांमधील विविध शैक्षणिक सुविधा व उपक्रमांची माहिती देणे असे अनेक उपक्रम राबविण्यात येत आहेत.याच मोहिमेचा एक भाग म्हणून आज मनपा मुलांची शाळा क्रमांक २७ येथे गुढीपाडव्याचे औचित्य साधून पट वाढवा उपक्रमाची गुढी उभारण्यात आली.

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : गुरूवार,
दि. २० मार्च २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - राक्षस
मास - फाल्गुन शु. द्वितीया
ऋतु - वसंत ।
नक्षत्र- रेवती (२६.२७)
योग - ब्रह्मा (२२.१४)
करण - बालव (१५.४४)
राहू काल : बुधवार
दु. १०.५८ ते १२.२९

दिनविशेष : * आंतरराष्ट्रीय आनंद दिवस
* जागतिक चिमणी दिन
* विषुव दिन
१६०२: डच ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली.
१९५२: आनंद अमृतराज - प्रसिद्ध भारतीय टेनिस खेळाडू यांचा जन्म
१९५६: बा. सी. मर्ढेकर - मराठी नवकाव्याचे प्रणेते आणि ज्येष्ठ साहित्यिक यांचे निधन.



# आजच्या पिढीने आपले आदर्श तपासावेत : जगताप

## वसुंधरा महाविद्यालयाचे वार्षिक पारितोषिक वितरण उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मार्च-**

शिक्षणाचे संदर्भ बदलले आहेत. काळ स्पर्धेचा आहे. नवीन कौशल्य आत्मसात करून नव्या वाटा मिळण्याचे सामर्थ्य तयार करावे लागेल. यासाठी विद्यार्थ्यांनी आपले आदर्श तपासावेत असे प्रतिपादन अभियंता राजेश जगताप यांनी केले.

ते वसुंधरा महाविद्यालयाच्या २६व्या वार्षिक पारितोषिक वितरण प्रसंगी बोलत होते.

सुरुवातीस महाविद्यालयाच्या प्रगतीचा आलेख प्र. प्राचार्य डॉ. तानाजी देशमुख, यांनी मांडला. प्रियंका राठोड मराठी विभागात प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल बुद्धवासी मुरलीधर उघडे यांच्या स्मरणार्थ एक हजार रुपये व प्रमाणपत्र पारितोषिक देण्यात आले.

यावेळी आंतरविद्यापीठ मैदानी स्पर्धेत सर्वसाधारण विजेतेपद पटकावल्यामुळे सर्व खेळाडूंचा विशेष सत्कार करण्यात आला.याप्रसंगी प्राचार्य अंबादास पांढरे, डॉ. अनुराधा क्षीरसागर, डॉ. सुहास उघडे आदींची प्रमुख उपस्थिती होती. पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांच्या यादीचे वाचन डॉ. प्रदीप कोल्हे, डॉ अशोक पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. डॉ. सुहास उघडे प्रास्ताविक केले. परिचय प्रा. डॉ. मारोती घंटेवाड यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ. किशोर जोगदंड, रेश्मा सुर्वे यांनी केले. डॉ. चंद्रकांत कांबळे यांनी आभार मानले.



# रयत माऊली लक्ष्मीबाईंचे जीवन हे इतिहासातील सर्वोत्तम त्यागाची तेजस्वी गाथा : खासदार प्रा. डॉ. वाघमारे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मार्च-**

रयत माऊली लक्ष्मीबाई पाटील यांच्या त्यागातूनच रयत शिक्षण संस्था उभी राहिली आणि बहुजनांच्या आयुष्याला दिशा देणारी चळवळ बनली. स्वतःच्या सुखाचा, दाग-दागिन्यांचा आणि वैयक्तिक आयुष्याचा त्याग करून वसतिगृहातील दीन-दुबळ्या विद्यार्थ्यांच्या आयुष्यात आईचा आधार देणाऱ्या विशाल मातृत्त्वाच्या रयत माऊली लक्ष्मीबाई पाटील यांचे जीवन हे इतिहासातील सर्वोत्तम त्यागाची तेजस्वी गाथा आहे, असे प्रतिपादन राज्यसभेच्या नवनियुक्त सदस्या खासदार प्रा. डॉ. ज्योतीताई वाघमारे यांनी केले.

सातरस्ता मोदीखाना येथील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात रयत माऊली लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित व्याख्यान कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी उद्योजिका माधुरीताई पाटील होत्या. व्यासपीठावर नगरसेवक प्रियदर्शन साठे, माजी विद्यार्थी संघटनेच्या अध्यक्षा वैशाली गुंड यांची उपस्थिती होती.

उद्योजिका माधुरीताई म्हणाल्या, लक्ष्मीबाईंच्या त्यागमय जीवनाचा गौरव करत विद्यार्थिनींना त्यांच्या आदर्शांचे अनुकरण करण्याचे आवाहन केले. शिक्षण, संस्कार आणि सामाजिक बांधिलकी यांचा संगम साधत जीवन घडवावे.

प्रारंभी पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थिनींना पाटील कुटुंबियांकडून दिले जाणाऱ्या मिष्ठान्नाचे वाटप करण्यात आले. प्राचार्य डॉ. सुरेश ढेरे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. पाहुण्यांचे स्वागत व परिचय डॉ. देवराव मुंडे यांनी करून दिले. सूत्रसंचालन डॉ. इंदुमती गंगन्नवर यांनी केले. उपप्राचार्य डॉ. किशोर पवार यांनी आभार मानले.

### आवाज नसलेल्यांचा आवाज बना

खासदार प्रा. डॉ. वाघमारे यांनी विद्यार्थिनींना आवाहन केले की, स्त्रीत्वाचा अभिमान बाळगत सूर्यासारखे तेजस्वी व्हा. हे तेज आत्मविश्वास, संस्कार आणि निर्भयतेतून येते. महिला सुरक्षिततेचे कायदे जाणून घेणे अत्यावश्यक आहे. अन्याय झाला तर गप्प बसू नका; आवाज उठवा. आवाज नसलेल्यांचा आवाज बना.

# मनपा शिक्षक सोसायटीच्या तज्ज्ञ संचालकपदी स्नेहा पुजारी यांची निवड



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मार्च-**

महानगरपालिका प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी मर्यादित सोलापूर माहे मार्च २०२६ संचालक मंडळाच्या च्या मासिक बैठकीमध्ये कालावधी संपल्याने रिक्तझालेल्या तज्ञ संचालक या पदावर महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय शिक्षक संघटनेच्या महिला संघटक व मनपा मराठी मुलींची केंद्रशाळा कॅम्प च्या सहशिक्षिका स्नेहा सदाशिव पुजारी यांची बिनविरोध निवड करण्यात आली. त्यांचा कालावधी हा दीड वर्षाचा असणार आहे. तज्ञ संचालक पदी निवडीचे पत्र त्यांना चेअरमन नागेशपुरी गोसावी यांच्या हस्ते देण्यात आले. सदर संचालक मंडळाच्या बैठकीस चेअरमन नागेश गोसावी, व्हाईस चेअरमन जहारा नकदेकर, संचालिका स्वाती शिंदे, शाहीन शेख, गंगाधर कांबळे, मुद्देसरपाषा पिरेजादे, कृष्ण परमेश्वर सुतार,केशव गलगली आदी संचालक, व्यवस्थापक समर्थ जाधव व लिपिक शाकीर शेख,तसेच प्रसन्न निकंबे, किरण शेळगे,उमेश युवनाती, संतोष सुतार राहुल पाटील, विशाल मनाळे, आरती शिवशरण, शितल लष्कर, आप्पासाहेब ककमारे, मिलिंद खंदारे आदी संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.सूत्रसंचालन संचालक कृष्ण परमेश्वर सुतार तर आभार माजी संचालिका आसमा शेख यांनी मानले.


# महापालिका अंदाजपत्रक : सामाजिक कल्याण निधी कपात चिंताजनक

## आकड्यांच्या पलीकडे शहराच्या विकासाचा विचार व्हावा

सोलापूर शहराच्या विकासासाठी महापालिकेचे अंदाजपत्रक हे केवळ आकड्यांचे गणित नसून, शहराच्या भवितव्याची दिशा ठरवणारे धोरणात्मक दस्तऐवज आहे. दरवर्षी कोट्यवधी रुपयांचे बजेट सादर होते; मात्र त्या आकड्यांचा प्रत्यक्षात नागरिकांच्या जीवनमानावर किती परिणाम होतो, हा मूलभूत प्रश्न कायम अनुत्तरित राहतो. त्यामुळे अंदाजपत्रकाकडे केवळ आर्थिक तक्ते म्हणून न पाहता, त्यातून शहराच्या विकासाचा खरा आराखडा दिसतो का, याचे परीक्षण होणे अत्यावश्यक आहे.

यंदाच्या अंदाजपत्रकात १३८९ कोटी रुपयांच्या आसपासची तरतूद करत काही प्रमाणात वाढ दर्शवण्यात आली आहे. लोकांच्या सूचना मागवून 'लोकाभिमुख' अंदाजपत्रक तयार केल्याचा दावा सत्ताधाऱ्यांकडून केला जात असला, तरी दुसरीकडे विरोधकांनी सामाजिक कल्याण विभागातील मोठ्या कपातीवर बोट ठेवत हा केवळ दिशाभूल करणारा प्रयत्न असल्याचा आरोप केला आहे. विशेषतः अनुसूचित जाती-जमाती व दुर्बल घटकांसाठीच्या निधीत झालेली कपात ही चिंतेची बाब आहे. विकासाच्या नावाखाली जर समाजातील सर्वात गरजू घटकांकडे दुर्लक्ष होत असेल, तर त्या विकासाला सर्व समावेशक म्हणता येणार नाही. गेल्या दोन वर्षापासून हा निधी अखर्चित का राहिला असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. त्यामुळे संबंधित समाज विकासापासून वंचितच राहिला. त्यामुळे सामाजिक कल्याण निधीचा प्रशासकीय अंदाजपत्रकातील एकूण ८ कोटी १० लाखाचा निधी कायम ठेवणे गरजेचे आहे. अखर्चित निधी ठेवण्याच्या पापाचे प्रायचित्त आता प्रशासनानेही करण्याची गरज आहे. सत्ताधाऱ्यांनी सामाजिक उत्तरदायित्व जोपासणे गरजेचे आहे. झोन कार्यालयाकडील कामांसाठीच्या निधीमध्ये कपात हा विषय ऐरणीवर आला आहे. निश्चितच सत्ताधाऱ्यांनी त्याचा पुनर्विचार करण्याची गरज आहे.

सोलापूर शहर आजही मूलभूत समस्यांच्या विळख्यात अडकलेले आहे. पाणीटंचाई, खड्डेमय रस्ते, कचरा व्यवस्थापनातील त्रुटी आणि अपुरी आरोग्य सेवा या प्रश्नांनी नागरिक हैराण आहेत. उन्हाळा सुरू होताच पाण्याचा प्रश्न गंभीर बनतो, तर शहरातील अस्वच्छता ही आरोग्याच्या दृष्टीने धोकादायक ठरते. अशा परिस्थितीत अंदाजपत्रकाने या प्रश्नांवर ठोस आणि परिणामकारक उपाययोजना सुचवणे अपेक्षित असते. केवळ निधीची तरतूद करून चालणार नाही, तर त्या निधीचा योग्य आणि वेळेवर वापर होणे अधिक महत्त्वाचे आहे. महापालिकेची आर्थिक स्थितीही चिंतेची आहे. मर्यादित उत्पन्न आणि वाढता खर्च यामुळे आर्थिक ताण वाढत आहे. थकबाकीची वाढ आणि नियोजनातील कमतरता यामुळे विकासकामांना गती मिळत नाही. त्यामुळे आर्थिक शिस्त, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व या तिन्ही बाबींची काटेकोर अंमलबजावणी गरजेची आहे. नवीन उत्पन्न स्रोत






निर्माण करणे आणि अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवणे ही काळाची गरज आहे.

आजच्या युगात शहराचा विकास केवळ रस्ते व इमारतींपुरता मर्यादित राहू शकत नाही. पर्यावरण संवर्धन, हरित क्षेत्रांची वाढ, डिजिटल सुविधा, स्मार्ट प्रशासन आणि स्वच्छता यांचा समतोल साधणारे नियोजन आवश्यक आहे. भविष्यातील आव्हानांचा विचार करून तयार केलेले अंदाजपत्रकच शहराला प्रगततेकडे नेऊ शकते.

यासोबतच नागरिकांचा सहभाग हा विकास प्रक्रियेचा केंद्रबिंदू ठरला पाहिजे. ''आपलं सोलापूर आपला अर्थसंकल्प'' ही संकल्पना केवळ घोषणांपुरती न राहता प्रत्यक्षात उतरली, तरच लोकाभिमुख प्रशासनाची खरी सुरुवात होईल. तज्ज्ञ, सामाजिक संस्था आणि सामान्य नागरिक यांच्या सूचनांचा विचार करून प्राधान्यक्रम ठरवले, तर अंदाजपत्रक अधिक वास्तववादी ठरू शकते.

शेवटी, सोलापूर महापालिकेचे अंदाजपत्रक हे केवळ कागदावरील आकडे न राहता शहराच्या सर्वांगीण विकासाचे प्रभावी साधन बनले पाहिजे. पारदर्शकता, समावेशकता आणि शाश्वत विकासाचा विचार यांचा समतोल साधला, तरच सोलापूर खऱ्या अर्थाने प्रगतीच्या मार्गावर वेगाने पुढे जाईल. नागरिकांच्या अपेक्षांना न्याय देणारे आणि शहराच्या भवितव्याला दिशा देणारे अंदाजपत्रक हीच आजची खरी गरज आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...

## पिलीव परिसरात विजेचा लपंडाव

### शेतकरी व विद्यार्थी हतबल, ग्रामीण भागात तब्बल आठ तास लोडशेडिंग

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव दि १९ मार्च-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव परीसरात गेल्या आठ दिवसांपासून विजेचा लपंडाव सुरु असुन यामुळे शेतकऱ्यांची उभी पिके पाणी असुनही ऐन उन्हाळ्यात अक्षरश जळुन चालली आहेत. विहीरीत एकतर जस जसे ऊन वाढु लागले आहे तसे पाणी कमी होऊ लागले आहे. जे थोडेफार पाणी आहे ते काढण्यासाठी लाईटच नाही. पाच दहा मिनीट मोटार चालली की लगेच बंद पडत आहे. यामुळेच शेतकरी अक्षरश हतबल झाले आहेत. शेतात उभी पिके केवळ वीजपुरवठा सुरळीत नसल्यामुळेच जळुन चालली आहेत. शेती पंपाबाबत सरकारचे शेतकऱ्यांना दिवसा अखंडितपणे वीजपुरवठा करण्याचे धोरण अडचणीत आले आहे. तर पिलीव परीसरातील गावठाण सोडुन इतर जवळपास आठ फिडरवर सकाळी सहा ते आठ असे दोन तास तर संध्याकाळी सहा ते रात्री दहा वाजेपर्यंत चांदापुरी, शिंगोर्णी, कुसमोड, सुळेवाडी, शेरी, बचेरी, पडळकर, शेरी नवीन या फिडरवर सिंगल फेज लाईट बंद आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे प्रचंड मोठे शैक्षणिक नुकसान होत आहे.संध्याकाळी अभ्यास करण्याच्या वेळेस तब्बल चार तास लोडशेडिंग आहे. ऐन परीक्षेच्या कालावधीतच महावितरणने झटका दिला आहे. शेतकऱ्यांना सकाळी व संध्याकाळी दुध काढण्यासाठी व इतर कामासाठी लाईटची गरज आहे पण लाईट नसल्यामुळे शेतकऱ्यांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. म हावितरणच्या ह्या झटकयामुळे शेतकरी, विद्यार्थी प्रचंड हतबल झाले आहेत. यामुळे पिलीव परीसरातील नागरिक आंदोलनाच्या पवित्र्यात असुन लवकरच महावितरणच्या विरोधात नागरिक रास्ता रोको करणार असल्याचे नागरिक बोलत आहेत.

**वरिष्ठ पातळीवरून लोडशेडिंगचे आदेश**

पिलीव महावितरणचे सहाहायक अभियंता थोरात म्हणाले, वरुनच लोडशेडिंग आहे. आमच्या जवळ काहीच नाही आम्हाला वरिष्ठ पातळीवरून लोडशेडिंग बाबत आदेश आहेत

**उभी पिके लाईट वाचुन जळतात**

शासन एकीकडे मोफत लाईट म्हणत आहे पण सिंगल फेज सहा तास लोडशेडिंग व शेतकऱ्यांना दिलेली आठ तास लाईट सुद्धा व्यवस्थीत नाही .सध्या उभी पिके लाईट वाचुन जळुन चालली आहेत.

**सागर गोंजारी,** कुसमोड शेतकरी



## पहिलीच्या वर्गात विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत करत शैक्षणिक गुढी केली उभी

**सोलापूर, दि. १९ मार्च-**

जि.प. प्रशाळा कोरवली येथे गुढीपाडवा पट वाढवा या उपक्रमांतर्गत गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये इयत्ता पहिलीच्या वर्गात नव्याने दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत करून शैक्षणिक गुढी उभी करण्यात आली. नवागत विद्यार्थ्यांचे औक्षण, पाद्यपूजा करून शाळेतील पहिले पाऊल साजरे करण्यात आले. यामध्ये कोरवलीचे सरपंच दयानंद पाटील, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष मल्लिनाथ म्हमाणे, उपाध्यक्ष रमेश तारके व केंद्रप्रमुख राठोड यांच्या हस्ते सर्व विद्यार्थ्यांना साखरेचा हार, टोप्या, गुलाब, चॉकलेट,बिस्कीट वाटप करण्यात आले. याप्रसंगी बाबासाहेब कस्तुरे, चंद्रकांत म्हमाणे, चिदानंद तारके, विक्रम तीर्थे,जमदाडे, गायकवाड यासह महिला पालक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक सुहास पाटील यांच्यासह सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# दहावी परीक्षेत गुन्हा दाखल असलेले ते दहा विद्यार्थी अद्यापही मोकाट

### पोलिस महानिरीक्षक सुनील फुलारी यांच्याकडे मनसेचे नारायण गोवे यांची तक्रार

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि. १९ मार्च-**

नंदेश्वर येथील दहावी परीक्षे दरम्यान तोतया विद्यार्थी परीक्षेला बसविल्याप्रकरणी एकूण २० विद्यार्थ्यावर गुन्हे दाखल असून त्यापैकी केवळ १० विद्यार्थ्यांना अटक करण्यात आली. उर्वरीत दहा विद्यार्थी, प्रशालेचे मुख्याध्यापक,संस्थाचालक अद्यापही मोकाट असून हा तपास संशयाच्या भोवऱ्यात सापडला आहे. दरम्यान तपासाधिकाऱ्याची चौकशी करुन योग्य ती कारवाई करावी व सक्षम अधिकारी नेमून या घटनेचा पुर्ण तपास करावा अशी मागणी मनसेचे जिल्हा समन्वयक नारायण गोवे यांनी कोल्हापूर परिक्षेत्र विभागाचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनिल फुलारी यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे.

या घटनेची हकीकत अशी,दि.२० फेब्रुवारी रोजी नंदेश्वर येथील दहावी परीक्षा केंद्रावर केंद्र संचालक यांनी मुलांचे तिकीट हॉल तपासताना दहा विद्यार्थी बोगस अर्थात तोतया असल्याचे उघड झाल्याने त्यांच्यावर केंद्र संचालकाच्या फिर्यादीवरुन मंगळवेढा पोलीसात गुन्हे दाखल झाले होते. त्याचबरोबर मुळ दहा विदयार्थी यांच्यावरही गुन्हे दाखल झाले होते. तपासिक अंमलदार सहाय्यक पोलीस निरीक्षक लातुरकर यांनी केवळ तोतया दहा विद्यार्थ्यास अटक केली. ते सध्या जामीनवर मुक्त झाले आहेत. उर्वरीत दहा विद्यार्थी एक महिन्याचा कालावधी लोटत आला असतानाही त्यांना अटक करण्याची तपासाधिकाऱ्यांनी तसदी घेतली नाही. लक्ष्मी दहिवडी येथील सुतार इन्टरनॅशनल स्कुलचे मुख्याध्यापक यांनाही या घटनेत अटक होवूनही अपेक्षित असताना अद्यापही त्यांना अटक नाही. माध्यमिकचे ८ ते १० वर्ग येथे उपलब्ध नसतानाही सांगली जिल्ह्यातील बोगस विद्यार्थी बसवून धुळफेक केली आहे. दहावीचे एकूण ५३ विद्यार्थी परीक्षेला बसल्याची माहिती मिळत असून त्यापैकी दहा विदयार्थीच सापडले,उर्वरीत विदयार्थ्यांचा तपास होणेही तितकेच गरजेचे आहे. हे बोगस विद्यार्थी सांगली येथील आर.के.पंचीयन स्पोर्टस ॲकॅडमीची विद्यार्थी असल्याची माहिती स्पष्ट होत आहे. या ॲकॅडमीची संस्थापक भिमराव कोडगिरे आहेत. प्रशालेचे मुख्याध्यापक मधुकर जुंदळे असल्याची खात्रीशीर माहिती आहे. परीक्षेला बसलेले सर्व विद्यार्थी सोलापूर जिल्हयाच्या बाहेरील आहेत. सदर संस्थेचे सोलापूर जिल्हयात अन्य चार ठिकाणी वर्ग चालू आहेत. त्याचीही चौकशी होणे गरजेचे आहे. तपासिक अंमलदार यांनी घटनेच्या मुळाशी जावून तपास करुन या बोगस संस्थेचा कारभार चव्हाटयावर आणणे गरजेचे असताना त्यांनी हातमिळवणी करुन खोलवर तपास केला नसल्याचा आरोप गोवे यांनी केला आहे. त्यामुळे पोलीस महानिरीक्षक सुनिल फुलारी यांनी गांभीर्यपुर्वक यात लक्ष घालून दुधाचे दूध व पाण्याचे पाणी करावे अशी मागणी आहे. तपास व्यवस्थित न झाल्यास महाराष्ट्र दिनी १ मे रोजी मंगळवेढा पोलीस ठाण्यासमोर अन्नत्याग उपोषण करण्याचा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. या निवेदनाच्या प्रती राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस,राज्याचे शिक्षणमंत्री दादासो भुसे,मंगळवेढा उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.बसवराज शिवपुजे,पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे, गटशिक्षणाधिकारी शहा आदींना देण्यात आल्या आहेत.



## लोकविकासमध्ये वार्षिक क्रीडा स्पर्धा बक्षीस वितरण उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**वेळापूर, दि. १९ मार्च-**

येथील लोकविकास इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये वार्षिक क्रीडा स्पर्धेचे बक्षीस वितरण उत्साहात झाले.

साखर कारखान्याचे चीफ केमिस्ट विठ्ठल आडत, सावित्रीबाई फुले महिला पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन सुवर्णा आडत, जेष्ठ नागरिक नरेंद्र कुलकर्णी, शिवाजी सावंत, शिवगंगा दूध डेअरीचे चेअरमन भागवत गायकवाड, लोकविकास शिक्षण संस्थेचे सचिव चंद्रकांत नवले, ज्युनिअर कॉलेजचे मुख्याध्यापक अमोल पांढरे, स्कूलचे मुख्याध्यापक अजित बनकर, लोकविकास मराठी मिडीयमचे मुख्याध्यापक सुनील पताळे यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरूवात झाली.

यावेळी वैयक्तीक स्पर्धेमध्ये तसेच सांघिक स्पर्धेमध्ये प्रथम द्वितीय क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. नरेंद्र कुलकर्णी व विठ्ठल आडत यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी वैशाली आदलिंगे, ज्योती गाडेकर, प्रियंका अनंतकवळस, उषा राऊत, राणी शिंदे, वैभव जगताप, आदी शिक्षक उपस्थित होते.

सूत्रसंचालन पूजा कुदळे यानी केले. कोमल चव्हाण यांनी आभार मानले.



## केडगाव शाळेत विद्यार्थ्यांचा विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम उत्साहात

### तब्बल ७३ हजार रुपये देणगी जमा

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि.१९ मार्च**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा केडगाव ता.(करमाळा) येथील सांस्कृतिक पंचायत समिता सदस्या सोनाली तकिक व शिक्षण विस्तार अधिकारी जयवंत नलवडे यांच्या हस्ते उद्घाटन करुन संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात जिजाऊमाता, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतिमेचे पूजन करून झाली.

या कार्यक्रमाच्या उदघाटन प्रसंगी विद्यमान पंचायती समिती सदस्या सोनाली तकिक, शिक्षण विस्तार अधिकारी जयवंत नलवडे यांनी पालक - माता विद्यार्थी व शिक्षक यांना मार्गदर्शन केले. यावेळी राष्ट्रवादी युवा काँग्रेस तालुकाअध्यक्ष महेश बोराडे, सरपंच आशा गुटाळ,माजी पोलीस उपनिरीक्षक श्री बलभीम सोपान बोराडे, ग्रामपंचायत सदस्य शिवाजी गायकवाड, शशिकला पाटील, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष रविराज शिंदे, उपाध्यक्ष भैरवनाथ शिनगारे, शिवाजी भोरे, संतोष मस्तुद, युवक नेते अमोल बोराडे, राजेंद्र पवार, संतोष गुटाळ, युवक नेते बालाजी बोराडे, अक्षय पाटील उपस्थित होते.

या कार्यक्रमात मुलांनी शैक्षणिक सामाजिक सांस्कृतिक पर्यावरण अशा विविध गाण्यातून सामाजिक संदेश दिला या कार्यक्रमासाठी गावातील लोकांनी भरभरून देणगी दिली. ७३ हजार रुपये देणगी जमा झाली. या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी शाळेच्या आदर्श मुख्याध्यापिका तथा चिखलठाण केंद्राच्या केंद्रप्रमुख वंदना पांडव शाळेतील शिक्षक बापूराव तकिक तसेच प्रदीप आव्हाड यांनी परिश्रम घेतले.

सूत्रसंचालन प्रा. नंदकिशोर वलटे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी माजी शिक्षण विस्तार अधिकारी भारत पांडव, माजी ग्रामपंचायत सदस्य संतोष मस्तुद, साऊंड सिस्टिम ऑपरेटर सुभाष लगस, शिवगर्जना प्रतिष्ठान केडगाव, भैरवनाथ मित्र मंडळ केडगाव शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य यांचे सहकार्य लाभले. आभार प्रदीप आव्हाड यांनी मानले.

## जिल्हा परिषद चाकोरे शाळेत 'गुढीपाडवा पट वाढवा' कार्यक्रम उत्साहात



**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १९ मार्च-**

जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा चाकोरे (ता. माळशिरस) येथे बुधवार दि. १८ रोजी गुढीपाडवा पट वाढवा उपक्रमांतर्गत पुढील शैक्षणिक वर्षात पहिलीत दाखल झालेल्या विद्यार्थी आणि पालकांचा सत्कार समारंभ उत्साहात साजरा केला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून अकलूज येथील पत्रकार शशिकांत कडबाणे आणि प्रमुख व्याख्याते म्हणून पत्रकार गणेश करडे सर, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा शुभांगी शिंदे, उपाध्यक्ष सोनाली कोकरे सर्व सदस्य आणि मुख्याध्यापक बाळासाहेब शिंदे व्यासपीठावर उपस्थित होते. सर्व प्रथम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन केले आणि मान्यवरांच्या हस्ते नवीन दाखल विद्यार्थ्यांना शालेय साहित्य देऊन स्वागत करण्यात आले.

प्रास्ताविक मुख्याध्यापक बाळासाहेब शिंदे यांनी केले तर पालक जोतीराम नलवडे यांनी तसेच सहशिक्षक प्रदीप राजगुरू यांनी विचार व्यक्त केले. सूत्रसंचालन सहशिक्षक तुकाराम वाघमोडे यांनी केले. तर आभार जेष्ठ शिक्षक ज्ञानेश्वर बेंद्गुडे यांनी मानले कार्यक्रमाची सांगता विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून झाली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक बाळासाहेब शिंदे, ज्ञानेश्वर बेंद्गुडे, तुकाराम विष्णू वाघमोडे,एकनाथ कदम,निसार पठाण, प्रदीप राजगुरू, तुकाराम ज्ञानदेव वाघमोडे यांनी परिश्रम घेतले.

चाकोरे गावातील सर्वेक्षण केल्यानंतर १७ बालके पहिली प्रवेशासाठी पात्र आहेत त्यापैकी १२ बालकांचा प्रवेश निश्चित झाला आहे. तर उर्वरित विद्यार्थी लवकरच शाळेत दाखल करून घेतली जातील या नवीन पहिलीतील विद्यार्थ्यांसाठी फाउंडेशन कोर्स एक महिन्याचा शाळेत राबविला जाणार असून यामध्ये विद्यार्थी ओळख, गप्पागोष्टी, मुळाक्षरे, उजळणी, मनोरंजनात्मक खेळ घेण्यात येणार आहे

– **बाळासाहेब शिंदे,** मुख्याध्यापक
जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा चाकोरे

## मंगळवेढा शहरात रात्री तीन चोरट्यांचा हल्ला करत धाडसी घरफोडी

### घरफोडीसोबत चाकूचा धाक दाखवून सोन्या-चांदीचा मुद्देमाल लुटला

**तभा वृतसेवा**
**मंगळवेढा, दि. १९ मार्च-**



मंगळवेढा शहरातील दामाजी नगर परिसरात रात्रीच्या अंधारात तीन अज्ञात चोरट्यांनी एका महिलेच्या घरी धाडसी हल्ला करून घरफोडी केली.

घटना इतकी भयावह होती की, चोरट्यांनी धारधार चाकूचा धाक दाखवून फिर्यादी महिलेला व तिच्या मुलाला धमकावले. चोरट्यांनी फिर्यादीच्या गळ्यातील मंगळसूत्रासह कपाटातील सोन्याचे-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण १ लाख ६ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल लुटला.

ही घटना मंगळवेढा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी अश्विनी राजेंद्र हजारे (वय ३२ वर्षे, मजूर, राह. कारखाना रोड, दामाजी नगर, ता. मंगळवेढा) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार ही घटना १७ मार्च २०२६ रोजी रात्री २:०० ते २:१५ वाजता घडली. फिर्यादी अश्विनी हजारे या कारखाना रोडवरील दामाजी नगरात राहणाऱ्या साध्या मजूर महिलेची आहे. त्यांचे वय ३२ वर्षे असून, त्या कुटुंबातील कमावतेल्या व्यक्ती आहेत. त्यांचा मोबाईल क्रमांक ७४१०५५८३१० असा नमुद केला आहे. घटना रात्री २ वाजता घडली तेव्हा अश्विनी आणि त्यांचा मुलगा शिवाजी घरी झोपलेले होते. अचानक किचनच्या रवाज्यावर धडधडाट झाला आणि बाहेरून जोराने ढकलल्यामुळे आतून बंद असलेला दरवाजा उघडला गेला.चोरट्यांनी कडी-कोयंडा तोडून घरात शिरकाव केला. तीन अनोळखी आरोपी एकमेकांना संगनमताने आले होते.

चोरट्यांनी अश्विनी व शिवाजीला जागृत करून धारधार चाकूसारखे शस्त्र दाखवले.''शांत राहा, आवाज करू नका अन्यथा जीव घेऊ'' अशी धमकी देत त्यांनी लूट सुरू केली. प्रथम अश्विनीच्या गळ्यातील मंगळसूत्र काढले. ते ९ ग्रॅम वजनाचे सोन्याचे असून, त्यात ४ मोठे आणि ६० छोटे मणी होते. अंदाजे किंमत ७०,००० रुपये. मग कपाट उघडून त्यातील कानटॉप्स, कानखडे व चांदीची जुडवी काढली.३ ग्रॅम सोन्याचे कानटॉप्स - २१ हजार रुपये.१ ग्रॅम सोन्याचे कानखडे - ७ हजार रुपये.१५ ग्रॅम चांदीची जुडवी - ५ हजार रुपये. याशिवाय कपाटातून ३ हजार ५०० रुपये रोख रक्कम लुटली.

चोरटे उत्तर दिशेने ३ किमी अंतरावर गायब झाले. ही घटना मंगळवेढा शहरातील दामाजी नगर परिसरात घडली, जो कारखाना रोडजवळील शांत वस्ती आहे. कारखाना रोड हे मंगळवेढा तालुक्यातील व्यावसायिक क्षेत्र आहे. मागील काही महिन्यांत मंगळवेढा परिसरात चोरीच्या घटना वाढल्या आहेत. पोलिसांना स्थानिक गुंडगिरीचा संशय आहे.

फिर्याद आल्यावर पोलीस सबइन्स्पेक्टर बनकर यांनी तात्काळ गुन्हा दाखल केला.पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली. किचन दरवाज्याची कडी-कोयंडा तुटलेली आढळली.चाकूचे ठसे व चोरट्यांचे पायाचे ठसे शोधले जात आहेत.सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहेत. उत्तर दिशेने ३ किमी अंतरावर सखोल तपास सुरू. मंगळवेढा पोलीस ठाणे सक्रिय झाले आहे. स्थानिक रहिवाशांमध्ये भीती पसरली आहे. रात्रीच्या वेळी घरांना कुलूप लावण्याची शिफारस पोलिसांनी केली.

## धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज बलिदान मासाची मूकपद यात्रेने सांगता



**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १९ मार्च**

देव, देश आणि धर्मासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज यांचा बलिदान मास फाल्गुन अमावस्येला संपन्न झाला.

या निमित्ताने श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान, माळशिरस तालुका व अकलूज विभागाच्या वतीने अकलूज शहरात सायंकाळी ६ वाजता भव्य मूकपद यात्रा काढण्यात आली. शेकडो धारकरी, शिवभक्त, स्वयंसेवक आणि माता-भगिनींच्या उपस्थितीत निघालेल्या या यात्रेने संपूर्ण अकलूज शहर शंभूराजांच्या स्मृतीने भारावून गेले होते.''

विजयादशमीच्या मुहूर्तावर सुरू झालेला हा बलिदान मास १८ फेब्रुवारी ते १८ मार्च या दरम्यान पाळला गेला. शंभूराजांच्या बलिदानाचा विसर पडू नये आणि त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ही मूकपद यात्रा आयोजित केली जाते. अकलूजमधील विजय चौक येथून या मूकपद यात्रेला सुरुवात झाली. ही यात्रा शिवापूर पेठ, आझाद चौक, गांधी चौक मार्गे जात जय शंकर उद्यान येथे पोहोचली. इंडियन आर्मीचे जवान मेजर कृष्णा आदमिले यांनी परम पवित्र भगवा ध्वज घेऊन पवित्रा घेतला त्या पाठोपाठ धर्मवीर ज्वाला तसेच मूकपद यात्रेचे संदेश देणारे पोस्टर धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची सात फुटाची मूर्ती आणि त्या पाठोपाठ सर्व धारकरी स्वयंसेवक धर्मबंधू शिवभक्त व माता -भगिनी यांनी मौन धारण करून या मूकपद यात्रेत सहभाग नोंदवला. औरंगजेबाने शंभूराजांचे जे हाल केले, त्यामुळे त्यांची अंत्ययात्रा निघू शकली नव्हती. तीच उणीव भरून काढण्यासाठी आणि त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी ही मूक अंत्ययात्रा काढण्यात आली होती.

मुकपदयात्रेचा शेवट जयशंकर उद्यान येथे झाला. या ठिकाणी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतीकात्मक चितेला धर्मवीर ज्वालेतून अग्नी समर्पित करण्यात आला. यावेळी उपस्थित सर्वांनी शंभूराजांच्या चरणी नतमस्तक होऊन धर्मरक्षणाची, राष्ट्ररक्षणाची शपथ घेतली. धारकऱ्यांनी शंभूराजांना पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली. यावेळी श्री शिवप्रतिष्ठानचे सुधीर पवार यांनी उपस्थित जनसमुदायाला मार्गदर्शन केले. त्यांनी गुढीपाडवा आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या हत्येचा नेमका संदर्भ काय, याबद्दलचे गैरसमज दूर केले. फाल्गुन अमावस्येनंतर येणारा चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजेच गुढीपाडवा हा हिंदूंचा नववर्षाचा सण




कशा प्रकारे उत्साहात साजरा करावा, हे त्यांनी पटवून दिले. श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान माळशिरस तालुका प्रमुख गणेश इंगळे, अकलूज विभाग प्रमुख दीपक चिंतामणी, सुधीर पवार, बलिदान मास प्रमुख वैभव वडतीले, आकाश वायकर, सागर व्यवहारे, दीपक भिसे, रणजितदादा गायकवाड,अर्जुन इंगोले,तुषार सूर्यवंशी श्री शिवाजीराव घोडके युवराज वाळके अक्षय चौगुले यांनी विशेष परिश्रम घेतले. सर्व उपस्थित धारकऱ्यांनी शंभूराजांना पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली.

**त्यागाची आणि निष्ठेची भावना**

या ३० दिवसांच्या कालावधीत श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे धारकरी आणि शिवभक्त अत्यंत कडक नियम पाळतात. कुणी अन्न-पाण्याचा त्याग करतो, कुणी मुंडन करतो, तर कुणी महिनाभर पायात पादत्राणे घालत नाही. केवळ शंभूराजांनी धर्मासाठी सोसलेल्या अनन्वित छळाची जाणीव म्हणून हा शोक पाळला जातो. देशाच्या सीमेवरील जवान देखील हा बलिदान मास पाळत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




बार्शी : जिजाऊ ब्रिगेड बार्शी शाखेचा नुतन पदाधिकारी पदग्रहण सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी छायाचित्रात प्रमुख पाहुणे नगराध्यक्षा कथले, कविता राजेंद्र राऊत, पंचायत समिती सभापती रोंगे व जिजाऊ ब्रिगेड जिल्हाध्यक्षा उज्वलाताई साळुंके.



## महत्त्वाचे



## कर्मवीर सार्वजनिक ग्रंथालयात गुढी पाडवा व मराठी नववर्षाचा उपक्रम

**बार्शी, दि. १९ मार्च -**


येथील कर्मवीर सार्वजनिक ग्रंथालय येथे गुढीपाडवा व मराठी नववर्षाचे औचित्य साधून ग्रंथालयातील उपलब्ध वैविध्यपूर्ण साहित्याची गुढी उभारुन वाचन संस्कृती व वाचन संस्कार जोपासना करण्याचा संदेश देण्याचा गरजेचा नि अनोखा प्रयत्न करण्यात आला. गुढीपाडवा हा केवळ नवीन वर्षाची सुरुवात नसून तो नवचैतन्य, नवसंकल्प आणि नवविचारांचा उत्सव आहे. आपण गुढी उभारुन विजय समृद्धी आणि आनंदाचे प्रतीक उंचावतो. तसेच आपण आज ग्रंथसंपदेची गुढी उभारुन ज्ञान,संस्कार आणि विचारांची उंची वाढवण्याचा संकल्प करुया, रोज थोडं थोडं वाचूया आणि आयुष्यभर मोठे होऊया, ज्ञानाची गुढी उभारु अज्ञान दूर सारु, ग्रंथसंपदेची गुढी ज्ञानाची खरी उंची,जशी गुढी उंच उभारली जाते तशीच आपल्या विचारांची उंची वाढविण्यासाठी वाचनाचा आधार घेवूया, ग्रंथ हेच आपले खरे गुरु आहेत. त्यांच्या सहवासात राहुन आपण अधिक सक्षम, समृद्ध आणि सजग नागरिक बनूया, मोबाईलच्या आणि सोशल मीडियाच्या गर्दीत पुस्तकांची मैत्री टिकवणे ही खरी संस्कृती जपण्याची जबाबदारी आहे, असा संदेश या उपक्रमातून देण्याचा प्रयत्न केला आहे, असे ग्रंथपाल विनोद गायकवाड यांनी नमूद केले. याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते बप्पा सुतार, श्याम जानराव, राहुल लोंढे, प्रेम अग्रवाल, हर्षद देशमुखे, प्रेम लोंढे आदी उपस्थित होते.



## पिलीव शाळेच्या सात विद्यार्थ्यांची जवाहर नवोदय प्रवेश परीक्षेत निवड

**पिलीव, दि १९ मार्च-**

नवोदय विद्यालय समितीच्या वतीने घेण्यात आलेल्या प्रवेश पात्रता परीक्षेत माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळा पिलीव या शाळेतील इयत्ता पाचवीतील तब्बल ७ विद्यार्थ्यांची निवड झाली. त्यात हर्ष सुहास कोल्हे, कल्पेश प्रवीण वाघमारे, सार्थक युवराज नरुटे, ईश्वरी नितीन मगर, प्रणाली विजय लोखंडे, अक्षरा औदुंबर गोडसे आणिसानिका ब्रह्मदेव जाधव या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. त्यांना वर्गशिक्षिका सुप्रिया विजयकुमार पांगे-देशमुख यांचे मार्गदर्शन मिळाले. त्यांचे गटशिक्षणाधिकारी सुषमा महामुनी, केंद्रप्रमुख राजकुमार फासे, मुख्याध्यापक विजयकुमार साळुंखे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अमोल गांधी, उपाध्यक्ष प्रियंका रजपूत आदींनी कौतुक केले.



## जामगावात गुणवंत विद्यार्थ्यांचा जय मल्हार सार्वजनिक वाचनालयातर्फे सत्कार

**वैराग, दि. १९ मार्च-**

गुढीपाडवा आणि हिंदू नववर्षाचे औचित्य साधून जामगाव (आ) येथे जय मल्हार सार्वजनिक वाचनालय आणि ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने गावातील यशस्वी तरुणांचा तसेच राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या नेतृत्वाचा गौरव करण्यात आला. गावातील दोन सख्या भावांनी स्पर्धा परीक्षा आणि खाजगी क्षेत्रात मिळवलेल्या यशामुळे जामगावचे नाव उंचावले आहे. यामध्ये सौरभ शरद आवटे यांची 'स्टेट बँक ऑफ इंडिया' मध्ये असिस्टंट क्लार्कपदी निवड झाल्याबद्दल. वैभव शरद आवटे यांची पुणे येथील 'TCS' कंपनीत इंजिनिअर म्हणून निवड झाल्याबद्दल विद्यमान सरपंच बाळासाहेब जगताप आणि बबन गडदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी पीएसआय पांडुरंग गडदे , विश्वनाथ, वैजनाथ आवटे, तुळशीदास आवटे, पंकज आवटे, बाळराजे जाधव, मेजर सदाशिव खांडेकर, भीमराव यादव, प्रकाश अडसूळ, शिवम आवटे, ओंकार आवटे, अजित खंडू आवटे, श्रीयश वाघमोडे आदी उपस्थित होते. रामभाऊ वाघमोडे आभार मानले.

## माळशिरस परिसरात गुढीपाडवा उत्साहात

**माळशिरस, दि. १९ मार्च-**

शहर व परिसरात मराठी नवीन वर्षाचा सण गुढीपाडवा उत्साहात साजरा करण्यात आला. प्रभू रामाने रावणाचा पराभव करून परत आल्यानंतर सर्वांनी आपल्या दारात गुढ्या उभारून प्रभू रामाचे स्वागत केले होते. आजही हा गुढीपाडवा सण सर्वत्र साजरा केला जातो. गुढीपाडवा सणामुळे ग्रामदैवत श्री हनुमान मंदिरात नागरिकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.शिखर शिंगणापूर येथील शंभू महादेव यात्रेसाठी जाणाऱ्या कावडी यात्रेची सुरुवात आज झाली. शहरातील अनेक कावडींनी आज वाजत गाजत मिरवणूक काढून ग्रामदैवत श्रीराम , हनुमान व महादेव मंदिरात पाण्याची धार घालून व कावडी यात्रेची सुरुवात केली. गुढीपाडवा सणासाठी लागणाऱ्या साखरेच्या हार गाठी व इतर साहित्य खरेदी करण्यासाठी गेले दोन दिवस शहरातील किराणा दुकानात नागरिकांनी गर्दी दिसत होती तसेच गुढीला व आपल्या दुकानांना, वाहनांना घालण्यासाठी झेंडूचे हार घेण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती.

# विठ्ठल मंदिरात गुढीपाडव्या निमित्त ध्वजपूजन





**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१९ मार्च-**

मराठी नववर्षारंभ अर्थात गुढी पाडव्या निमित्त श्री विठ्ठल मंदिरात सकाळी सात वाजता ध्वज पूजन करण्यात आले. तसेच सायंकाळी विठ्ठल रुक्मिणीस पारंपरिक अलंकार परिधान करण्यात आले. मराठी नवीन वर्षाचा शुभारंभ होत असून यानिमित्त विठ्ठल मंदिरात पारंपरिक भगवा ध्वज पूजन करण्यात आले. सकाळी सात वाजता मंदिर समितीचे व्यवस्थापक संदेश भोसले आणि समिती सदस्यांच्या उपस्थितीत ध्वज पूजन संपन्न झाले. यावेळी मंदिर समितीचे विभाग प्रमुख संजय कोकीळ, सहाय्यक विभाग प्रमुख प्रसाद दशपुत्रे व कर्मचारी उपस्थित होते.

या शिवाय, श्री संत नामदेव पायरीवरील (महाद्वारावरील) गोपूर, श्री रुक्मिणी उत्तरद्वार गोपुर, या ठिकाणी विधिवत पूजा करून ध्वज लावण्यात आले. सकाळी पंचांग पूजन करण्यात आले. मंदिर समितीचे पुजारी वेद शास्त्र संपन्न समीर कौलगी यांनी पंचांग वाचन केले.

या दिवसापासून श्रींचे महानैवेद्यामध्ये श्रीखंडाचा समावेश करण्यास सुरवात करण्यात येत असून, दुपारी पोशाखावेळी श्रींस अलंकार परिधान करण्यात आले.

### या पारंपारिक दागिन्यांचा समावेश

चैत्री पाडव्या निमित्त विठुरायाला रेशमी गुलाबी सोवळे आणि निळ्या रंगाची अंगी परिधान करण्यात आली होती. तर देवाला सोन्याची पगडी, कौस्तुभमणी, हिऱ्याचे कंगन जोड, दंडपेट्या जोड मोठा,नाम निळाचा, मोत्याचा तुरा, मोत्याची कंठी,नवरत्नांचा हार,तुळशीमाळ,मत्स्त्य जोड, पितांबर, असे अलंकार तर रखुमाईला चिंतामणी रंगाची नऊवारी रेशमीसाडी, सोन्याचा मुकुट,वाक्या जोड,तोडे जोड,तानवड जोड, चिंचपेटीतांबडी,मोहरांची माळ,पुतळ्याची माळ,हायकोल,लक्ष्मीहार,सरी, कंबरपट्टा आदीं पारंपारिक दुर्मिळ अलंकराने सजविण्यात आलेले होते.

### विठुरायाला साखरेचा हार

गुढीपाडव्याच्या निमित्ताने विठुरायाला आज साखरेचा आणि खोबऱ्याच्या वाटीचा हार परिधान करण्यात आला आहे. त्यामुळे देवाचे सोज्वळ रूप अधिकच खुलून दिसत होते.

# अर्धवेळ आरोग्य स्त्री परिचरांना तीन हजार रुपयांची वाढ

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १९ मार्च-**

आयटक संलग्न महाराष्ट्र राज्य आरोग्य खाते अंशकालीन अर्धवेळ आरोग्य स्त्री परिचर कृती समितीच्या लढ्याला मोठे यश आले आहे. राज्यभरातील अंशकालीन अर्धवेळ आरोग्य स्त्री परिचय यांच्या पगारांमध्ये दरमहा तीन हजारांची भरघोस वाढ करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. आता अर्धवेळ ताईंना दरमहा सहा हजार रुपये पगार मिळेल.

१ एप्रिल २०२६ पासून दरमहा १० तारखेच्या आत खात्यावर मोबदला जमा होणार आहे. त्यामुळे राज्यातील पंधरा हजार व जिल्ह्यातील ४०० महिलांना याचा प्रत्यक्ष फायदा होईल, अशी माहिती आयटकचे जिल्हाध्यक्ष कॉम्रेड प्रा. तानाजी ठोंबरे व अर्धवेळ आरोग्य स्त्री परिचर कृती समितीचे नेते कॉम्रेड डॉ. प्रवीण मस्तुद यांनी दिली.

आयटक संघटनेच्या राज्य कृती समितीच्यावतीने; गेली सात ते आठ वर्ष सातत्याने नागपूर हिवाळी विधीमंडळ अधिवेशन, मुंबई आर्थिक विधीमंडळ अधिवेशनावर मोर्चे, धरणे आंदोलने केली गेली होती. तसेच राज्यात जिल्हास्तरीय जेलभरो, मोर्चे, धरणे आंदोलने करुन पगारवाढीच्या प्रश्नाकडे सातत्याने आयटक या संघटनेने लक्ष वेधून राज्यातील आमदारांना निवेदनेही दिली गेली होती.

अंशकालीन अर्धवेळ आरोग्य स्त्री परिचर या पन्नास रुपये दरमहापासून काम करतात. गेली ३० ते ३५ वर्ष अल्प मोबदल्यावर त्या काम करत आहेत. येणाऱ्या काळात त्यांना शासन कर्मचारी दर्जा मिळावा. किमान वेतन मिळावे, रजा, ग्रॅज्युएजी, पेन्शन, वाढीव बोनस, कोरोना काळातील प्रोत्साहन भत्ता मिळावा यासाठी लढा सुरुच राहणार आहे. राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर तसेच राज्याच्या आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, राज्य शासन व अंशकालीन स्त्री परिचर आंदोलनाची दखल घेऊन निर्णय घेतला याबद्दल आयटक व कृती समितीवतीने राज्य संघटनेकडून धन्यवाद व्यक्त करण्यात आले.

यासाठी कॉम्रेड नामदेव चव्हाण, ए. बी. कुलकर्णी, राजू देसले, शाम काळ, निलेश दातखिळे, बळवंत पवार, दिलीप उटाणे, हमिदा शेख, इंदुमती केवट, डॉ. प्रवीण मस्तुद, शिवाजी फुलवाले, दिवाकर नागपूर, चित्रा जगताप, देविदास बोन्द्रडे, शालूबाई कुथे, अब्दुल गफार, रत्नप्रभा गायकवाड, सुचिता गायकवाड, मुगाजी बुरुड, देविदास जिंगे आदींनी मोठा संघर्ष केला आहे.

# नव्या वर्षाचा नवा संकल्प; जलसाक्षरतेची गुढी

### एकता महिला मंचचा उपक्रम, पाणी वाचवा-जीवन वाचवाची सामूहिक शपथ

**तभा वृत्तसेवा**
**वैराग, दि. १९ मार्च-**

भारतीय नववर्षाचे स्वागत केवळ परंपरेनेच नाही, तर सामाजिक भान जपून करण्याचा एक नवा आणि प्रेरणादायी आदर्श मानेगाव (ता. बार्शी) येथील 'एकता महिला मंच' च्या रणरागिणींनी घालून दिला आहे. गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर या मंचच्या वतीने 'जलसाक्षरतेची गुढी' उभारून पाणी बचतीचा अनोखा संदेश देण्यात आला.

सध्याच्या काळात पाण्याची वाढती टंचाई आणि भविष्यातील संकट लक्षात घेता, केवळ सण साजरा न करता तो समाजोपयोगी कार्याने साजरा करण्याचा निर्णय महिलांनी घेतला. यावेळी 'पाणी वाचवा-जीवन वाचवा' असा मूलमंत्र देत सर्व सदस्यांनी पाणी बचतीची सामूहिक शपथ घेतली. घरातील आणि शेतातील



पाण्याचा वापर काटकसरीने करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

या सोहळ्याला एकता महिला मंचच्या रेणुका चौगुले, अश्विनी माळी, संगीता डाके. सुनिता जांभळे, सविता डाके, सुरेखा डाके, रसिका डाके, लोचना डाके, अनिता डाके, मंगल डाके, इंदुमती डाके आदी उपस्थित होते.

# मंद्रुपच्या मल्लिकार्जुन यात्रेस १ एप्रिलपासून सुरुवात

## दोन जगद्गुरुंच्या उपस्थितीत विविध कार्यक्रमांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रूप, दि. १९ मार्च-**

येथील ग्रामदैवत श्री कपिलसिध्द मल्लिकार्जुन यात्रेस बुधवार एक एप्रिलपासून सुरुवात होणार असून रविवार ५ एप्रिलपर्यंत विविध कार्यक्रम धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.

बुधवार एक एप्रिल रोजी 'श्रीं'चे कावड पालखी समवेत नंदीध्वजांचे देवालयात प्रवेश, दुपारी चार वाजता सर्व देवांना तैलाभिषेक, गुरुवार दोन एप्रिल रोजी 'श्री'स नैवेद्य, दुपारी दोन वाजता उज्जैनीचे जगद्गुरु डॉ. सिध्दलिंग राजदेशीकेंद्र शिवाचार्य महास्वामीजी व काशीचे जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांचे आगमन, दुपारी चार ते आठ वाजेपर्यंत जगद्गुरूंच्या समवेत 'श्रीं'ची पालखी, सदरबाशिंग व नंदी ध्वज यांची सवाद्य मिरवणूक, त्यानंतर





मल्लिकार्जून देवालयात कल्याणमहोत्सव व धर्मसभा आणि रात्री दहा ते पहाटे सहा वाजेपर्यंत भजनाचा कार्यक्रम होईल.

शुक्रवार तीन एप्रिल रोजी पहाटे चार वाजता 'श्री'स रुद्राभिषेक, नंदीध्वज व पालखी समवेत गावातून मिरवणूक, रात्री दहा वाजता झळकी येथील श्री बिरलिंगेश्वर नाट्यसंघ यांचे म्हाळींगेश्वर महात्मे अर्थात गुरुशिष्यर महिमे हे कन्नड सामाजिक नाटक होईल. शनिवार चार एप्रिल रोजी सकाळी नऊ ते दुपारी चार वाजेपर्यंत ढोळ्ळावरील गाण्यांचा कार्यक्रम, दुपारी दोन ते चार वाजेपर्यंत जंगी कुस्त्या आणि रात्री नऊ वाजता बागलकोट येथील रचो मेलोडी कन्नड गीतांचा आर्केस्ट्रा होईल. रविवार पाच एप्रिल रोजी सकाळी 'श्री' चे कावड व नंदीध्वजांचे मानकरांच्या घरी आगमन होईल. मल्लिकार्जुन देवालय परिसरात जनावर प्रदर्शन व बाजाराचे आयोजन केले आहे. यावेळी उत्कृष्ट जनावर व आदर्श पशूपालकांना बक्षीस देण्यात येईल.

### सोलापूर तात्या विंचू आणि गोरिला यंदाचे आकर्षण

श्री कपिलसिद्ध मल्लिकार्जुन यात्रेत दरवर्षी नवनवीन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. गत दोन वर्षात महाकाल नृत्यांचे आयोजन करण्यात आले होते . तर यावर्षी सोलापूर येथील सोलापूर तात्या विंचू आणि गोरिला हा कार्यक्रम यात्रेचे प्रमुख आकर्षण असल्याचे सांगण्यात आले. गुरुवारी दोन एप्रिल रोजी दुपारी तीन ते सहा यावेळी या कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात येणार आहे.

# सोलापूरच्या मातीतील सुपुत्राची गरुडझेप

## भाजी विक्रेत्याचा मुलगा राजस्थानमध्ये जिल्हा पोलिस अधीक्षक

**तभा वृत्तसेवा । प्रभाकर क्षीरसागर**
**वैराग, दि. १९ मार्च-**

परिस्थिती हलाखीची असो किंवा सोयीसुविधांचा अभाव, जर मनाशी जिद्द आणि डोळ्यांत स्वप्न असेल तर नशिबाच्या रेषाही बदलता येतात, हे सोलापूर जिल्ह्यातील तडवळे (ता. बार्शी) येथील शरण गोपीनाथ कांबळे यांनी सिद्ध करून दाखवले आहे. नुकतीच त्यांची राजस्थान राज्यातील डीग जिल्ह्याचे जिल्हा पोलीस अधीक्षक म्हणून नियुक्ती झाली असून, १५ मार्च २०२६ रोजी त्यांनी आपला पदभार स्वीकारला आहे. एका तरुण वयात इतक्या महत्त्वाच्या पदावर झालेली त्यांची निवड संपूर्ण सोलापूर जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

**कंदिलाच्या प्रकाशात कोरले यशाचे लेणे**

३० सप्टेंबर १९९३ रोजी जन्मलेल्या शरण यांचा प्रवास अत्यंत खडतर होता. आई-वडील शेतमजुरी करायचे आणि भाजी विकून घराचा गाडा ओढायचे. घरात वीज नसल्यामुळे शरण यांनी अनेक वर्षे कंदिलाच्या प्रकाशात अभ्यास केला. ११ वी आणि १२ वीच्या शिक्षणासाठी त्यांना रोज १२-१२



किलोमीटर पायपीट करावी लागत असे. मात्र, शिक्षणाचे महत्त्व ओळखणाऱ्या त्यांच्या पालकांनी त्यांना नेहमीच प्रोत्साहन दिले.

**२० लाखांचे पॅकेज नाकारून निवडला खाकीचा मार्ग**

शरण यांचे शैक्षणिक यशही तितकेच दैदीप्यमान आहे. सांगलीच्या वालचंद कॉलेजमधून बी.टेक. आणि त्यानंतर देशातील प्रतिष्ठित IISc (बेंगलोर) मधून त्यांनी पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. शिक्षणानंतर त्यांना वार्षिक २० लाख रुपयांच्या पगाराची नोकरी चालून आली होती. परंतु, वडिलांचे स्वप्न आणि समाजसेवेची ओढ यामुळे त्यांनी त्या मोठ्या पॅकेजवर पाणी सोडले आणि दिल्ली गाठून णझडउ चा अभ्यास सुरू केला.

**राजस्थानमधील यशस्वी कार्यकाळ**

आयपीएस म्हणून शरण कांबळे यांनी राजस्थान केडरमध्ये आपली छाप पाडली आहे. यापूर्वी त्यांनी सांचोर आणि अजमेर येथे सेवा दिली, तर अलवर येथे अतिरिक्त पोलीस अधीक्षक म्हणून त्यांनी उत्कृष्ट कामगिरी बजावली. आता अवघ्या काही वर्षांतच त्यांच्या कार्यक्षमतेची दखल घेत राजस्थान सरकारने त्यांच्याकडे डीग जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षकपदाची धुरा सोपवली आहे.

**नव्या जबाबदारीचे आव्हान**

डीग जिल्ह्याचा पदभार स्वीकारल्यानंतर, शरण कांबळे यांनी गुन्हेगारीमुक्त जिल्हा आणि वाढत्या 'सायबर गुन्हेगारी'वर (Cyber Crime) नियंत्रण मिळवण्याला आपले प्राधान्य असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यांच्या या नियुक्तीमुळे सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील तरुणांना नवी प्रेरणा मिळाली आहे. शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या शरण कांबळे यांचा हा प्रवास 'जिद्द असेल तर आकाशही ठेंगणे असते' याचे जिवंत उदाहरण आहे. ते वारंवार आपल्या भाषणांतून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना 'स्कॉलरशिप' योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन करतात, कारण त्यांना स्वतःलाही महाराष्ट्र शासनाच्या दिल्लीतील शिष्यवृत्तीचा मोठा आधार मिळाला होता.

### यशाचा 'हॅटट्रिक' प्रवास

शरण कांबळे यांनी केवळ एकदाच नाही, तर सलग तीन वेळा केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश मिळवले: २०१९: UPSC CPF परीक्षेत देशात ८ वा क्रमांक, २०२०: UPSC नागरी सेवा परीक्षेत ५४२ वा रँक मिळवून खझड बनले. २०२१: पुन्हा परीक्षा देऊन १२७ वा रँक मिळवला. यावेळी त्यांना IFS (परराष्ट्र सेवा) मिळत असतानाही त्यांनी खाकी वर्दीवरील प्रेमापोटी IPS राहण्याचाच निर्णय घेतला.